नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या महाराष्ट्र साहित्य पत्रिका ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून महाराष्ट्र साहित्य परिषदेद्धारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.


स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुररस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत


महाराष्ट्र साहित्य परिषद
~ ग्रंथालय ~
ग्रंथकार महाराष्ट्र साहित्य पत्रिका
ग्रंथनाम जानेवारी ते डिसेंबर २०१०
दाखल अंक अंक ३३२ ते ३३५

महाराष्ट्र साहित्य पत्रिका
जानेवारी ते डिसेंबर २०१०
अंक ३३२ ते ३३५


महाराष्ट्र साहित्य पत्रिका
अंक क्र. ३३२/जानेवारी ते मार्च २०१०
व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे नियोजित अध्यक्ष : डॉ.द.भि.कुलकर्णी

अनुक्रमणिका

महाराष्ट्र साहित्य परिषदेचे त्रैमासिक मुखपत्र

महाराष्ट्र साहित्य पत्रिका

□ अंक क्र. ३३२ : जानेवारी ते मार्च २०१०

प्रकाशक :

डॉ. माधवी वैद्य

प्रमुख कार्यवाह

महाराष्ट्र साहित्य परिषद

टिळक रस्ता, पुणे ४११ ०३०

दूरभाष - ०२०-२४४७५९६३

अनुक्रमणिका

महाराष्ट्र साहित्य परिषदेचे त्रैमासिक मुखपत्र

महाराष्ट्र साहित्य पत्रिका

□ अंक क्र. ३३२ : जानेवारी ते मार्च २०१०

प्रकाशक :

डॉ. माधवी वैद्य

प्रमुख कार्यवाह

महाराष्ट्र साहित्य परिषद

टिळक रस्ता, पुणे ४११ ०३०

दूरभाष - ०२०-२४४७५९६३

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका

मुद्रक-प्रकाशक
डॉ. माधवी वैद्य, प्रमुख कार्यवाह
महाराष्ट्र साहित्य परिषद, टिळक रस्ता, पुणे ४११ ०३०.

अक्षरजुळणी
मेघा ग्राफिक सर्व्हिसेस,
स.नं. १४/२३/४, घर नं. १५९८,
मोती बेकरीमागे, धायरी, पुणे - ४११ ०४१

मुद्रणस्थळ
जंगम ऑफसेट प्रा. लि., २५/१० नांदेड फाटा,
सिंहगड रस्ता, पुणे - ४११ ०४१

किंमत १५/- रुपये

प्रकाशन : मार्च, २०१०

या अंकात व्यक्त झालेल्या विचारांशी संपादक आणि संपादन-समिती,
मध्यवर्ती मंडळ अथवा प्रकाशक सहमत असतीलच, असे नाही.

(संपादकीय)

एका चरित्रात्मक आत्मचरित्राची शताब्दी !

डॉ. मु. प्र. कुलकर्णी (संपादक)

न्यायमूर्ती माधव गोविंद रानडे यांचे निधन १६ जानेवारी १९०१ रोजी झाले. त्यानंतर, सुमारे नऊ वर्षांनंतर, त्यांच्या पत्नी श्रीमती रमाबाई रानडे यांनी ५ फेब्रुवारी १९१० रोजी 'आमच्या आयुष्यातील काही आठवणी' हे सहजीवनातील आठवणींच्या माध्यमातून न्या. रानडे यांचे चरित्र लिहून पूर्ण केले. ठीक शंभर वर्षांपूर्वीचे हे लिखाण अतिशय साध्या, सुबोध आणि भावस्पर्शी भाषाशैलीचे उत्तम उदाहरण आहे. सनातनी आणि सुधारक, न शिकलेल्या आणि शिकणाऱ्या स्त्रिया, शिक्षणामुळे नवी दृष्टी येऊ लागलेला पुरुषवर्ग आणि हरतऱ्हेच्या बंधनात जखडत जाणारा स्त्री-वर्ग, प्रबोधनाची चाहूल लागलेला समाज आणि रूढीग्रस्त समाज-अशा १९ व्या शतकाच्या उत्तरार्धापासून ते २० व्या शतकाच्या प्रारंभ काळाचा विशाल 'कॅनव्हास' या चरित्रलेखनास लाभला आहे. सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय चळवळीचे पडसाद त्यात अपरिहार्यतेने उमटलेले आहेत; कारण तो जीवनाचा अविभाज्य भाग आहे. शिक्षणाचा अभाव हे समाजाच्या अवनतीचे कारण आहे; हे नवशिक्षित पिढीला उमगले होते, तरी स्त्री-वर्गाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलण्यासाठी समाजधुरिणांना अवघड गेले. आजही ही तथाकथित समानता जगातल्या प्रगत देशातही आढळत नाही. काही युरोपियन देशात समान गुणवत्ताधारक स्त्रीला ती केवळ 'स्त्री' म्हणून समान हक्क डावलले जात आहेत. समान वेतन, समान राजकीय व सामाजिक संधी नाकारली जात आहे.

विसावे शतक हें स्त्री-सुधारणेच्या जागृतीचे शतक मानले जाते. वेदकाळात स्त्रियांचा दर्जा पुरुषांच्या बरोबरीचा होता. यज्ञोपवितावर स्त्रियांचाही अधिकार होता. स्त्रीने लग्न केलेच पाहिजे असा दंडक नव्हता. मग, 'अष्टवर्षा भवेत् कन्या' ह्या नियमानुसार आठव्या वर्षी पतिगृही गेल्यावर शिक्षणाची दारे आठव्या वर्षीच कशी बंद झाली ? पतिसेवेशिवाय दुसरा धर्म नाही. स्त्री-शिक्षणाची नुसती कल्पनाही 'महापाप' कधीपासून झाली ? त्याकाळाच्या मानाने रमाबाईंचा विवाह ११व्या वर्षी म्हणजे फारच उशीरा झाला. तोही प्रथम पत्नी निवर्तल्यावर निदान दोन महिने तरी थांबा; म्हणून न्या. रानडे विनंती करून थकले आणि हट्टी-आग्रही वडिलांशी भांडण नको म्हणून मनाविरुद्ध विवाह केला. महिन्याच्या आतच दुसरा विवाह; तोही अल्पवयी प्रथमवधूशी ! सुधारकी-मित्रपरिवारासमोर मान खाली झाली. विचार आणि कृतीत विसंगती-ढोंगी- म्हणून टीका सहन करावी लागली. लग्नाच्या दिवशीही रजा काढली नाही. गोरज-मुहूर्तावर विवाह झाला. मुलीच्या माहेरकडची आई-भाऊ-चुलते-चुलती-कुणीही विवाहाला उपस्थित नाहीत... वरात नाही- पायीच घरी आले ! त्यानंतर रोज रात्री अक्षरओळखीची 'रात्रशाळा' सुरू झाली. इंग्रजी- शिक्षणाचे धडे शिकवायला ट्रेनिंग कॉलेजमधील शिक्षिका येऊ लागली. लहानपणापासून असलेले वाचनाचे गूढ- 'बोलक्या ढलप्याचे' गूढ उलगडल्याचा मनस्वी आनंद रमाबाईंना झाला. 'हिरा-बागे'त गव्हर्नर सर जेम्स् फर्ग्युसनच्या सभेत 'इंग्रजी शाळा मुलींसाठी स्वतंत्र व्हावी, म्हणून आर्य महिला समाजाने मागणी केली. त्या सभेत इंग्रजीतून भाषण करण्याइतपत रमाबाईंची तयारी झाली याबद्दल न्यायमूर्ती संतुष्ट होते; परंतु घरातील तमाम स्त्रीवर्ग-ताईसासूबाई वगैरे यांची घालून-पाडून बोलणी सहन करावी लागली. 'बायकांनी कशाला शिकायचे ? फार तर व्यंकटेशस्तोत्र-शिवलीलामृत शिकावे. पुरुषांच्या खुर्चीला-खुर्ची लावून इंग्रजी कशाला ?- परक्या पुरुषात मिसळते. प्रार्थना समाजाच्या आणि आर्य महिला समाजाच्या सभेला जाण्याचा नाचरेपणा कशाला ?... इंग्रजी शिकवायला येणाऱ्या मडमेला शिवते- तशीच स्वयंपाकघरात येते...' असा शब्दांचा मारा सहन करीत करीत रमाबाईंच्या इंग्रजी शिक्षणाची आणि सामाजिक जीवनाची झालेली वाटचाल लक्षणीय आहे. त्यात पंडिता रमाबाई, सौ. अन्नपूर्णाबाई भांडारकर यांचा खंबीर सहवास लाभला. न्यायमूर्तींच्या बदलीच्या निमित्ताने रमाबाईंना नाशिक, धुळे, नगर,

अनुक्रमणिका

सिमला, आग्रा, मथुरा, अजमेरा, कलकत्ता अशा बहुविध ठिकाणच्या समाज जीवनाचे दर्शन झाले.

सामाजिक/राजकीय चळवळीचे पडसाद कुटुंबात उमटणे अपरिहार्य होते. सरकारी गुप्तचरांचा ससेमिरा, दयानंद सरस्वतींच्या सुधारकी विचारांना विरोध दर्शविण्यासाठी सनातन्यांनी काढलेला 'गर्दभ-मोर्चा !' १८९० चे पंचहौद मिशन-ग्रामण्य आणि चहाच्या पेल्यातले वादळ ! सर मेरीज् कॉन्व्हेंटच्या गॅदरिंगला ख्रिश्चनांचा चहा प्यायल्याबद्दल 'पुणे वैभव' मध्ये गोपाळराव जोशांनी लेख लिहिला. मातब्बर मंडळींवर खटला भरला... सर्वांनी प्रायश्चित्त घेऊन पावित्र्य राखले ! न्यायमूर्तींनी, चहा घेतला नसतानाही, सर्वांबरोबर प्रायश्चित्त घेतले. प्रकृती अस्वास्थामुळे न्यायमूर्तींना 'लाहोर-काँग्रेस'ला जाता आले नाही. तोच आजार शेवटचा ठरला. कुटुंबातील थोरली पुरुष मंडळी करड्या शिस्तीची ! पुरुष मंडळींकडून मुलांना प्रेमाने घेणे दूरच ! स्वतःच्या वडिलांसमोर आणि सासरी मामंजींसमोर येणेही शक्य नव्हते. 'नातेसंबंधाचे प्रौढ-गंभीर स्वरूप' हे त्याकाळाचे वैशिष्ट्यच होते. वडिलांच्या अखेरच्या आजारात त्यांची सेवा करण्यासाठी न्यायमूर्तींनी दोन महिन्यांची रजा काढली... पुत्रधर्म पाळला ! पुनर्विवाह केलेल्या मित्राला घरी जेवायला बोलवून घराचे पावित्र्य बिघडविले म्हणून संतापलेल्या वडिलांसमोर मनाविरुद्ध क्षमायाचना करणारे न्यायमूर्ती जितके हळवे होतात; तितकेच वडिलांच्या मध्यस्थीने आपली केस समजून घ्यावी म्हणून आलेल्या त्यांच्या मित्राला भेट नाकारणारे कर्तव्यकठोर न्यायमूर्तीही रमाबाईंनी शब्दांकित केले आहेत.

तुकारामाचे करुणार्द अभंग, न्यायमूर्तींच्या कर्तव्यकठोर व्यक्तिमत्त्वातील, भक्तीचा झुळझुळता झरा होता. त्यांच्या अखेरच्या आजारात नोकरवर्गाला निरोप देताना, भावना अनावर झालेले आणि 'आता रजेवर असताना नोकर कशाला?' म्हणून सरकारी फायदा नाकारणारे न्या. मा. गो. तथा रावसाहेब रानडे हे त्या कालचरित्राचे नायक होते.

रमाबाईंचे प्रौढ-समजुतदार व्यक्तिमत्त्व, न्यायमूर्तींच्या सहवासात घडत जाते. न्यायमूर्तींच्या प्रौढ-शीतल व्यक्तिमत्त्वामुळेच त्यांना जीवघेणी निंदा सहन करण्याचे बळ मिळाले. 'आठ महिन्यांचा उन्हाळा-एक महिन्यांचा पावसाळा' अशा हलक्या फुलक्या वाक्प्रचारांचा सहज वापर त्यांच्या अकृत्रिम-प्रासादिक लेखनशैलीचे दर्शन घडवितो. न्या. रानडे यांच्या नामोल्लेखाजागी 'स्वतः' ह्या शब्दाने तत्कालीन स्त्रीसुलभ मर्यादा सांभाळून लेखनातील संयत भूमिका सांभाळली आहे. आत्मचरित्र लेखनातील प्रामाणिकपणा हा 'अडथळा' असल्याचे त्यांना कधीही जाणवले नाही. रडणे, घावरणे, कुचंबणे इ. भावना नैसर्गिकरित्या व्यक्त केल्या आहेत. त्याला संयमाची लोभस किनार आहे.

एका काठाला, चरित्र दुसऱ्या काठाला आत्मचरित्र अशा दुहेरी कथानकाने विस्तारणारे हे ऐतिहासिक ललित चरित्र आहे. 'ऐतिहासिक' अशाकरिता की एका कालखंडाचा इतिहास ह्या चरित्र-आत्मचरित्राचा पाया आहे; आणि 'ललित' अशासाठी की रमाबाईंच्या भावस्पर्शी-रंजक लेखनशैलीने त्याची वाचनीयता सुखद झाली आहे. सत्य आणि लालित्य यांचा समतोल साधीत हे आगळेवेगळे चरित्रात्मक आत्मचरित्र घडले आहे. एका आकाशाएवढ्या व्यक्तिमत्त्वाचे चरित्र अगदी सहजपणे आपल्या आत्मचरित्राच्या अवकाशात सामावण्याचे सामर्थ्य रमाबाईंच्या लेखणीत आहे.

नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांची मार्मिक प्रस्तावना आणि दुसऱ्या आवृत्तीच्या निमित्ताने प्रकाशक काशीनाथ रघुनाथ मित्र यांचे जिव्हाळ्याचे 'दोन शब्द' या पुस्तकाला लाभले आहेत. आपली कन्या श्रीमती सौ. सखूबाई विद्वांस हिला सदर ग्रंथ रमाबाईंनी अर्पण केला आहे. कारण त्यांच्याच प्रेरणेने हे लेखन झाले. श्री. का. र. मित्र यांच्या मनोरंजक ग्रंथप्रसारक मंडळी, गिरगाव, मुंबई यांनी लागोपाठ दोन आवृत्त्या काढून शंभर वर्षापूर्वीच हा ग्रंथ प्रकाशित केला आहे. मराठी सारस्वताच्या इतिहासातील हे एक अविस्मरणीय सुवर्णपान आहे.

अनुक्रमणिका

ह्या अंकात-

'डॉ. द. भिं'च्या समीक्षालेखनाविषयी आणि त्यांच्या एकूणच वाङ्मयीन कार्यकर्तृत्वाचा जीवनवृत्तान्त 'मुखपृष्ठ कथा' (कव्हर स्टोरी) म्हणून डॉ. चं. वि. जोशींचा लेख आहे. महाराष्ट्र साहित्य परिषदेने नुकताच वाङ्मयेतिहासाचा ७वा खंड-भाग दुसरा प्रकाशित केला आहे; त्या निमित्ताने वाङ्मयेतिहासाची लेखनतत्त्वे विशद करणारा लेख समाविष्ट केला आहे. जागतिकीकरणाने मानवी जीवनावर होणारे परिणाम हा आजचा चर्चेचा विषय पद्मश्री यू. म. पठाणांच्या संतसाहित्याच्या चिंतनातून प्रकट झाला आहे. बा. सी. मर्ढेकरांच्या जन्मशताब्दीनिमित्त त्यांच्या आध्यात्मिक समारोपीय कवितेचा परिचय प्रा. कृष्णा चौधरींनी करून दिला आहे; तर साहित्य अकादमी विजेती प्रा. डहाकेंची 'चित्रलिपी', प्रा. उवाळेंनी उलगडून दाखविली आहे. याशिवाय विविध पुस्तकांचा परिचय व समीक्षा यांचा समावेश आहेच.

पुण्यात यंदाचे ८३वे अ. भा. मराठी साहित्यसंमेलन एस्.पी. कॉलेजच्या मैदानावर दि. २५, २६, २७ आणि २८ मार्च २०१० रोजी साजरे होत आहे. या संमेलनास शुभेच्छा !

(संपादक)
(महाराष्ट्र साहित्य पत्रिका, पुणे ३०)

संपर्क : ७ गायकवाड वसाहत, सावेडी मार्ग,
अहमदनगर. दूरभाष : ०२४१-२४२९७५५

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका

व्रतस्थ समीक्षक : 'द. भि.' !

- प्रा. (डॉ.) चं. वि. जोशी

[मराठी वाङ्मयेतिहासातील समीक्षेचे एक पान 'द. भि.' ह्या बिरुदाने ओळखले जाते. ८३ व्या अ. भा. मराठी साहित्य संमेलनाध्यक्षपदावर विराजमान झाल्यानंतर म. सा. परिषदेने पहिला सत्कार केला. म. सा. पत्रिकेसाठी डॉ. जोशी यांनी लिहिलेला हा मार्मिक समीक्षालेख. – संपादक]

डॉ. द. भि. कुलकर्णी हे ८३ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष म्हणून निवडून आले. एखाद्या साक्षेपी समीक्षकाचा त्याच्या वाङ्मयीन विद्वत्तेबद्दल झालेला हा गौरव तर आहेच; परंतु ते त्याच्या तपश्चर्येचेही फळ आहे ! निष्ठेने आणि साक्षेपीभावाने 'द. भि.'नी समीक्षेच्या प्रांतात संचार केला; आणि आपल्या अभ्यासाचा परिचय घडवून आणला. 'जीवननिष्ठा' आणि 'सौंदर्यनिष्ठा' बाळगणारे द. भि. कुलकर्णी समीक्षालेखनात जसे विदग्धवृत्तीने लिहितात; तशी प्रासादिकताही बाळगून असतात. चतुरस्त्र समीक्षक म्हणून मला सरांच्या समीक्षेने नेहमी आकर्षित करून घेतले आहे. याचे कारण म्हणजे सरांची समीक्षा पांडित्याचा आव आणून समोर उभी रहात नाही. तिची जातकुळी काव्यात्मतेची आहे. ती दुर्बोधतेची शाल पांघरून येत नाही. ज्या विषयावर भाष्य करावयाचे तो विषय नेमक्या शब्दांत मांडण्याचे कसब त्यांच्या समीक्षेचे बलस्थान आहे. साहित्यावरील चिंतनाचा अजब नमुना म्हणजे सरांचे समीक्षालेखन ! 'अपार्थिवाचे चांदणे' हा ग्रंथ मला इतका भावला की, त्याचे अंतरंग मला गेली दहा वर्षे भुरळ घालीत आहे. त्यात रूक्षपणा नाही. भाषेचे लाघव आणि विषयाची खोली एकार्थी तिच्यातच मला सामावून घेते; प्रत्यक्षाचा पडताळा आणून देते. एका तरल आणि भावस्पर्शी समीक्षकाचे असामान्यत्व प्रत्ययाला आणून देते. समीक्षाविषय/व्यक्तित्वाची मांडणी/कवितेचे परिशीलन/गद्यात्म साहित्यकृतीचे वस्तुनिष्ठ आकलन व त्याचा संशोध/समीक्षाविषयाची शिस्त/व्यासंग आणि गांभीर्य या सर्वच वैशिष्ट्यांनी हे समीक्षात्म लेखन गौरवपात्र आहे. आपल्या समीक्षालेखनाचा मागोवा घेत ते म्हणतात, 'ध्यानीमनी नसताना अचानकच एखादी कलाकृती मला खुणावते. तिच्यातील एखादे पात्र, तिच्यातील एखादी प्रतिमा, एखादा शब्द अस्वस्थ करतो, गूढ वाटू लागतो. कामाकामातच त्याचा वेध घ्यावा तर त्याचे पाऊलच दिसत नाही... अस्वस्थता आणखी वाढते. एक आविष्कारातुर शब्दमय भारलेपण दाटून येते... आस्वाद आणि निर्मिती, इंद्रियगोचरता आणि मानसप्रत्यक्षता, भावनिर्भरता आणि वस्तुमान यांची इतकी एकतानता एरवी कधीच अनुभवायला येत नसते. भानावर येतो तेव्हा कागदाच्या विटेवर माझा समीक्षालेख कमरेवर हात ठेवून उभा असतो.' (अपार्थिवाचे चांदणे/पृ. १४)

द. भि. सरांच्या समीक्षा लेखनाचा आविष्कार कसा होतो, याचा हा निर्वाळा त्यांच्या समीक्षालेखनाचा अवकाश स्पष्ट करणारा आहे.

गांधीवादी साहित्याची निर्मिती होत असताना त्या वाङ्मयीन घडणीच्या काळात सरांवर, त्यांच्या वाङ्मयावर, वाङ्मयीन दृष्टीवर त्याचा परिणाम झाला नाही. परंतु त्यांच्यातील संवेदनशीलता व कल्पकता यांनी मात्र मूळ धरले होते. वाचनाचा व्यासंग कुमारवयापासूनच जोपासला म्हणून अर्थाचे अनपेक्षित आणि अनंत विन्यास शब्दातून साकार होऊ शकले. त्यांच्या घरातच साहित्यिक वातावरण असल्याने ग्रंथसहवास होत होताच. कुमारवयापासूनच कोणताही दबाव मनावर नव्हता. परीक्षार्थी नसल्याने जीवनातल्या अन्यविध क्षेत्रांकडे जायला मुभा होती. याचा परिणाम म्हणजे अभ्यासापेक्षा इतर पुस्तके वाचून वाङ्मयीन जाणीवा समृद्ध होत गेल्या.

पुढे राम शेवाळकर, सुरेश भट, केचे अशा नामवंत साहित्यिक मंडळींच्या सहवासाने वाङ्मयीन जाणीवा फुलत गेल्या. 'मर्ढेकरांची प्रसरणशील कविता आणि मुक्तिबोधांसारखी उत्कट कविता' लिहिण्याची इच्छा मनात असताना कविता मात्र प्रतारणाच करीत राहिली; हे ते प्रामाणिकपणे सांगतात. विदर्भ साहित्यसंघातील वातावरणाचा द. भि.च्या वाङ्मयीन घडणीवर फार परिणाम झाला. माडखोलकर, ना. रा. शेंडे, वीणा

प्रकाशनातील भावे-दोडके, आकाशवाणीवरील नगरकर-चोरघडे, भाषाविभागातील आराध्ये-मुक्तिबोध, विविध व्याख्यानमाला, वादविवाद, विविध कविसंमेलने, मासिके यांनी सरांच्या व्यक्तिमत्त्वाला नीट आकार दिला. बापट, केचे, तांबे, चित्रे यांच्या कवितांवर लेख लिहिले. या लेखांचे कौतुकही झाले होते. नागपूर विद्यापीठासाठी लिहिलेल्या प्रबंधामुळे संशोधनाची शिस्त तपासता आली. एकाग्रता आणि व्यासंग यात वृद्धी झाली. पाश्चात्य समीक्षा आणि भारतीय साहित्यशास्त्र यांच्या समन्वयात्मक अभ्यासाने समीक्षा लेखनाची नवी दृष्टी मिळाली. वाचनाचा अजोड छंद जपल्याने स्वच्छंदपणे ग्रंथसंग्रह केला आणि 'ग्रंथ विकत घेण्याचे' वेड जपले.

समीक्षा-साहित्य संशोधनासाठी सरांना कितीतरी नवनवीन, तरलस्पर्शित्व लाभलेली पुस्तके व साहित्यिक निवडले. त्यात विशेषतः ज्ञानेश्वरांच्या वाङ्मयाने त्यांच्यातील संस्कृतीशीलता अत्यंत उच्च स्तरावर नेली. परिणामी नंतरच्या कोणाही कवितेवर, कवीवर लिहिताना सौंदर्यवादी भूमिका प्रबळ होत गेली. म्हणूनच मर्ढेकरांच्या कवितेतील अनुभूतीमध्ये आणि शब्दांमध्ये असणारी विस्मयजनक प्रसरणशीलता ते तपासू शकतात. पु. शि. रेगे यांच्या कादंबरीतील अनुभूतीमधील तरलता व व्यामिश्रता पाहू शकतात. याच वळावर द. भि. कुसुमाग्रजांच्या जीवनानुभव आणि कलानिर्मिती यांच्यातील सुलभीकरणाची प्रक्रिया जोखतात.

द. भि. सरांच्या समीक्षेत जो जिज्ञासूपणा दडलेला आहे; तो त्यांच्या आजवरच्या वाङ्मयीन कमाईचा अविभाज्य घटक आहे. 'महाकाव्या'वर प्रबंध लिहितानाही हीच जिज्ञासा होती. नंतरचे सारे समीक्षालेखन त्याच्या अनावर जिज्ञासेपोटी झालेले आहे. परंतु त्यासाठी व्यासंगाचे आणि निष्ठेचे तप करावे लागते, ते त्यांनी सुफळपणे केले आहे. लाघवी अमोघ-वक्तृत्व, एखाद्या विषयातील सुसंगतवार सूत्रबद्ध मांडणी, विषयाच्या तळाशी जाऊन तो समजून घेण्याची/देण्याची अभ्यासपूर्णता त्यांच्यात आहे. या गुणांमुळेच संवादशीलतेची देणगी त्यांना मिळाली. कारण त्यांची समीक्षा अभ्यासताना माझा त्यांच्याशी संवादच चाललेला असतो. खरेतर, त्र्यं. वि. सरदेशमुख आणि द. भि. कुलकर्णी यांच्या समीक्षालेखनाने मला कायमचे जखडून टाकले आहे.

समीक्षकाची समीक्षाही नवसृजनाचे रूप घेऊन उभी रहाते, तसे 'द. भि.'च्या समीक्षालेखनाचे आहे. जी. ए. हे त्यांचे आवडते लेखक ! त्यांच्या मूल्यमापनात जी.ए. नेहमी डोकावतात. जी. ए. कुलकर्णींच्या रूपकात्म लेखनाने 'द. भि.'वर गारूड केले. म्हणूनच ते लिहितात, 'जी. ए. कुलकर्णी यांनी त्याचे (रूपककथा) पुनरूज्जीवन करावे; आणि खांडेकर-जी. ए. यांच्या रूपककथांमध्ये वरवर वैषम्य परंतु निर्मितीप्रक्रियेत साम्य असावे ही घटना अतिशय आव्हानात्मक आहे.' जी.एं.च्या अनुभवचित्रणापेक्षा अनुभवचिंतनाचा द. भिं.नी नेहमी विचार केला आहे. 'रूपककथा' ह्या वाङ्मयप्रकाराकडे ते किती गांभीर्याने पाहतात, हे इथे स्पष्ट होते. जी.एं.च्या कथेतील जीवनदृष्टीचा तत्त्वज्ञानाशी संबंध लावून 'द.भि.'नी जी.एं.च्या कथेचे नवे परिमाण स्पष्ट केले.

द. भिं.नी आपले समीक्षालेखन एकांगी/एकसुरी होऊ दिले नाही. मराठी साहित्य प्रवाह, साहित्यप्रकार, साहित्यपरंपरा यांची पुनर्तपासणी करून फेरमांडणी करण्याचे प्रयत्न केले. त्या सर्व प्रकारातही आपली स्वतंत्र लेखनमुद्रा ठसठशीत ठेवली. चक्रधरांपासून तो आजच्या साहित्यनिर्मात्यांपर्यंत तिचा परीघ व्यापलेला आहे. जीवन आणि वाङ्मय यातील नाते तपासताना त्यांनी आपली सौंदर्यदृष्टीही जागृत ठेवली. विविध साहित्यप्रकारांची खोल समज असल्याने कोणत्याही विषयाच्या तळाशी जाऊन अत्यंत सक्षमपणे, संवेदनशीलतेने आणि तरलतेने तो विषय समजून देतात. आधुनिक तत्त्वप्रणालींचे नेमके विश्लेषण करतात. त्यामागे अनेकविध उदाहरणांची साखळी उभी करतात. त्यांच्या, 'महाकाव्य : स्वरूप व समीक्षा', 'ज्ञानेश्वरांचा श्रोतृसंवाद', 'मर्ढेकरांचे सौंदर्यशास्त्र : पुनर्स्थापना', 'पार्थिवतेचे उदयास्त', 'तिसऱ्यांदा रणांगण', 'पहिली परंपरा' इ. ग्रंथातून त्यांच्या साक्षेपी समीक्षेचा दाखला मिळतो. त्यांच्या विचारात काटेकोरपणा आहे. कुठेही पाल्हाळ नाही. विश्लेषणात वरवरपणा नाही. बोजडपणाही नाही. 'माणूस'पण जपणारा समीक्षक म्हणून मी त्यांच्याकडे पाहतो. याचे कारण समीक्षक विद्वान असतो, पण तो 'माणूसही' असायला हवा. द.भि.चे एकंदर जीवन पाहता नागपूर असो, पुणे असो की कोल्हापूर असो-

आपल्या वास्तव्यात द.भिं.नी माणूसपण जपले. हा ओलावा लेखनातही आहे; विचारात आणि कृतीतही आहे. वाङ्मय हे जीवनाचे 'सारसूत्र' मानून पुस्तकांच्या नि लेखनाच्या आनंदडोहात रमणारा हा चतुरस्त्र, साक्षेपी समीक्षक नेहमीच माझ्या विचारव्यूहात राहिला आहे.

मराठी समीक्षाक्षेत्रात एक मानाचे सुवर्णपुष्प अध्यक्षरूपाने त्यांच्या दारी आले, हे मराठी सारस्वतासाठी भूषण आहे. मराठी भाषा, साहित्यातील 'व्रतस्थ' म्हणून त्यांना अभिवादन !

❖❖❖

डॉ. चं. वि. जोशी

(पदव्युत्तर मराठी संशोधन केंद्र अहमदनगर महाविद्यालय, अ नगर)

१०, 'मितवा', सरस्वती वसाहत, (पोस्ट कॉलनी)

पाइपलाईन मार्ग, सावेडी, अहमदनगर. भ्रमणभाय : ९३२६०७११८२

८३व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. द. भि. कुलकर्णी : जीवनवृत्त

१. पूर्ण नाव : दत्तात्रेय भिकाजी कुलकर्णी

२. जन्म दिनांक : २५ जुलै १९३४, गुरुपौर्णिमा, नागपूर

३. शिक्षण :

(अ) शालेय : हम्पयार्ड रेल्वे प्राथमिक शाळा,अजनी, नागपूर; कुर्वेज न्यू मॉडेल हायस्कूल, सीताबर्डी, नागपूर - १९४० - १९५१

(आ) महाविद्यालयीन धनवटे नॅशनल कॉलेज, धनतोली; मॉरिस कॉलेज (स्नातकोत्तर मराठी विभाग), सिव्हील लाईन्स, नागपूर - १९५१ - १९५९

(इ) विश्वविद्यालयीन : नागपूर विद्यापीठ विदेश भाषा विभाग - १९७५ ते १९७६

(ई) विदर्भ साहित्य संघ, परीक्षा विभाग - १९८३

४. शैक्षणिक पात्रता :

(अ) बी.ए. १९५५ नागपूर विद्यापीठ, उच्च द्वितीय श्रेणी, ५७ टक्के गुण

(आ) एम.ए. (मराठी) १९५९, नागपूर विद्यापीठ, प्रथम श्रेणीत प्रथम, ६४ टक्के गुण

(इ) पीएच.डी. (मराठी) नागपूर, विद्यापीठ १९६८

(ई) सर्टिफिकेट इन रशियन लँग्वेज, नागपूर विद्यापीठ १९७६, ६४ टक्के गुण

(ऊ) साहित्य वाचस्पती (डी.लिट्. समकक्ष पदवी), विदर्भ साहित्य संघ, नागपूर-१९८३

५. अध्यापन व्यवसाय :

(अ) विकास विद्यालय व विकास दिनान्त महाविद्यालय, नागपूर येथे अध्यापक १९५७-५९

(आ) बनारस हिंदू विश्वविद्यालय, बनारस अधिव्याख्याता, १९५९-६०

(इ) ना. गो. कृ. गोखले महाविद्यालय, कोल्हापूर, प्रोफेसर व विभागप्रमुख १९६०-६४

(ई) नागपूर विद्यापीठ, नागपूर अधिव्याख्याता - प्रपाठक-प्रोफेसर-विभागप्रमुख १९६४-१९९४

(उ) सांदीपनी विद्यालय, नागपूर, सन्माननीय अध्यापक, १९९४-९५

(ऊ) आय.ए.एस. शासकीय मार्गदर्शन केंद्र, नागपूर सन्माननीय प्राध्यापक १९९६-१९९७.

६. विशेष अध्यापन विषय : साहित्य शास्त्र

७. अध्यापन क्षेत्रातील प्रकल्प : अध्यापनकार्यात टेप-रेकॉर्डरचे उपयोजन-ज्ञानेश्वर,तुकाराम या विशेष संदर्भासह

८. संशोधनात्मक, समीक्षात्मक प्रकाशित ग्रंथ :

१) दुसरी परंपरा, १९७४, प्रभा प्रकाशन, नागपूर

२) महाकाव्य : स्वरूप व समीक्षा (प्रबंध) १९७५, विजय प्रकाशन, नागपूर

३) ज्ञानेश्वरांचे श्रोतृसंवाद, १९७६, अमेय प्रकाशन, नागपूर

४) पहिली परंपरा, १९७६, अमेय प्रकाशन, नागपूर

५) तिसऱ्यांदा रणांगण, १९७६, विजय प्रकाशन,

नागपूर

६) चार शोधनिबंध, १९७७, नागपूर विद्यापीठ प्रकाशन, नागपूर

७) पार्थिवतेचे उदयास्त, १९७७, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई

८) नाट्यवेध, १९७८, नूतन प्रकाशन, पुणे

९) मर्ढेकरांचे सौंदर्यशास्त्र : पुनःस्थापना, १९८२, अमेय प्रकाशन, नागपूर.

१०) प्रतीतिविश्राती, १९९२, विजय प्रकाशन, नागपूर

११) दोन परंपरा, १९९३, विजय प्रकाशन, नागपूर

१२) युगास्त्र, १९९३, लोकवाङ्मय गृह, मुंबई.

१३) द्विदल, १९९४, आंध्रप्रदेश मराठी साहित्य परिषद, हैदराबाद

१४) हिमवंतीची सरोवरे, १९९६, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई

१५) मराठी वाङ्मयाचा इतिहास,. खंड-४ (सहलेखक), १९६५, म.सा. परिषद, पुणे

१६) श्री. ना. रा. शेंडे : व्यक्ती आणि साधना (सहकायनि), १९६५, म.सा. परिषद, पुणे

१७) मराठी वाङ्मय कोश- प्राचीन खंड, (सहकायनि) १९७५, नागपूर विद्यापीठ, नागपूर

१८) देवदास आणि कोसला (प्रा. मृणालिनी पाटील यांचा शोधनिबंध-मार्गदर्शन व संपादन), १९८५, विजय प्रकाशन, नागपूर

१९) साहित्य समीक्षा परिभाषा कोश, (सहकार्यनि), १९८७, भाषा संचालनालय, मुंबई

२०) डॉ. अ. ना. देशपांडे स्मृतिग्रंथ, (सहकार्यनि) १९९३, अ. ना. देशपांडे स्मृति समिती, नागपूर

२१) भारताचार्य, (सहकार्यनि), १९९७, चिं. वि. वैद्य स्मृती समिति, नागपूर

२२) चौदावे रत्न, (पत्रकार टी. जी. देशमुख यांच्या स्वतंत्र विदर्भविषयक अग्रलेखांचा संग्रह), १९९७, म. पां. बनहट्टी प्रकाशन, नागपूर

२३) पहिल्यांदा रणांगण, १९९९, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई

२४) अपार्थिवाचे चांदणे, १९९९, पद्मगंधा प्रकाशन, पुणे

२५) महाकाव्य : स्वरूप व समीक्षा (प्रबंध), २००१ नवी परिष्कृत आवृत्ती, पद्मगंधा प्रकाशन, पुणे

२६) पस्तुरी, २००२, पद्मगंधा प्रकाशन, पुणे

२७) कादंबरी : स्वरूप व समीक्षा, २००३, पद्मगंधा प्रकाशन, पुणे

२८) मेरसोलचा सूर्य (कविता संग्रह), २००४, आकांक्षा प्रकाशन, नागपूर

२९) समीक्षेची सरहद्द, २००५, आकांक्षा प्रकाशन, नागपूर

३०) प्रतीतिभेद, २००७,आकांक्षा प्रकाशन, नागपूर

३१) जीएंची महाकथा, २००८, आकांक्षा प्रकाशन, नागपूर

३२) समीक्षेची वल्कले, २००८, पद्मगंधा प्रकाशन, पुणे

३३) ज्ञानेश्वरांची प्रतीतिविश्रांती (ज्ञानेश्वरी : नवे आकलन), २००८, ब्लू बर्ड (इंडिया), पुणे

३४) स्फटिकगृहीचे दीप, २००८, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई

३५) मर्ढेकरांचे सौंदर्यशास्त्र : पुनःस्थापना, २००९, पद्मगंधा प्रकाशन, पुणे

३६) अनन्यता मर्ढेकरांची,२००९ पद्मगंधा प्रकाशन, पुणे

९) संशोधन मार्गदर्शन

अ) २६ संशोधकांना पीएच.डी. पदवी प्राप्त; त्यात डॉ. यशवंत मनोहर, डॉ. ज्योती लांजेवार, डॉ. दा. स. गजघाटे इत्यादी नामवंत प्राध्यापक, डॉ. विनायक तुमराम यांच्यासारखा नामवंत आदिवासी कार्यकर्ता, डॉ. प्रभा गणोरकर, डॉ.सुलभा हेर्लेकर इत्यादी प्रसिद्ध कवयित्री, डॉ. सदाशिव कुळी, डॉ. प्रमोद मुनघाटे, डॉ. श्यामला मुजुमदार, डॉ. कल्पना व्यवहारे, डॉ. शकुंतला खोत, डॉ. संध्या अमृते, डॉ. ललिता साठे, डॉ. अंबादास असोलकर, डॉ. वीणा मुळे, डॉ. शुभांगी पातुरकर इत्यादी प्रसिद्ध संशोधकांचा समावेश.

आ) एम.ए. व एम.फिल पदव्यांसाठी पन्नासहून अधिक विद्यार्थ्यांचे शोधप्रबंध सादर व मंजूर

इ) सौ. शुभांगी आगलावे यांना वि. सा. संघाच्या 'साहित्याचार्य' या पीएच.डी. समकक्ष पदवीसाठी यशस्वी मार्गदर्शन

१०. शैक्षणिक-वाङ्मयीन सन्मान :

१) कै. ना. के. बेहरे सुवर्णपदक, नागपूर विद्यापीठ, १९५९

२) विदर्भ साहित्य संघ, नागपूर या संस्थेतर्फे डी.लिट्. समकक्ष पदवी 'साहित्य वाचस्पती', १९८३

३) 'समकालीन मराठी साहित्य : प्रवृत्ती आणि प्रवाह' हा अभिनंदन ग्रंथ विद्यार्थ्यांतर्फे पन्नाशीनिमित्त संपादित: संपादक-प्रा. मृणालिनी पाटील, डॉ. ज्योती लांजेवार, प्राचार्य धनकर; विजय प्रकाशन, नागपूर, १९८५
४) अमरावती विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषद, अध्यक्षपद, कारंजा (लाड), १९९०
नागपूर विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषद, अध्यक्षपद, नागपूर, १९९१
५) अखिल भारतीय मराठी उद्बोधन वर्गाचे प्रवर्तक, आयोजक व समन्वयक, १९८८
६) मुंबई, पुणे, शिवाजी, मराठवाडा इत्यादि विद्यापीठांत व्याख्यानमाला
७) मुंवई, पुणे, शिवाजी, मराठवाडा इत्यादि विद्यापीठांतील पीएच.डी. प्रबंधाचे परीक्षक
८) विद्यापीठ अनुदान आयोगातर्फे आयोजित विविध चर्चासत्रे व परिसंवाद यांत सहभाग, त्यांचे आयोजन
९) महाराष्ट्र शासनातर्फे 'उत्कृष्ट शिक्षक' पुरस्कार, १९९१
१०) नागपूर, पुणे, उस्मानिया इत्यादि विद्यापीठांच्या अभ्यासक्रमांत पाठ्यग्रंथ/संदर्भग्रंथ म्हणून अनेक ग्रंथाचा समावेश
११) मंगेशकर वाग्विलासिनी पुरस्कार (रू. पन्नास हजार), मुंबई
१२) 'मर्ढेकरांचे सौंदर्यशास्त्र : पुनःस्थापना' (१९८२), 'हिमवंतीची सरोवरे' (१९९६), 'पहिल्यांदा रणांगण' (१९९९), 'कादंबरी स्वरूप व समीक्षा (२००३), 'अंतरिक्ष फिरलो, पण...' (२००७) ग्रंथांस महाराष्ट्र शासनाचे उत्कृष्ट वाङ्मय पुरस्कार
१३) प्रतीतिविश्रांती (१९९३) ग्रंथास महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक, पुणे या संस्थेचा पुरस्कार
१४) कादंबरी : स्वरूप व समीक्षा' (२००३) या ग्रंथास महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे या संस्थेचा श्रेष्ठता ग्रंथ पुरस्कार
१५) न्यूयॉर्क हेरॉल्ड ट्रिब्यून, न्यूयॉर्क या वृत्तपत्रातर्फे आयोजित प्रौढांच्या खुल्या कथा स्पर्धेत वयाच्या एकोणिसाव्या वर्षी पुरस्कार
१६) मुंबई, पु. भा. भावे पुरस्कार, २००७
१७) अमृत महोत्सवी सत्कार : जुलै २००८
अ) नागपूर, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान
आ) नागपूर, धरमपेठ राजाराम वाचनालय
इ) पुणे, म. सा. परिषद
ई) सातारा, अक्षरधारा

पूर्ण पत्ता :
डॉ. द. भि. कुलकर्णी
वसुधा-ई-००४, डीएसके विश्व, ऑफ सिंहगड रोड, धायरी, पुणे - ४११०४१
फोन : (०२०) २४३८०८९४

अनुक्रमणिका

आरंभकालीन मराठी वाङ्मयेतिहासलेखन आणि 'महाराष्ट्र सारस्वत'

डॉ. द. दि. पुंडे

*[११० वर्षांपूर्वी मराठी वाङ्मयेतिहासकारात अग्रपूजेचा मान ज्यांना दिला जातो ते 'महाराष्ट्र सारस्वत'कार **श्री. वि. ल. भावे** यांनी १८९८ साली आपल्या इतिहासप्रज्ञेने, संशोधक दृष्टीने आणि संस्कृतिसापेक्ष परिशीलनाने मराठी वाङ्मयेतिहासलेखनाचा पाया घातला. निव्वळ लेखननिष्ठेने आणि **पदरच्या अर्थार्जनाने** त्यांनी हे ऐतिहासिक कार्य केले. याच वर्षात **इतिहासाचार्य राजवाडे** यांनी 'मराठ्यांच्या इतिहासाची साधने' ह्या बावीस खंडात्मक बृहत् इतिहासलेखनाचा पहिला खंड. **स्वखर्चानेच** १९९८ साली छापून काढला; आणि **रियासतकार सरदेसाई** यांच्या रियासतीच्या २२ खंडांपैकी 'मुसलमानी रियासत' हा पहिला खंड प्रसिद्ध झाला. तसेच परिगणन, वर्गीकरण आणि व्यवस्थापन (निष्कर्ष) ह्या त्रिसूत्रीच्या शास्त्रशुद्ध पायावर **न्यायमूर्ती रानडे** यांनी 'A note on the Growth of Marathi Literature 1898' हा मराठी वाङ्मयाच्या अभिवृद्धीचा मीमांसक वेध घेणारा प्रबंध लिहिला; आणि विद्यापीठीय अभ्यासक्रमात मराठी विषयाचा अंतर्भाव करण्याची यशस्वी चळवळ केली. याने प्रेरित होऊन **कै. ल. रा. पांगारकरांनी** १९९८ याच वर्षात 'मराठी भाषेचे स्वरूप' हा दीर्घ निबंध लिहिला. मराठी मातृभाषा नसलेले **श्री. मोती बुलासा** यांनी आपल्या 'सुविचार समागम' नावाच्या मासिकासाठी लिहिलेल्या 'मराठी भाषेची सद्यःस्थिती' या विषयावरील सात लेखांपैकी पहिला लेख १९९८ सालीच प्रसिद्ध केला. मराठी वाङ्मयेतिहासलेखनाचे हे पायाभूत जुने इतिहासलेखन डॉ. द. दि. पुंडे यांच्या साक्षेपी–अभ्यासू लेखणीतून उतरले आहे. मराठी वाङ्मयाच्या इतिहासाचा ७वा खंड महाराष्ट्र साहित्य परिषदेने नुकताच प्रकाशित केला आहे. या पार्श्वभूमीवर हा लेख उद्बोधक आहे; कारण 'जुने इतिहासलेखन हे नव्या इतिहासलेखनाची सामग्री असते.' याची प्रस्तुत लेखकाने दिलेली जाणीव उद्बोधक आहे.*

– संपादक]

"I do not know why this branch of learning has suffered the unfortunate fate of not having admirers and practitioners who up to now ever thought of producing a History of History worth reading."

- J. C. Gatterer[१]

१९८८ या सालाला खरोखर काही तरी विशेष महत्त्वच असावे असे वाटते. कारण याच एका सालात मराठी वाङ्मयाच्या इतिहासासंबंधाने लेखन करण्याचे एकदम पाच प्रयत्न झालेले दिसतात. कै. वि. ल. भावे, कै. न्यायमूर्ती म. गो. रानडे, कै. ल. रा. पांगारकर, कै. ग. ज. आगाशे आणि कै. प्रो. मोती बुलासा या पाच मंडळींनी मराठी वाङ्मयासंबंधाने ऐतिहासिक लेखन केलेले आहे. हे पाच लोक म्हणजे जणू आरंभकालीन मराठी वाङ्मयेतिहासालेखनाचे पंचप्राणच होत.

या १८९८ साली आणखीही एक महत्त्वाची घटना घडलेली आहे. ती म्हणजे मराठीतील इतिहास-लेखनाचे दोन महाप्रकल्प याच वर्षी सुरू झाले. इतिहासाचार्य राजवाडे यांनी 'मराठ्यांच्या इतिहासाची साधने' गोळा करण्याचा आणि त्यावरील आपली निरीक्षणे व निष्कर्ष नोंदविण्याचा प्रचंड खटाटोप एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस सुरू केला होता. त्यांनी 'मराठ्यांच्या इतिहासाची साधने' या प्रकल्पांतर्गत एक-दोन नव्हे, तर एकूण २२ खंड प्रसिद्ध केलेले आहेत, हे सर्वांना माहिती आहेच. या त्यांच्या महाकाय प्रकल्पातील पहिला खंड १८९८ साली प्रकाशित झालेला आहे. स्वतः राजवाडे यांनीच तो आपल्या स्वतःच्या खर्चाने छापून काढला आहे. राजवाडे यांच्याप्रमाणेच इतिहासाचा आणखी एक महाकाय प्रकल्प राबविणारे दुसरे विद्वान म्हणजे रियासतकार गो. स. सरदेसाई. सरदेसायांनी आपल्या 'रियासतीं'चे एकूण १२ खंड प्रसिद्ध केले. यातला 'मुसलमानी रियासत' हा पहिला खंडदेखील १८९८ सालीच प्रसिद्ध झालेला आहे. अशा रीतीने राजवाडे-सरदेसाई या दोन प्रज्ञावंतांच्या प्रयत्नामुळे मराठीतील

इतिहासलेखनाची जी टोलजंग इमारत उभारली गेली, तिचा पाया १८९८ या सालातच घातला गेला. (त्यामुळे १८९८ हे साल जसे मराठी वाङ्मयेतिहासलेखनाचे शताब्दीचे वर्ष आहे, तसेच ते मराठी इतिहासलेखनातील या दोन वृहद्-प्रकल्पांच्या शताब्दीचेही वर्ष आहे.)

१८९८ साली एकाच वेळी एकदम पाच विद्वान अभ्यासकांनी मराठी वाङ्मयाचे ऐतिहासिक पर्यालोचन करावे, हा एक विलक्षण योगायोग आहे; परंतु ज्ञानाच्या क्षेत्रात, विद्येच्या प्रांगणात कोणतीही गोष्ट 'केवळ योगायोग' आहे, असे म्हणून सोडून देता येत नसते. एरव्हीही योगायोगांमागील कारणमीमांसा आपण शोधत राहतोच. विद्येच्या क्षेत्रात जेव्हा योगायोगांचे प्राबल्य दिसू लागते, तेव्हा त्या योगायोगांमधील शास्त्र वा तर्कशास्त्र शोधणे क्रमप्राप्तच असते. संपूर्ण इतिहासशास्त्र तर केवळ "the interconnectedness of events" या एकाच गृहीतकावर आधारलेले आहे. जर्मन इतिहासवेत्ते लुडविग वॉचर (Ludwig Wachler) यांचा एकूण वैचारिक कल "...to relate the historical writing of a given period to the geneal intellectual climate of the age..." कडे असे.[२] याच एका दृष्टीने १८९८ या सालाचे वाङ्मयेतिहासलेखनाच्या संदर्भातील असाधारण महत्त्व संशोधिणे गरजेचे आहे. आपल्याला इतिहासामध्ये, क्वचित का होईना, स्वारस्य असते; परंतु इतिहासलेखनाच्या इतिहासामध्ये आपण क्वचितदेखील जिज्ञासा बाळगत नाही, असे एकूण चित्र दिसते. मग मराठी वाङ्मयेतिहासलेखनाचा इतिहास पाहण्याची कोणाला बुद्धी होईल अशी सुतराम आशा नाही. एखाद्या राष्ट्रात एकूण इतिहासलेखन कसकसे घडत गेले, हीच एक गोष्ट अभ्यासिली तर त्या राष्ट्राच्या बौद्धिक वाटचालीचे महत्त्वमापन करता येईल. पण असे कोठे घडताना दिसत नाही. जर्मन विद्वान जे. सी. जॅटरर (J. C. Gatterer) यांच्या वर उद्धृत केलेल्या विधानाचा इत्यर्थ आता कळावा. इतिहासाचा इतिहास लिहिला जाणे अगत्याचे आहे, तद्वतच वाङ्मयेतिहासाचा इतिहासही लिहिला जाणे अगत्याचे आहे.

म्हणूनच मराठी वाङ्मयेतिहासलेखन कसकसे घडत (आणि बिघडतही) गेले याचा अभ्यास होण्याची गरज आहे. कारण अशा अभ्यासाद्वाराच मराठी वाङ्मयीन संस्कृतीचे एकूण संचित हाती येईल; गेल्या शंभर वर्षांत आपण काय कमावले आणि काय गमावले याचा एक नीटस ताळेबंद मांडता येईल. अशा संचितशोधनाची नितांत गरज आहे हे वेगळे सांगायला नकोच. डॉ. गणेश देवी म्हणतात, "Literary history reflects the values of the society in which the historian lives, or for which he writes."[३] गतशतकातली आपली मूल्यप्राप्ती जोखण्यासाठी वाङ्मयेतिहासांचा इतिहास तपासणे आवश्यक ठरेल.

या संचितशोधनास कुठेतरी प्रारंभ व्हावा म्हणूनच ''आरंभकालीन मराठी वाङ्मयेतिहास लेखन व 'महाराष्ट्र-सारस्वत' '' हा अल्पावकाशी विषय नमुन्यादाखल स्वीकारलेला आहे.

२

''इतिहासाला पहिले पान नसते'' हे वचन सुप्रसिद्धच आहे. त्यामुळे भावेप्रभृतींच्या प्रयत्नांपूर्वी म्हणजे १९८९ पूर्वी मराठी वाङ्मयेतिहासलेखनाचे काही प्रयत्न झाले का, याचा शोध घेणे कर्तव्य ठरते.

मराठी वाङ्मयाला सात शतकांची परंपरा आहे आणि या वाङ्मयप्रवाहाचे आपण मध्ययुगीन मराठी वाङ्मय (आरंभ ते १८१८) आणि आधुनिक मराठी वाङ्मय (१८१८ ते आजपर्यंत) असे विभाग कल्पितो. मध्ययुगात इतिहासलेखन कल्पना एकूण अनुपस्थित होती. चरित्रलेखनांची मात्र परंपरा होती. आरंभकालीन वाङ्मयेहितास हे लेखक व त्यांच्या लेखनकृती यांची कालक्रमानुसार माहिती देणारे इतिहास होत, ही गोष्ट इंग्रजीसह सर्व भाषांतील वाङ्मयेतिहासग्रंथांत दिसून येते. या दृष्टीने आपण महिपतीबोवा ताहराबादकर यांना पहिले मराठी वाङ्मयेतिहासकार म्हणू शकू, असे वाटते. कारण इतिहासलेखनात कालक्रम (chronolgy) महत्त्व धारण करतो आणि महिपतीबोवा 'संतलीलामृत' (इ. स. १७६७) या आपल्या ग्रंथात

आधील मागील कोणते संत ।
हे तरी मी नेणोचि सत्य ।

असे म्हणतात. अर्थात कालक्रमाचे महत्त्व ते जाणत होते. पुरेशा माहितीअभावी, व्यासंगाअभावी त्यांना कालक्रम सांभाळता आलेला नाही, हे स्पष्टच आहे. तथापि संत व त्यांच्या रचना यांचा ऐतिहासिक वेध घेणे हे

काही महिपतीबोवांच्या रचनांचे प्रयोजन नव्हते. ''ईश्वरसंतोष आणि भगवद्गुणवर्णन ही काव्याची मुख्य प्रयोजने महिपतींना अभिप्रेत होती. या प्रयोजनांच्या अनुषंगानेच त्यांनी संतांच्या व भक्तांच्या चरित्रांचे लेखन केले.''[४] ''भक्तीसि लागतील बहुजन'' हे त्यांच्या रचनांमागील प्रयोजन होते.

''संतचरित्रकार जेव्हा जेव्हा काही विधाने करतात, तेव्हा तेव्हा ती विधाने नसून, तो एका परंपरेचा निर्देश असतो'', असे डॉ. म. रा. जोशी म्हणतात.[५] हाही एक विचार महिपतींसारख्यांच्या रचनांकडे इतिहास म्हणून पाहण्यास पुष्टी देणारा आहे. कारण लेखक किंवा रचनाकार ज्या समाजातून आलेला असतो तो समाज, त्याची परंपरा आणि त्या समाजाची वाङ्मयविषयक धारणा ही वाङ्मयेतिहासरचनेची पायाभूत त्रिसूत्री होय.

महिपतींची रचना जरी वाङ्मयेतिहास म्हणून स्वीकारता आली नाही, तरी मध्ययुगातील दोन स्फुट रचना संक्षिप्त स्वरूपाचे वाङ्मयेतिहासलेखन म्हणून नक्कीच स्वीकारता येतील. त्यातील पहिली संत बहिणाबाईंची आहे. ती रचना अशी आहे-

संतकृपा झाली । इमारत फळा आली ॥
ज्ञानदेवें रचिला पाया । उभारिलें देवालया ॥
नामा तयाचा किंकर । तेणें रचिलें ते आवार ॥
जनार्दन एकनाथ । खांब दिला भागवत ॥
तुका झालासे कळस । भजन करा सावकाश ॥
बहिणी म्हणे फडकती ध्वजा । निरूपणा केलें वोजा ॥

आपल्या असे लक्षात येईल की, वारकरी संप्रदायातील संत, त्यांचे वाङ्मय आणि त्या वाङ्मयाचा सामाजिक (धार्मिक) परिणाम या तिन्ही गोष्टी संत बहिणाबाईंनी इथे निर्देशित केलेल्या आहेत. पुन्हा कालक्रमाचे तत्त्वही सांभाळले गेले आहे. त्यामुळे बहिणाबाईंची ही रचना मराठी वाङ्मयेतिहासलेखनाची पहिलीवहिली पाऊलखूण म्हणून स्वीकारता येते.[६]

दुसरी रचना मोरोपंतांना समकालीन असणाऱ्या राम बडवे यांची आहे. (यांच्या जन्ममृत्यूचे सन व चरित्रात्मक माहिती उपलब्ध नाही.) ती रचना अशी आहे-

ओवी ज्ञानेशाची अभंगवाणी प्रसिद्ध तुकयाची ।
सुश्लोक वामनाचा तैशी आर्या मयूरपंतांची ॥

वाङ्मयेतिहासाच्या तत्त्वज्ञानाचे आर. एस. क्रेन (१८८६-१९६७) नावाचे एक अभ्यासक होत. त्यांनी वाङ्मयेतिहास हा केवळ वाङ्मयच केंद्रस्थानी ठेवून लिहिला जावा, अशा स्वरूपाची भूमिका घेतली आहे आणि साहजिक मग वाङ्मयाचा इतिहास म्हणजे वाङ्मय-रूपांच्या स्वायत्त विकासाचा इतिहास होय, असा सिद्धांत आपल्या 'Critical and Historical Principles of Literary History' या ग्रंथात मांडला आहे. या दृष्टीने राम बडवे यांची वरील आर्या म्हणजे मध्ययुगीन मराठी वाङ्मयाचा रूपलक्षी इतिहासच म्हणता येईल. अर्थात या आर्येत मध्ययुगातली सगळी वाङ्मयरूपी आलेली नाहीत.[७] मात्र मध्ययुगीन मराठी रचनांमधील प्रभुत्वशाली रूपांची संक्षिप्त नोंद राम बडवे यांनी अचूक केली आहे, यात संदेह नाही. त्यामुळे ही रचना म्हणजे मराठी वाङ्मयेतिहासलेखनाची चिमुकली का होईना, पण एक पाऊलखूण म्हणायला हरकत नाही.

मध्ययुगीन कालखंडातील इतिहासकल्पना केवळ चरित्रांच्या अंगाने जाणारी असतानाही संत बहिणाबाई आणि राम बडवे यांनी काही एक वेगळेपण दाखवून संक्षिप्त ऐतिहासिक काव्यरूप टिपण केले एवढ्यापुरताच येथील विचार आहे.

३

इतिहास हे एक स्वतंत्र ज्ञानक्षेत्र म्हणून भारतात एकोणिसाव्या शतकात अव्वल इंग्रजीच्या काळात उदय पावले, ही गोष्ट सर्वज्ञातच आहे. पाश्चात्त्यांची इतिहासकल्पना ध्यानात घेऊन येथे इतिहाससंशोधन आणि इतिहासलेखन सुरू झाले. एका बाजूने खरे, पारसनीस, साने, राजवाडे, सरदेसाई, वि. ल. भावे यांच्यासारखी मंडळी इतिहास-साधनांचे संशोधन व संग्रह करण्याकरिता तन-मन-धन वेचीत होती आणि दुसऱ्या बाजूने भारत इतिहास संशोधक मंडळसारख्या खास स्थापन केलेल्या संस्था प्रमाणित इतिहास तयार करण्यासाठी झटत होत्या. केवळ इतिहास विषय व इतिहास-संशोधन यांना वाहिलेली कितीतरी नियतकालिके एकोणिसाव्या शतकाच्या अंतिम चरणात कार्यरत होती. अन्य नियतकालिकेही इतिहास विषयाला व संशोधनाला आवर्जून प्राधान्य देत होती. असे असतानाही मराठी वाङ्मयाच्या इतिहासासंबंधाने

१८९८ पर्यंत दोन-चार सुद्धा नाव घेण्यासारखे लेख लिहिले गेले नाहीत, ही परिस्थिती खेदजनकच म्हणायला हवी.

'कविचरित्र म्हणजे हिंदुस्थानातील प्राचीन व अर्वाचीन कवी आणि ग्रंथकार यांचा इतिहास' असे लांबलचक नाव असलेला ग्रंथ १८६० साली प्रसिद्ध झालेला आहे. जनार्दन रामचंद्रजी असे त्याच्या कर्त्याचे नाव आहे. ''ग्रंथात माहिती दिली आहे ती शंकराचार्य, कालिदास, वररूची, भास्कराचार्य इत्यादींपासून थेट वाळशास्त्री जांभेकरांपर्यंतच्या अनेक क्षेत्रातल्या व्यक्तींची.''[८] यावरून हा वाङ्मयेतिहास गोपाळकाल्यासारखा असल्याचे कळते. 'मराठी ज्ञानप्रसारका'ने या ग्रंथावर प्रतिकूल परीक्षण दिलेले आहेच.[९] भाषेची आत्यंतिक अशुद्धता, प्रतिपाद्य विषयासंबंधीचे कमालीचे अज्ञान आणि कर्त्याचा असमंजसपणा व अप्रवुद्धता यांमुळे हा ग्रंथ केवळ निरूपयोगी ठरलेला आहे. वाङ्मयेतिहास म्हणजे काय याची जराही जाण यातून व्यक्त होत नसल्याने या ग्रंथास वाङ्मयेतिहास तर म्हणता येत नाहीच, पण वाङ्मयेतिहासलेखनाची पुसटशी पाऊलखूणही म्हणता येत नाही.

'मराठी ज्ञानप्रसारक' या नियतकालिकात नोव्हेंबर १८६१ मध्ये वि. ना. पा. या नावानिशी ''मराठी कवी आणि कविता'' हा लेख आलेला आहे. या लेखामध्ये ''मुकुंदराज, शंकराचार्य, नामदेव, ज्ञानदेव इत्यादींविषयी माहिती देऊन त्यानुसार त्यांची कालनिश्चिती केली आहे. यातून या लेखकाचे परिश्रम व त्याची चिकित्सक दृष्टी यांचा प्रत्यय येतो. ज्ञानदेव व नामदेव या संतांचे श्रेष्ठत्व हे केवळ त्यांच्या वाङ्मयावरून ठरत नसून त्या काळात निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे त्यांचे श्रेष्ठत्व सिद्ध झाले आहे, अशा प्रकारचा विचार यात दिसून येतो. आपल्या प्रत्येक विधानाची सत्यता पटवून देण्यासाठी हा लेखक उदाहरणे देत जातो. शंकराचार्य व मुकुंदराज हे दोघे अदमासे एकाच वेळी झाले असावेत, असे आपले मत मांडताना मुकुंदराज हे इ.स. १००० च्या आसपास होऊन गेले व पूर्वेकडील युरोपियन ग्रंथकार लिहितात, की शंकराचार्य अदमासे १००० च्या सुमारास झाला. या माहितीचा आधार घेऊन या लेखकाने मांडलेले वरील मत हे निश्चितच वरवरचे वाटत नाही. त्याचप्रमाणे या दोघांच्याही लेखनात (साहित्यात) विठोबाचा उल्लेख नाही. कारण पंढरपूरचे मंदिर व इतर अनेक मंदिरे त्या वेळी बौद्धांच्या ताव्यात होती. बौद्ध धर्माचा बीमोड झाल्यावर ती ब्राह्मणांच्या ताव्यात आली व पंढरपूर येथील पुंडलीक ब्राह्मणाने विठोबाची स्थापना केली आणि म्हणून मुकुंदराजानंतर ३०० वर्षानंतर झालेल्या ज्ञानदेव, नामदेव या संतांच्या वाङ्मयात विठ्ठलाचा उल्लेख आहे.''[१०] हे विवेचन आज जरी पूर्णपणे चुकीचे ठरत असले, तरी त्यांची अनुमानपद्धती शास्त्रीय व वाङ्मयेतिहासकाराला शोभणारी अशीच होती, हे लक्षात येते. म्हणूनच वि. ना. पा. च्या या प्रयत्नाला वा. ल. कुलकर्णी यांनी ''प्राचीन मराठी वाङ्मयाकडे ऐतिहासिक दृष्टिकोनातून पाहण्याचा हा एक उल्लेखनीय प्रयत्न आहे'' असे म्हटले आहे.[११] मराठी वाङ्मयेतिहासलेखनाचा एकोणिसाव्या शतकातला हा पहिलावहिला निबंधवजा प्रयत्न होय.

पण या निबंधाच्या अगोदर असाच एक मराठी कवितेची ऐतिहासिक मीमांसा असणारा निबंध आहे. मात्र तो इंग्रजीत आहे. रेव्हरंड जे. स्टीव्हन्सन यांनी 'जर्नल ऑफ दी बॉम्बे ब्रँच ऑफ रॉयल एशियाटिक सोसायटी'मध्ये "An Essay on the Vernacular Literature of the Marathas." या नावाचा निबंध लिहिलेला आहे. तो या जर्नलच्या जुलै १८४१ च्या अंकात प्रसिद्ध झालेला आहे. या नावाचा निबंध लिहिलेला आहे. तो या जर्नलच्या जुलै १८४१ च्या अंकात प्रसिद्ध झालेला आहे. या निबंधाबद्दलची माहिती श्री. म. पिंगे यांच्या 'युरोपीयनांचा मराठीचा अभ्यास व सेवा' (१९५९) या ग्रंथात मिळते. डॉ. पिंगे लिहितात, ''... मराठी वाङ्मयाची तुलना जरी युरोपियन वाङ्मयाशी होणार नाही, तरी आपण समजतो त्याप्रमाणे ते पाठीमागे नाही असेही स्टीव्हन्सनने या लेखात म्हटले आहे. मराठ्यांचे मुख्य वाङ्मय प्राकृत बोलीत आहेत, असे तो म्हणतो...

''...स्टीव्हन्सनने प्राकृत कवींची नावे व त्यांची माहिती दिली आहे. सर्वांत जुना प्राकृत लेखक नामदेव होय, असे त्याने सांगितले आहे. त्यानंतर जनाबाई. मुक्ताबाई, ज्ञानोबा, श्रीधर, आत्मनायक नामक महार.

अनुक्रमणिका

तुकाराम (The most Pracrit writer of eminence), रामदास, वामन व मोरोपंत यांची माहिती दिली आहे.

''हा लेख लिहिण्याचा हेतू स्टीव्हन्सनने पुढीलप्रमाणे सांगितला आहे-

"I should wish to see the attention of learned natives directed to a selection of some of the best of the pieces abovementioned, for the purspose of having two or three volumes accurately printed, with an index of difficult words for the sake of beginners. The study of these authors whould improve the style of Maratha composition which is in danger at present, from an almost exclusive attention to foreign literature."[१२]

पिंगे यांनी दिलेल्या वरील माहितीवरून आपल्या हे लक्षात येते की, रे. स्टीव्हन्सन यांचा मराठी कवीसंबंधीचा कालक्रम चुकला असला, तरी मराठी कवितेचे आकलन चुकलेले नव्हते. त्यांचे आकलन जराही चुकलेले नव्हते ही गोष्ट त्यांनी तुकाराम महाराजांना "The most Pracrit writer of eminenece" म्हटलेले आहे, यावरूनही सहज ध्यानात येते. मराठी वाङ्मयाने ''देशीपणा''ला चिकटून राहावे असे डॉ. भालचंद्र नेमाडे यांच्या अगोदर थेट १५० वर्षांपूर्वी रे. स्टीव्हन्सन यांनी म्हटलेले आहे, ही गोष्टदेखील जाता जाता मुद्दाम अधोरेखित करावीशी वाटते.

मराठी संत वाङ्मयाचे ऐतिहासिक परामर्श घेण्याचे अर्धेमुर्धे आणखी एक-दोन प्रयत्न इंग्रजीत झालेले आढळतात. 'Ballads of Marathas' या आपल्या ग्रंथाच्या प्रस्तावनेत ॲक्वर्थ यांनी संतवाङ्मयाबद्दल लिहिले आहे. लिओनार्ड जॉन सेज्विक यांनी 'Bhakti' हा एक लेख लिहून संतवाङ्मयाची ओळख करून दिली आहे. सेज्विक यांचे संतवाङ्मयाविषयी फार चांगले मत होते,'' अशी माहिती प्रा. श्री. प. पिंगे देतात.[१३]

'The Journal of the Bombay Branch of Royal Asiatic Society' हे मराठी वाङ्मयाच्या अभ्यासाच्या दृष्टीने महत्त्वाचे नियतकालिक असल्याचे जाणवते. त्यामध्ये काही इंग्रजी भाषक विद्वान अभ्यासकांनी मराठी वाङ्मयावर समीक्षणात्मक किंवा ऐतिहासिक स्वरूपाचे लेखन केलेले आहे. उदाहरणार्थ या जर्नलच्या जानेवारी १८४९ च्या अंकात "Marathi Works Composed by Portuguese" हा लेख प्रसिद्ध झालेला आहे. ''या लेखात उत्तर कोकणात पोर्तुगिजांनी मराठी वाङ्मयाचे जे कार्य केले त्याची माहिती देण्यात आली आहे. स्कॉटिश मिशनच्या स्थापनेपासून तो मरे मिचेल यांच्यापर्यंत त्या मिशनमधील मिशनरींनी मराठीत जे वाङ्मयकार्य केले त्याचे विवेचन... केले आहे'', असे प्रा. पिंगे या लेखासंबंधाने म्हणतात.[१४] हा लेख म्हणजे एक प्रकारे पंथीय वाङ्मयेतिहासाचा आरंभबिंदूच होय.

तथापि एकोणिसाव्या शतकातील हे सारे स्फुट लेखन केवळ ऐतिहासिक जिज्ञासा या सदरात मोडणारे आहे. वाङ्मयेतिहासलेखनाचा प्रयत्न म्हणून त्यांना जराही महत्त्व देता येत नाही.

मात्र १८९८ पूर्वीच्या एका इंग्रजी निबंधास वाङ्मयेतिहासलेखनाचा दर्जा अवश्य प्राप्त होतो आणि तो निबंध म्हणजे न्यायमूर्ती म. गो. रानडे यांचा "Remarks on the Marathi Portion of the Catalogue" हा होय. सर अलेक्झांडर ग्रँट यांनी दिलेल्या आदेशानुसार तयार केलेल्या "Catalogue of Native Publications in the Bombay Presidency upto 31st December 1864" या ग्रंथातील मराठी पुस्तकासंबंधीचा हा लेख आहे. द रॉयल एशियाटिक सोसायटी ऑफ ग्रेट ब्रिटन अँड आयर्लंड या संस्थेने दी सेक्रेटरी ऑफ स्टेट फॉर इंडिया यांना १८६३ मध्ये एका पत्राद्वारे असे कळविले होते, की हिंदुस्थानात प्रसिद्ध होणाऱ्या पुस्तकांची माहिती युरोपीय अभ्यासकांना मिळण्याच्या दृष्टीने आजवरच्या प्रकाशित पुस्तकांची यादी करून पाठवावी; तसेच येथून पुढेही तिमाही यादी पाठविली जावी. या विनंतीनुसार १८१८ ते १८६४ या काळात प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांची यादी सर अलेक्झांडर ग्रँट यांच्या देखरेखीखाली तयार करण्यात आली. त्यातील मराठी ग्रंथांसंबंधीचा अभिप्राय (Remark) लिहिण्याचे काम न्यायमूर्ती रानडे यांच्यावर सोपविलेले होते. या अभिप्रायात रानडे यांनी आधुनिक

मराठी वाङ्मयाचा क्रमविकास कसकसा होतो आहे हे तर दिग्दर्शित केलेले आहेच, परंतु भविष्यकालीन मराठी वाङ्मय हे अभिवृद्ध असेल, अशी आशावादी दृष्टी ठेवली आहे. ते लिहितात, "The present is full of promise, and there is every likelyhood that before long the Marathi language will be in a position to take the first rank among the cultivated languages of modern India."[१५]

या निबंधात मराठी वाङ्मयाकडे ऐतिहासिक-वर्णनात्मक दृष्टीने कसे पाहावे याचे सूतोवाच केलेले आहे. हा निबंध इंग्रजीत असला, तरी मराठी वाङ्मयेतिहासलेखनाची आरंभकालीन दिशा समजण्याच्या दृष्टीने तो एक महत्त्वाचा दस्तावेज आहे. वाङ्मयेतिहासकाराने पूर्वपरंपरेचा शोध घ्यायचा असतो, विचाराधीन कालखंडातल्या वाङ्मयाच्या स्थितिगतीसंबंधाने निरीक्षणे मांडायची असतात आणि वाङ्मयप्रवाहाची भविष्यकालीन दिशा कशी असेल, कशी असावी या संबंधाने निदाने करावयाची असतात. न्या. रानडे यांनी १८६६ च्या आपल्या पहिल्या आढाव्यात हे सारे केलेले आहे. हा आढावा जरी इंग्रजीत असला आणि याची प्रेरणा जरी एतद्देशीय नसली, तरी या आढाव्याला न्या. रानडे यांच्या प्रज्ञेचा परीसस्पर्श झालेला आहे. त्यामुळे हा आढावा म्हणजे मराठी वाङ्मयेतिहासाची पहिली खरीखुरी पाऊलखूण होय.

४

सुरूवातीस नमूद केल्याप्रमाणे मराठी वाङ्मयाच्या इतिहासलेखनाचे खरेखुरे प्रयत्न १८९८ या एकाच वर्षी सुरू झाले. या पंचविध प्रयत्नांमध्ये कै. वि. ल. भावे यांचा 'महाराष्ट्र सारस्वत' हा ग्रंथ प्रेरणा, उद्दिष्टे व स्वरूप यांमुळे वेगळा दिसतो. न्यायमूर्ती रानडे प्रभृतींचे प्रयत्न एका गटात गोवता येतात. प्रथम त्यांचा विचार करावासा वाटतो. यातही न्या. रानडे यांच्याच लेखनाचा सर्वप्रथम विचार करणे क्रमप्राप्त ठरते. कारण पांगारकर, आगाशे आणि मोती बुलासा या सर्वांच्या लेखनामागील प्रेरणा म्हणजे न्यायमूर्तींचा इंग्रजी निबंधच होय.

न्या. रानडे यांनी आधुनिक मराठी वाङ्मयाचा ऐतिहासिक आढावा घेणारा जो दीर्घनिबंध लिहिला, तो मुळात इंग्रजीत असून "A Note on the Growth of Marathi Literature 1898" असे त्याचे शीर्षक आहे.[१६] या निबंधाच्या मागे एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस गाजलेला "मुंबई विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात मराठीची प्रस्थापना" हा वाद आहे. हा वाद आपणा सर्वांना माहिती आहे आणि या वादासंबंधीचा तपशील अन्यत्र उपलब्धही आहे.[१७] येथे एवढेच नमूद करावयाचे आहे की, मराठी व अन्य देशी भाषांचा समावेश मुंबई विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात असलाच पाहिजे अशी आग्रहाची भूमिका न्या. रानडे यांनी घेतली व त्यासाठी त्यांनी सतत ४० वर्षे अथक परिश्रम केले; त्यांनी जणू एक चळवळच उभारली. अखेर २९ जानेवारी १९०१ रोजी विद्यापीठाच्या सभेत ठराव मंजूर होऊन न्यायमूर्तींच्या प्रयत्नांना यश आले (दुर्दैव असे की तत्पूर्वी थोडेच दिवस अगोदर म्हणजे १६ जानेवारी १९०१ रोजी न्यायमूर्ती रानडे निधन पावले.) प्रस्तुत इंग्रजी निबंध हा रानडे यांनी उभारलेल्या चळवळीचाच एक व्यूह होय. मात्र चळवळीचा एक व्यूह असूनही हा निबंध अभ्यासपूर्ण आहे. रानडे यांची इतिहासप्रज्ञा त्यातून दिसते.

या निबंधात १८६५ ते १८९६ मधील मराठी

अनुक्रमणिका

वाङ्मयाच्या अभिवृद्धीचा मीमांसक वेध घेतलेला आहे.

न्या. रानडे यांनी १८१८ ते १८६६ मधील मराठी ग्रंथाचा पूर्वी आढावा घेतलेला होताच. त्याचे पुनः परीक्षण प्रस्तुत निबंधाच्या पहिल्या भागात आहे. निबंधाच्या दुसऱ्या भागात मध्ययुगीन वाङ्मयाचे परिशीलन आहे. तिसऱ्या भागात भाषांतरित व रूपांतरित वाङ्मयाची चर्चा आहे; तर चौथ्या भागात नाटके, कादंबऱ्या आणि निबंधवाङ्मय यांबाबतची अवलोकने आहेत. शेवटच्या पाचव्या भागात न्या. रानडे यांनी स्वतःची निरीक्षणे व निष्कर्ष मांडलेले आहेत. या आपल्या लेखाला न्या. रानडे यांनी "पाच अथवा अधिक तज्ज्ञ लेखकांनी व टीकाकारांनी शिफारस केलेल्या" साठ प्रमाणग्रंथांची यादी जोडलेली आहे.[१८]

परिगणन, वर्गीकरण आणि व्यवस्थापन (निष्कर्ष) या आरंभकालीन वाङ्मयेतिहासलेखनाच्या तिन्ही पायऱ्या न्या. रानडे यांनी आपल्या १८९८ च्या या निबंधात शिस्तशीर पद्धतीने क्रमल्या आहेत. १८६५ ते १८९६ या ३२ वर्षांच्या कालावधीत प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांचे परिगणन त्यांनी केले. त्यांची संख्या ८४९७ भरते. त्यात १८६५ अगोदरच्या पन्नास वर्षातल्या ६६१ ग्रंथांची भर घालून एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस मराठी ग्रंथांची संख्या ९१५८ इतकी लक्षणीय ठरते, हे न्या. रानडे लक्षात आणून देतात. या ग्रंथाचे ते वाङ्मयप्रकारांनुसार वर्गीकरण करतात. त्याकरिता त्यांना नव्याने वाङ्मयप्रकार कल्पावे लागले, ज्या काळात वाङ्मयप्रकाराची संकल्पनाच आकारास आलेली नव्हती, तेव्हा न्यायमूर्तींनी वाङ्मयप्रकार कल्पून त्यानुसार मराठी ग्रंथांचे वर्गीकरण केले. न्या. रानडे यांचे निष्कर्ष किती परिणतप्रज्ञ होते हे पुढील एकच उदाहरण पाहिले तरी कळेल. ते लिहितात, "सांप्रत काव्य-प्रतिभेचा सकृद्दर्शनी जो ऱ्हास झाल्याचे दिसून येते, त्यामागील अनेकानेक कारणांपैकी एक कारण म्हणजे बुद्धिमंतांची बुद्धी दोन अभिजात भाषांच्या सक्तीच्या अध्ययनात खर्च होऊन त्यांच्या आयुष्याच्या वसंतकालातील जोम त्यातच व्यतीत होऊन जातो व त्यांच्या मनोबुद्धीच्या स्वाभाविक विकासात व्यत्यय येतो. साहजिकच आपल्या राष्ट्रीय ज्ञानभांडाराविषयी ते सर्वस्वी अनभिज्ञ राहतात. काही म्हटले तरी आमच्या तरुण पिढीने अभिजात भाषेतील व इंग्रजीतील आदर्शांच्या अध्ययनाबरोबरच स्वकीय प्राचीन कवींचे अध्ययन केले नाही, तर आमच्या वाङ्मयाच्या प्रस्तुत शाखेची भावी वाढ अगदी अशक्य आहे, यात शंका नाही."[१९]

न्या. रानडे यांचा हा निबंध त्याकाळी चर्चाविषय बनलेला होता. मुख्य म्हणजे अनेक अभ्यासकांना या निबंधामुळे मराठी वाङ्मयाकडे ऐतिहासिक दृष्टीने पाहण्याची प्रेरणा मिळाली होती. त्यामुळे आधुनिक मराठी वाङ्मयेतिहासाचे जनक म्हणून न्यायमूर्ती म. गो. रानडे यांचेच नाव घेणे रास्त ठरते.

५

कै. ल. रा. पांगारकरांनी १८९८ सालीच 'ग्रंथमाले'त 'मराठी भाषेचे स्वरूप' हा आपला दीर्घनिबंध प्रसिद्ध केला. पांगारकरांना या संक्षिप्त वाङ्मयेतिहासलेखनाची प्रेरणा न्या. रानडे यांच्या १८९८ च्या निबंधातूनच मिळाली होती. "न्या. रानडे यांनी मराठीचा विद्यापीठी शिरकाव करण्याचा अत्यंत स्तुत्य व कळकळीचा प्रयत्न चालविला आहे. परवा त्यांनी चालू शतकात मराठीत जे ग्रंथ झाले त्यांचे परीक्षण करून या शतकात तिची वाढ किती झपाट्याने झाली हे चांगल्या तऱ्हेने लोकांचे नजरेस आणले आहे. यामुळे साहजिकच लोकांचे लक्ष या विषयाकडे वेधले आहे. अशा वेळी मराठी भाषेच्या उत्पत्तीपासून तो आजपर्यंत झालेल्या सन्मान्य ग्रंथकारांची माहिती देऊन ती कोणकोणत्या स्थित्यंतरातून आजपर्यंत आली आहे, याचे विवेचन केल्यास ते प्रासंगिक होईल असे जाणून हा प्रयत्न केला आहे."[२०]

न्यायमूर्ती रानडे यांच्या निबंधातून प्रेरणा घेतल्यामुळेच पांगारकर आपल्या निबंधाच्या अखेरीस "मराठीत उत्तमोत्तम वाचण्यालायक असे जे ग्रंथ आहेत त्यांची यादी" देतात.

संत वाङ्मयाचे मर्मज्ञ व रसिक अभ्यासक ल. रा. पांगारकर यांनी आपल्या विद्यार्थिदशेतच ("पदवी परीक्षेची निकड" असताना केवळ ३ दिवसांत) हा मराठी वाङ्मयाचा अतिसंक्षिप्त इतिहास लिहिला. पांगारकरांचा हा इतिहासलेखनाचा प्रयत्न म्हणजे केवळ उणापुरा ४५ पानांचा निबंध होय. योगायोगाची गोष्ट म्हणजे वि. ल. भावे यांच्या लेखनाप्रमाणे पांगारकरांचा

अनुक्रमणिका

हा निबंधही 'ग्रंथमाले'त आला व नंतर त्यास पुस्तकरुप मिळाले. हा निबंध म्हणजे ''प्राचीन मराठी वाङ्मयाचे स्थूल वर्णन'' होय. परंतु यात पांगारकरांनी मराठी वाङ्मयाचे इतिहासदृष्ट्या ५ कालखंड कल्पिलेले आहेत आणि हीच त्यांची मराठी वाङ्मयेतिहासविचाराला एक मोठी देणगी आहे. पांगारकरांनी (१) ज्ञानदेवकाल, (२)एकनाथकाल, (३) तुकाराम-रामदासकाल, (४)मोरोपंतकाल आणि (५) मराठी गद्याचा उदयकाल असे पाच कालखंड कल्पिलेले आहेत आणि स्थूलमानाने मराठी वाङ्मयाच्या आजवरच्या सर्व इतिहासलेखकांनीही हेच कालखंड स्वीकारलेले आहेत.

पांगारकरांचा विद्यार्थिदशेतला हा छोटा प्रयत्न म्हणजे त्यांनी पुढे जो मराठी वाङ्मयाचा त्रिखंडात्मक इतिहास लिहिला, त्याचे बीजरूपच होय. या बीजरूप निबंधासोबत पांगारकरांनी मराठीतील ८० निवडक ग्रंथांची यादीही दिलेली आहे.

स्वतः पांगारकर मोठे भाविक व श्रद्धाशील होते. ते तत्कालीन महाराष्ट्रातील एक नामवंत प्रवचनकार होते. संतचरित्रांचे आणि संतवाङ्मयाचे संकलन व संशोधन हा त्यांच्या प्रेमाचा विषय होता. या त्यांच्या व्यक्तिमत्त्व विशेषांचा परिणाम त्यांच्या आद्य वाङ्मयेतिहास लेखनावर आणि नंतरच्या त्रिखंडात्मक वाङ्मयेतिहासलेखनावर निश्चितपणे झालेलाही आहे. तरीदेखील पांगारकरांची दृष्टी रसज्ञ व मर्मग्राही अभ्यासकाची होती आणि ती सद्भिरूचिसंपन्नही होती. त्यामुळे मध्ययुगीन मराठी कवितेकडे रसज्ञतेने कसे पाहावे, तिच्यातील प्रसन्नता कशी जोखावी आणि तिची माधुरी कशी चाखावी, हे सारे जाणण्यासाठी पांगारकरांचा वाङ्मयेतिहास उपयोगाचाच ठरणार आहे.

या निबंधात पांगारकरांनी जरी आधुनिक मराठी गद्य ग्रंथ व ग्रंथकारांसंबंधाने अखेरी अखेरीस लिहिले असले, तरी त्यांचा ओढा मध्ययुगीन मराठी वाङ्मय, त्यातही पुन्हा भक्तिवाङ्मय याकडेच जास्त होता. आधुनिक मराठी वाङ्मयाकडे ज्या नव्या दृष्टीने पाहायला हवे, ती दृष्टीच पांगारकरांकडे नव्हती. संपूर्ण मराठी वाङ्मय एका ''अध्यात्माच्या दोऱ्यात'' ओवता आले पाहिजे असा भाबडा दृष्टिकोन ते अखेरपर्यंत बाळगून होते.

वाङ्मयेतिहासामध्ये कालखंड कल्पिण्याला महत्त्व असते. पांगारकरांनी मराठी वाङ्मयाचे कालखंड कल्पिण्यासंबंधीचे एक सशास्त्र सूत्र आपल्या 'मराठी भाषेचे स्वरूप' या पुस्तिकेतून दिले आहे. म्हणूनच आरंभकालीन मराठी वाङ्मयेतिहासकारांची गणना करताना ल. रा. पांगारकर हे नाव विसरून चालणार नाही.

६

ग. ज. आगाशे यांचा मराठी वाङ्मयाचे पर्यालोचन करणारा जुलै १८९८ सालच्या 'विविधज्ञानविस्तारा'तील छोटेखानी निबंध हा वास्तविक न्या. रानडे यांच्या निबंधावर ज्या अनेक छोट्यामोठ्या प्रतिक्रिया व्यक्त झाल्या, त्यांपैकीच एक होय. परंतु दोन कारणांकरिता त्याची नोंद येथे करावीशी वाटते. पहिले कारण म्हणजे आगाशे मराठी वाङ्मयाचा आढावा घेताघेताच त्याचे ''पर्यालोचन'' ही करू पाहतात. एवढेच नव्हे तर ''मराठी वाङ्मयाच्या अभिवृद्धीचे वारंवार पर्यालोचन करणे अवश्य आहे,'' असे मानतात.[२१] त्यानुसार त्यांनी १९०३ मध्ये मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या पाचव्या वार्षिक समारंभाप्रसंगी अध्यक्ष या नात्याने केलेल्या भाषणात ''महाराष्ट्र वाङ्मया''चे पर्यालोचन केलेले आहे. नंतर १९१० साली बडोदे येथील साहित्य संमेलनाकरिता त्यांनी असाच ''महाराष्ट्र वाङ्मयाचे पर्यालोचन'' करणारा निबंध लिहिला.[२२]

आगाशे यांच्या या लेखनांची काही वैशिष्ट्ये अधोरेखित करून सांगावीशी वाटतात. त्यांचे पहिले नजरेत भरणारे वैशिष्ट्य म्हणजे ते दरेक आढाव्यात वाङ्मयप्रकारांनुसार ग्रंथांची संख्या नमूद करतात. परिगणन हे आरंभकालीन वाङ्मयेतिहास लेखनाचे सूत्र ते घट्ट पकडून आहेत. दुसरे वैशिष्ट्य म्हणजे ते वाङ्मयाचे पर्यालोचन करता करताच काही मार्गदर्शक तत्त्वेही सांगत राहतात (उदाहरणार्थ टीकेचा विषय व्यक्ती नसून कृती आहे, हे ते बजावून सांगतात.) तिसरे वैशिष्ट्य म्हणजे अगोदरच निर्देशित केल्यानुसार अशी ऐतिहासिक पर्यालोचने पुनःपुन्हा करावयाची असतात, हे ते स्वतः जाणतात व आपल्या पुनःपुन्हा केलेल्या अशा लेखनातून दाखवूनही देतात. वाङ्मयेतिहासाचे लेखन पुनःपुन्हा व्हायला हवे, असे वाङ्मयेतिहासाचे तत्त्ववेत्ते अलीकडे

अनुक्रमणिका

सांगत आहेत. आगाशे यांनी ते जवळजवळ शंभर वर्षांपूर्वीच सांगितले होते. त्यामुळे आगाशे यांची गणना आरंभकालीन वाङ्मयेतिहासकारांमध्ये करणे अगत्याचे ठरते.

७

आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास लिहिण्याचा पहिला प्रयत्न कै. प्रो. मोती बुलासा यांनी केला, ही गोष्ट जवळजवळ आजपर्यंत अज्ञातच आहे. मराठीच्या अभ्यासकांना मोती बुलासा अज्ञात राहण्याची काही कारणे आहेत. एक म्हणजे मोती बुलासा फार तरुणपणी निवर्तले (जन्म १८६९ - प्रार्थना समाजाचे सभासद मृत्यू १९००). दुसरी गोष्ट म्हणजे मोती बुलासांचे लेखन अत्यल्प आहे. पुन्हा ते संगृहीत न होता त्यांनीच चालविलेल्या 'सुविचारसमागम' नावाच्या मासिक-पुस्तकांच्या फायलीतच पडून राहिलेले होते.[२३]

मोती बुलासांनी एकूण १० च लेख लिहिलेले आहेत. त्यापैकी ७ लेख ''मराठी भाषेची सद्यःस्थिती'' या एकाच विषयावरील असून त्यांद्वारेच मोती बुलासा यांनी आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास सादर केलेला आहे. या लेखमालेतील मोती बुलासांचा पहिला लेख १८९८ सालच्या मे महिन्यात प्रसिद्ध झालेला आहे. विशेष म्हणजे मोती बुलासा यांची मातृभाषा मराठी नव्हती; पण मराठी भाषा व वाङ्मय या दोहोंसंबंधाने त्यांची जाण अत्यंत परिणतप्रज्ञ होती. इतकी की त्यांचे लेखन जर वेळीच ग्रंथरूपाने अभ्यासकांसमोर आले असते तर श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांऐवजी मराठीच्या आद्य टीकाकाराचा किताब कदाचित बुलासांनाच बहाल झाला असता. शिवाय मोती बुलासा यांचे हे लेखन जर त्या वेळी पुस्तकरूपाने आले असते, तर मराठीतील टीकालेखनाला आणि आधुनिक मराठी वाङ्मयाच्या इतिहासलेखनाला निश्चितच नवी दिशा लाभली असती.[२४]

मोती बुलासा यांच्या ''मराठी भाषेची सद्यःस्थिती'' या लेखमालेची प्रेरणा पुन्हा न्यायमूर्ती म. गो. रानडे यांनी विद्यापीठात मराठी भाषेची प्रस्थापना व्हावी, म्हणून जे प्रयत्न केले, त्यातच आहे. विद्यापीठातील देशी भाषांच्या अभ्यासक्रमास विरोध करणाऱ्यांचा मुख्य आक्षेप, ''अजून मराठी, गुजराथी, हिंदुस्थानी इत्यादी एतद्देशीय भाषांना प्रागल्भ्य आले नाही; वाचकांच्या मनात सुसंस्कृत विचार व उदात्त मनोवृत्ती उत्पन्न करण्याजोगी पुस्तके अजून या भाषांमध्ये लिहिली गेली नाहीत; म्हणून मुख्य विद्यापीठात आज या भाषांचा प्रवेश करणे योग्य होणार नाही,'' असा होता.[२५] हा आक्षेप मराठी वाङ्मयापुरता खोडून काढण्याच्या उद्देशाने ''महाराष्ट्र वाङ्मयाची सद्यःस्थिती काय आहे,'' याचे अवलोकन करण्यास मोती बुलासा सिद्ध झाले आणि त्यांनी ही लेखमालाच लिहिली. आरंभी ते मध्ययुगीन मराठीतील वाङ्मयाचा व वाङ्मयपरंपरेचा ओझरता उल्लेख करतात. मग लगेचच ''इंग्रजी 'झाल्यापासून' आमच्या प्राकृत भाषेतील वाङ्मयात जी एक प्रकारची सुधारणा दृष्टीस पडते''[२६] तिची चर्चा-चिकित्सा सुरू करतात.

मोती बुलासा यांच्या लेखनाची प्रेरणा जरी न्या. रानडे यांच्या लेखनात असली, तरी त्यांच्या स्वतःच्या विलक्षण प्रज्ञेमुळे त्यांचे लेखन आपोआप एका सर्वांगसुंदर वाङ्मयेतिहासामध्ये रुपांतरित झाले. मोती बुलासांनी येथे एकोणिसाव्या शतकातील भाषांतरित व स्वतंत्र अशा सर्वत्र प्रकारच्या वाङ्मयाचा विचार केलेला आहे. असा विचार करण्यासाठी त्यांनी आपल्या लेखमालेचे (१)काव्य, नाटक व कथा-कादंबऱ्या, (३ लेखांक), (२) मराठी भाषेतील गद्यलेखक (२ लेखांक), (३)इतिहासग्रंथ (१ लेख) आणि (४) शास्त्रे, तत्त्वज्ञान व इतर विषयांवरील ग्रंथ (१ लेख) असे विभाग कल्पिलेले आहेत. ही लेखमाला चालू असताना त्यांनी ''आमच्या नाटकमंडळ्या'' या नावाचा आणखीएक लेख लिहून एकोणिसाव्या शतकातील मराठी रंगभूमीच्या स्थितिगतीचेही परखड परीक्षण केलेले आहे.

मोती बुलासा केवळ लेखक व त्यांच्या वाङ्मयकृती यांचा ऐतिहासिक आढावा घेऊन थांबले नाहीत. त्यांनी एकोणिसाव्या शतकात नव्यानेच आकार घेत असलेल्या स्फुट कविता, नाटक, कादंबरी इत्यादी वाङ्मयप्रकारांच्या व्याख्या व लक्षणे निश्चित करण्याचा प्रयत्न केलेला आहे. तत्पूर्वी त्यांनी 'वाङ्मय (लिटरेचर) म्हणजे काय ?' या प्रश्नाचीही संक्षिप्तपणे का होईना चर्चा केलेली आहे. मोती बुलासांची वाङ्मयेतिहासदृष्टी नवल वाटावी इतकी प्रगत असल्याचे त्यांच्या लेखनातून वारंवार जाणवत राहते. उदाहरणार्थ, त्यांनी ललित

अनुक्रमणिका

वाङ्मयाबरोबरच इतिहास, शास्त्र, तत्त्वज्ञान, उपयुक्त विद्या इत्यादी विषयांवरील ग्रंथांचाही वाङ्मयेतिहासामध्ये विचार केलेला आहे. वि. का. राजवाडे यांनी नंतर जवळजवळ २० वर्षांनी सांगितलेली वाङ्मयेतिहासाच्या समग्रतेची संकल्पना जणू मोती बुलासा यांना अगोदरच उमगली होती.

मोती बुलासांची वाङ्मयेतिहासविषयक दृष्टी नवल वाटावी इतकी प्रगत दिसते, असे म्हणण्याचे आणखी कारण असे की वाङ्मयेतिहासामध्ये केवळ ग्रंथ व ग्रंथकाराचा विचार करून न थांबता, एकूण वाङ्मयव्यवहाराचा विचार करायचा असतो, याचेही त्यांना चांगलेच भान होते. म्हणूनच मोती बुलासा आवर्जून प्रकाशक व प्रकाशन व्यवसाय यांबाबत तपशिलाने लिहितात. उदाहरणार्थ ब.ग. दाभोळकरांनी विविध विषयांवरची पुस्तके लेखकांच्या मागे लागून कशी लिहवून घेतली आणि त्याद्वारे मराठी वाङ्मयाची समृद्धी कशी झाली, हे मोती बुलासा आवर्जून नमूद करतात.

वाङ्मयेतिहासकार हा समकालीन समीक्षाव्यूहाच्या पलीकडे जाऊन निदाने व निष्कर्ष नोंदवीत असतो. मोती बुलासांनीही हेच केलेले. १८८० ते १९०० हे दशक म्हणजे संगीत नाटकाचे सुवर्णयुग होय; परंतु ''संगीत नाटकांपासून काही धडधडीत गैरफायदे आहेत.''[२७] हे सांगायला बुलासा कचरत नाहीत. ते या बाबतीत लिहितात, ''प्रेक्षकांची मने गायनात तल्लीन झाल्यामुळे त्यांना खरे अभिनयचातुर्य पाहण्यास वेळ मिळत नाही. ज्या नटाला गाण्याचे अंग चांगले आहे, त्याला अभिनयामध्ये पूज्य गुण मिळाल्यासही तो प्रेक्षकांच्या मते उत्कृष्ट ठरेल; व ज्याचे अभिनय कौशल्य उत्कृष्ट पण ज्याला गाणे येत नाही, अशांचा नंबर प्रेक्षकांच्या दृष्टीने खाली जाईल.''[२८] एवढेच निदान करून मोती बुलासा थांबत नाहीत, तर ते आणखी म्हणतात, ''या योगे लोकांचा मार्मिकपणा वाढावयाचे ऐवजी उलटा कमी होईल. दुसरे प्रत्येक अंकात किंवा प्रत्येक प्रवेशात गायनाची रेलचेल असल्यामुळे प्रेक्षकांचे मन त्याच्यातच गुंगून एकंदर नाटकात जे निरनिराळ्या रसांचे वर्णन असेल, त्याकडे त्यांचे लक्ष जाणार नाही व त्यायोगे ज्या निरनिराळ्या वृत्ती उत्पन्न व्हावयाच्या त्या न होता, नाटकापासून मनोवृत्तींना उच्च शिक्षण मिळावयाचे ते अर्थातच मिळणार नाही.''[२९] याचा अर्थ असा की मोती बुलासा वाङ्मयेतिहासात अभिरूचीचाही विचार करतात. वाङ्मयेतिहासात अभिरूचीचा विचार हवा हा मुद्दा अगदी अलीकडे विचारात घेतला जाऊ लागलेला आहे. हॅन्स रॉबर्ट जॉस यांनी हा मुद्दा केंद्रस्थानी ठेवूनच आपली रीडर्स रीसेप्शन थिअरी मांडलेली आहे.[३०] मोती बुलासांनी त्याला १०० वर्षांपूर्वीच स्पर्श केलेला होता, हे पाहून आश्चर्य वाटते.

१८७५ ते १९२० हा कालखंड आपल्या वाङ्मयेतिहासामध्ये 'चिपळूणकर पर्व' म्हणून मानला जातो. परंतु त्याला छेद बसेल अशा स्वरूपाचे चिपळूणकरांच्या लेखनशैलीचे कठोर मूल्यमापन मोती बुलासा चिपळूणकर युगाच्या ऐन मध्यावर करतात. मौज म्हणजे मोती बुलासांचे लेखन एऱ्हवी जराही आलंकारिक नाही; परंतु चिपळूणकरांच्या शैलीला ते सुंदरीची उपमा देऊन म्हणतात, ''...प्रतिपक्षाची दुर्दशा उडवून देणाऱ्या तिच्या नाना प्रकारच्या क्रिया पाहून सर्व रसिक भक्तवृंद तल्लीन होऊन जातो व त्यास विचार करण्याची फुरसत किंवा अक्कल किंवा दोन्हीही राहात नाहीत, यात नवल ते काय ? पण हिचे मोहनास्त्र आपल्यावर न चालू देणारा असा एखादा दैवी तावीज जर निरीक्षकाजवळ असला, किंवा तिचे अंतःस्वरूप चांगल्या तऱ्हेने दिसेल अशा प्रकारच्या हल्लीच्या एक्स् किरणांचा चष्मा जर डोळ्यांस लावावयास मिळाला,[३१] तर असे दिसून येईल, की या सुंदरीच्या मनोवृत्ती व विचार इतर जनांपेक्षा अधिक उदात्त नाहीत. या अभिमानिनीची महत्त्वाकांक्षा आपल्या भक्तांवर आपली छाप बसावी याच्या पलीकडे गेलेली नाही व ही सौंदर्याची प्रतिमा यहूदी लोकांच्या देवासारखी मत्सराने भरलेली आहे. तिला प्रतिपक्षी म्हणून खपत नाही.''[३२] चिपळूणकरांच्या शैलीबाबत बुलासा यांनी आणखी विस्ताराने लिहिलेले असून ते असेच उपहासात्मक आहे. ते मुळातूनच वाचण्यासारखे आहे. मुख्य मुद्दा असा आहे की चिपळूणकरांच्या ज्या शैलीची तमाम महाराष्ट्रावर ४०-५० वर्षे मोहिनी होती, त्या शैलीचा समाचार मोती बुलासा अगदी जबाबदारपणे व साधार घेतात. मात्र याचा अर्थ ते चिपळूणकर-द्वेष्टे होते असा नाही. उलट ''शास्त्रीबोवांचे मांडीस मांडी लावून

बसण्याची योग्यता (त्यांचे अनुकरण करणाऱ्यांपैकी) एकाचेही अंगी आली नाही; इतकेच नव्हे, पण शास्त्रीबोवांचे हुजऱ्याचे काम तरी कोणी यथायोग्य रीतीने करू शकेल की, नाही याबद्दलही आम्हास शंका नाही''[११] अशा शब्दांत मोती बुलासा चिपळूणकरांचे मराठी वाङ्मयामधील अद्वितीयत्व व असाधारणत्व वर्णन करतात.

बुलासांनी १८९८ साली लिहिलेला हा आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास निश्चितपणे मौलिक आहे आणि आज १०० वर्षे लोटल्यावरही त्यातून आपल्याला प्रकाशदान मिळत राहण्याइतका तो समर्थ आहे.

८

१८९८ साली मराठी वाङ्मयेतिहास लेखनाचे जे प्रयत्न झाले, त्यात वि. ल. भावे यांच्या वाङ्मयेतिहासाला आद्यत्वाचा मान द्यावा लागतो. न्यायमूर्ती रानडे प्रभृतींचे प्रयत्न म्हणजे मुंबई विद्यापीठाच्या अभ्यासक्रमामध्ये मराठी विषयाची प्रस्थापना व्हावी म्हणून झालेले प्रयत्न होत. त्यामागे वाङ्मयेतिहास लेखनाची केवलदृष्टी नव्हती. त्यामुळे वि. ल. भावे यांनी 'महाराष्ट्र-सारस्वत' या नावाने जो ग्रंथ लिहिला त्यासच आद्य मराठी वाङ्मयेतिहास लेखनाचा मान द्यावा लागतो. मुळात भावे यांनी हा ग्रंथ १८९४ साली लिहिला असे सांगितले जाते. भावे यांची दृष्टीही इतिहासकाराची होती, हे या ग्रंथास जोडलेल्या प्रास्ताविकावरूनही कळते. या सगळ्या गोष्टी लक्षात घेता वि. ल. भावे यांचा 'महाराष्ट्र-सारस्वत' हा ग्रंथ मराठी वाङ्मयेतिहास लेखनाचा सर्वात पहिला प्रयत्न होय, ही गोष्ट निर्विवाद होय.

'महाराष्ट्रसारस्वता'चे प्रकाशन कै. वि. गो. विजापूरकर चालवीत असलेल्या 'ग्रंथमाला' या मासिकातून १८९८ च्या मार्च महिन्यापासून क्रमशः सुरू झाले, ही वस्तुस्थिती आहे. पुढे ही लेखमालिका ग्रंथरूपात 'ग्रंथमाले'तर्फेच १८९९ मध्ये प्रकाशित झाली. 'महाराष्ट्र-सारस्वता'ची ही पहिली आवृत्ती केवळ ९८ पानांची आहे. परंतु पुढे या ग्रंथाने दुसऱ्या व तिसऱ्या आवृत्तीच्या वेळी जे वटवृक्षासारखे महान रूप धारण केले, त्याची बीजे या पहिल्या आवृत्तीत आहेत.

वर म्हटल्याप्रमाणे भावे यांचा हा वाङ्मयेतिहास ९८ पानांचा, केवळ लघुरूप वाटावा असा आहे; तथापि त्यामुळे त्याचे महत्त्व जराही कमी होत नाही. कारण तोपर्यंत मराठी वाङ्मयाचा असा इतिहास तर लिहिला गेलेला नव्हताच, पण ऐतिहासिक स्वरूपाचा अभ्यासही झालेला नव्हता. ज्ञानेश्वरांपासून मोरोपंतांपर्यंतच्या अनेक कवींचे स्फुट अभ्यास पुरेशा साक्षेपाने आणि नजरेत भरावेत इतक्या संख्येने झाले होते. परशुरामतात्या गोडबोले यांनी 'नवनीता'त प्राचीन कवींच्या रचनांमधील काही सुंदर वेचे एकत्र केले होते. पण त्यातही इतिहासदृष्टी अनुपस्थितच होती. एकूण समग्र मध्ययुगीन मराठी वाङ्मयाचा एका ऐतिहासिक अक्षावरच एकत्रित असा विचार करावा, अशी कल्पना वि. ल. भावे यांच्यापूर्वी कोणास सुचल्याचे आढळत नाही. त्यामुळे मध्ययुगीन मराठी सारस्वताचा ऐतिहासिक अभ्यास करण्याची कल्पना पूर्णपणे वि. ल. भावे यांची स्वतःचीच होय. पुन्हा ही 'अ-पूर्व' अशी कामगिरी त्यांना स्वप्रज्ञेच्या बळावरच करावी लागलेली आहे, हे उघडच आहे.

भावे यांनी 'महाराष्ट्र-सारस्वत' लिहून साधलेल्या कार्याचे महत्त्व व मोठेपण वेगळेच आहे. निबीड अंधःकारात क्षणकाल झळकणाऱ्या विद्युल्लतेचे शरीर कृश असते, हे खरे; पण तिचे प्रकाशदान चाचपडणाऱ्या पांथस्थाला मार्गस्थ जरूर करते. तद्वतच 'महाराष्ट्र-सारस्वता'च्या पहिल्या छोटेखानी आवृत्तीने पुढील वाङ्मयेतिहास लेखकांना मार्ग दाखविण्याचे महत्त्वाचे कार्य केलेले आहे, हे आज १०० वर्षांतील मराठी वाङ्मयेतिहासलेखनाची झालेली वाटचाल पाहताना सहज ध्यानात येते.

१९०३ सालीच भावे आपल्या 'महाराष्ट्र सारस्वता'ची दुसरी आवृत्ती काढू इच्छित होते. तशी जाहिरातही त्यांनी ते स्वतःच चालवीत असलेल्या 'महाराष्ट्रकवि' या मासिक-पुस्तकात केली होती. परंतु हा आपला मनोदय बाजूला ठेवून त्यांनी मराठी वाङ्मयाच्या संशोधनाला वाहून घेतले. एका बाजूला आपला मीठ-व्यापाराचा व्यवसाय चोख सांभाळीत वि. ल. भावे यांनी या संशोधनाच्या कष्टसाध्य कार्यात एक दोन नव्हे, तर उणीपुरी १५ वर्षे घालविली आणि मध्ययुगीन मराठी वाङ्मयाचा विस्तार कवेत घेऊन १९१९ साली 'सारस्वता'ची दुसरी आवृत्ती प्रसिद्ध केली. ही दुसरी

आवृत्ती ५८८ पृष्ठांची म्हणजे पहिल्या आवृत्तीच्या सहा पट मोठी आहे. या दुसऱ्या आवृत्तीबाबत मुद्दाम सांगावीशी वाटणारी गोष्ट म्हणजे इतिहासाचार्य वि. का. राजवाडे संस्थापित 'भारत इतिहास संशोधक मंडळ', पुणे. या संस्थेने ती प्रकाशित केली आहे. परंतु भावे या आवृत्तीवरही संतुष्ट राहिले नाहीत. मध्ययुगीन मराठी वाङ्मयाचे संशोधन व अभ्यास हे त्यांनी आपले अखेरपर्यंतचे जणू जीवित-ध्येयच ठेवलेले होते. दुसऱ्या आवृत्तीनंतर आणखी अभ्यास करून 'महाराष्ट्रसारस्वता'च्या तिसऱ्या परिवर्धित आवृत्तीची सिद्धता त्यांनी केली. या तिसऱ्या आवृत्तीचा पहिला खंड प्रसिद्ध झला आणि भावें यांचे देहावसान (१९२६) झाले. त्यांच्या निधनानंतर दोन वर्षांनी म्हणजे १९२८ साली त्यांचे विद्याव्यासंगी चिरंजीव कै. लक्ष्मण विनायक भावे यांनी 'सारस्वता'च्या तिसऱ्या आवृत्तीचा दुसरा खंड प्रसिद्ध केला. या दोन्ही भागांची मिळून एकूण पृष्ठसंख्या ७४४ आहे. नंतरच्या काळात मध्ययुगीन मराठी वाङ्मयाचे गाढे अभ्यासक व संशोधक डॉ. शं. गो. तुळपुळे यांनीही भाव्यांचे व्रतच पुढे चालवून पुढील प्रत्येक आवृत्तीच्या वेळी नव्या संशोधनाची व अभ्यासाची भर घालून आपली पुरवणी सतत शक्य तितकी अद्ययावत केली. 'महाराष्ट्र-सारस्वता'च्या आजवर सहा आवृत्त्या निघालेल्या आहेत. 'महाराष्ट्र-सारस्वता'च्या या प्रत्येक आवृत्तीने संशोधकांना आणि अभ्यासकांना मोलाचे मार्गदर्शन केलेले आहे, हे त्या अभ्यासू मंडळींच्या लेखनातून आणि त्यांनी 'महाराष्ट्र-सारस्वता'च्या केलेल्या कृतज्ञतापूर्वक उल्लेखांवरून कळते. मराठी वाङ्मयेतिहासलेखनाचाच इतिहास लिहायचा झाला तर वि. ल. भावे यांना केवळ आद्यत्वामुळेच नव्हे, तर त्यांच्या लेखनातील तत्त्वसूचक दृष्टीमुळे अग्रपूजेचा मान द्यावा लागेल, हे निर्विवाद आहे.

'महाराष्ट्र-सारस्वता'चे स्वागत सतत अनुकूल-प्रतिकूल टीकेनिशी झालेले आहे. प्रा. ना. कृ. गद्रे यांच्यासारख्या प्राकृत भाषा व वाङ्मयाच्या अभ्यासकाने १९२० साली 'सारस्वता'च्या दुसऱ्या आवृत्तींवर 'विविधज्ञानविस्तारा'च्या लागोपाठच्या दोन अंकांतून 'विस्तारा'ची २७ पाने भरतील इतके विस्तृत परीक्षण लिहिलेले आहे.[३४] यात दोष-दिग्दर्शनाबरोबरच भावे यांच्या इतिहासाचे गुणगानही आहे. मुळात प्रो. गद्रे यांच्यासारख्या विद्वानाला या ग्रंथावर विस्तृत परीक्षण लिहावे वाटले आणि त्या परीक्षणास भरपूर पृष्ठे द्यावीत असे 'विविधज्ञानविस्तारा'सारख्या त्या काळच्या विनीच्या मासिकाच्या संपादकास वाटले, यातूनही 'महाराष्ट्र-सारस्वता'चे मोठेपण लक्षात येते. 'इतिहास आणि ऐतिहासिक' या केवळ इतिहासविचारालाच वाहिलेल्या नियतकालिकाने तर 'सारस्वता'च्या दुसऱ्या आवृत्तीसंबंधाने अत्यंत गौरव व संतोषानेच लिहिलेले आहे. आषाढ शके १८४१ च्या 'इतिहास आणि ऐतिहासिक'च्या अंकात म्हटले आहे की, ...''आम्ही एवढे खास सांगू शकतो, की भाव्यांच्या ग्रंथाच्या योग्यतेचा सारस्वतेतिहासग्रंथ हिंदुस्थानातील (मराठीतर) कोणत्याही भाषेत सध्या विद्यमान नाही. हाच ग्रंथ बंगाली भाषेत झाला असता, तर त्या लोकांनी त्याचे किती तरी नाक फुगवून स्तोम माजवले असते ! त्याची इंग्रजी भाषांतरे केली असती, ग्रंथकाराला सरक्या चारल्या असत्या, एलेलड्या व पीएचड्या मिळवून दिल्या असत्या, व (कन्या) कुमारीपासून हिमालयापर्यंत एकच बोंब करून सोडली असती.''[३५]

म. म. दत्तो वामन पोतदार यांनीही 'मराठी इतिहास व इतिहास संशोधन' या आपल्या १९३५ साली प्रसिद्ध झालेल्या ग्रंथात[३६] 'महाराष्ट्र-सारस्वता'ची आणि वि. ल. भावे यांच्या प्रज्ञाप्रतिभेची अशीच स्तुती केलेली आहे. महामहोपाध्याय लिहितात, ''पुढे भावे यांनी 'महाराष्ट्र-कवी' मासिकात दासोपंत, कृष्णदास मुद्गल, सामराज वगैरे अनेक कवींचे ग्रंथ, पंचतंत्रासारखा एखादा प्राचीन ग्रंथ प्रबंध असे अनेक ग्रंथ प्रसिद्ध केले; आणि जुन्या 'महाराष्ट्र-सारस्वता'चा एकमेव प्रमाण इतिहास लिहून प्रसिद्ध केला. हा ग्रंथ भावे यांचे जीवनकार्यच समजायला हरकत नाही. दोन-तीन तपांच्या परिश्रमांचे व संशोधनाचे परिपक्व फळ म्हणजे हे 'महाराष्ट्र-सारस्वत !' भावे यांची भाषापद्धती विशिष्ट ठशाची पण आकर्षक आहे. पदवी परीक्षा देण्यापूर्वीपासूनच हा पोथ्या धुंडण्याचा नाद विनायकरावांना लागला व तो त्यांच्या जीवाचा मुख्य विसावा होऊन राहिला ! पदवी भौतिकशास्त्राची, नाद पाखरे उडविण्याचा, धंदा मीठ विकण्याचा आणि संशोधन प्राचीन मराठी काव्याचे, असा फक्कड मेळ भावे

यांच्या चरित्रात दिसून येतो... पैशांचे व बुद्धीचे बळ यांस अनुकूल होते, तथापि कळकळ व महत्त्वाकांक्षा असल्याशिवाय असले श्रम होत नाहीत. आपली प्रकृती खालावली असताही मानभाव महंतास आपल्याकडे खेचून आणून त्यांनी महानुभावी वाङ्मयाचे अज्ञात दालन महाराष्ट्रास खुले केले, ते एरवी कसे घडले असते?''[३७]

वि. ल. भावे हे संशोधनविद्येत कसे आणि किती कसलेले होते हे त्यांनी चालविलेले 'महाराष्ट्र-कवि' हे मासिक-पुस्तक पाहिले की कळते. एक संशोधक म्हणून त्यांची दृष्टी शुद्ध वाङ्मयीनच कशी होती, हे पाहण्यासाठी नागेश कविकृत 'सीतास्वयंवरा'स त्यांनी लिहिलेली प्रस्तावना पाहावी. त्या प्रस्तावनेत भावे लिहितात, ''या काव्यातील श्लोक अश्लील आहेत व ते यात आम्ही छापिले म्हणून काही लोक बरेच नाखूश झाले आहेत. यास इतकेच सांगणे आहे, की ('महाराष्ट्र-कवि') या मासिक पुस्तकात कवींची काव्ये मुळात असतील तशीच छापण्याचे योजिले आहे. मूळ प्रतीत छाटाछूट करून किंवा पदरची अक्षरे घालून आबालवृद्धांना व स्त्रियांना वाचण्यास योग्य अशी प्रत तयार करण्याचे काम(आम्ही) आमच्यानंतरच्या प्रकाशकांवर सोपवितो. विचारसंपन्न अशा सर्व राष्ट्रांत कवीची रचना कितीही अश्लील अप्रयोजक किंवा ग्राम्य असली तरी जोपर्यंत ती मूळ कवीचीच आहे अशाविषयी संशय घेण्याचे कारण नाही, तोपर्यंत ती तशीच मूळ आवृत्तीत छापण्याची रीत सर्वमान्य आहे. हीच रीत आमच्या पूर्वीचे प्रकाशक सर्वसंग्रहकर्ते, काव्येतिहाससंग्रहकर्ते, काव्यसंग्रहकर्ते वगैरेंसारख्या विचारवंतांनी अमलात आणिली आहे, आणि हीच आम्हासही मान्य असून आम्ही हीच पुढे चालविणार आहोत. आता एखादे अश्लील ग्राम्य काव्य जाणूनबुजून छापावे, असा आमचा विचार नाही. परंतु कोणा कवीची काव्ये छापण्यास सुरुवात केल्यावर त्याचे एखातदे अश्लील श्लोक सापडले, तर तेवढ्याकरिता ते प्रकरण उपलब्ध होईल तसेच छापण्याचे आम्ही ठरविले आहे. त्यात बदल करण्याचा किंवा त्यातील भाग गाळण्याचा अधिकार आमचा नाही.''[३८]

भावे यांच्या प्रस्तावनेतला हा मजकूर विस्ताराने देण्याचे कारण एवढेच आहे, की 'यथामूलता' हा कोणत्याही चांगल्या इतिहासलेखनाचा पाया आहे, हे ते नीटपणे जाणत होते, हे ध्यानात यावे.

वि. ल. भावे यांची दृष्टी वाङ्मयेतिहासकाराचीच कशी होती, हे त्यांच्या ''महाराष्ट्र भाषा सरस्वतीच्या महालातील एक अज्ञात दालन'' या महानुभाव वाङ्मयासंबंधीच्या निबंधावरून[३९] तसेच ''महाराष्ट्राच्या पेठेत महाराष्ट्र-वाङ्मयाचा दर्जा आणि किंमत'' या भाषणावरूनही[४०] कळावे. पण त्यांच्या या दृष्टीसंदर्भात याहीपेक्षा एक सबळ असा आणखीही पुरावा आहे. 'महाराष्ट्र-कवी' या आपल्या मासिकांच्या ''उपोद्घाता''त ते लिहितात, ''या मासिकपुस्तकात शके १७४० च्या पूर्वीचे म्हणजे स्वराज्याच्या अमदानीतले व त्यापूर्वीचे काव्यग्रंथ छापण्याचा विचार योजला आहे. यांत वेदान्त, पुराण, ज्योतिष, गणित, वैद्यक, चरित्र, पोवाडे, लावण्या, कटाव, पदे वगैरे सर्व तऱ्हेचे विषय हळूहळू येतील. हे ग्रंथ पूर्वी प्रसिद्ध झालेल्या ग्रंथांपेक्षा काव्य या दृष्टीने जरा कमी योग्यतेचे वाटण्याचा संभव आहे. कदाचित असे कोणास वाटले, तरीदेखील हे सर्व वाङ्मय अनेक कारणांसाठी फार उपयोगी आहे. या ग्रंथांनी त्या त्या वेळचे आपले आचारविचार आपणास चांगले कळू लागतील. त्या वेळच्या शकुनवंत्या, व्यवहारनिर्णय, मायनेपत्रके, संवत्सरफले वगैरे कागद जगापुढे मांडता आले तर आपल्या सामाजिक इतिहासावर नवीन प्रकाश पडेल. वास्तविक पाहता यापेक्षा आणखीही निराळ्या तऱ्हेचे जुने ग्रंथ छापून निघणे अवश्य आहे. हल्ली ज्यांचा 'इतिहास' म्हणून संग्रह करण्यात येतो, त्याहून अगदी भिन्न असे ग्रंथ महाराष्ट्रात वारंवार आढळतात. वेताळपंचविशी, शुकबहात्तरी, सिंहासन बत्तिशी वगैरेंसारख्या कथा, जुन्या काळच्या कर्त्या पुरुषांच्या सोप्या शब्दांनी सांगितलेल्या आख्यायिका किंवा कहाण्या, विद्यार्थिदशेतल्या होतकरू मुलांस वाचण्यासाठी रचलेल्या बखरी, त्यावेळची नाटके, कथानके, तशाच आजोबांनी नातवांस सांगितलेल्या कावळा-चिमण्यांच्याच, परंतु अर्थपूर्ण गोष्टी, ही सर्व एका दृष्टीने पाहता आपल्या अत्यंत महत्त्वाच्या अशा काळच्या इतिहासाची उपांगे होत...''[४१] अशी व्यापक, समाजेतिहासपोषक दृष्टी भावे एकोणिसाव्या-विसाव्या शतकाच्या सीमारेषेवर

दाखवितात, याचे खरोखरीच आश्‍चर्य वाटते.

भावे अव्वल दर्जाचे संशोधक जसे होते, तसेच ते थोर इतिहासलेखककही होते. त्यांच्या प्रत्येक लेखनातून त्यांच्या इतिहासदृष्टीचे प्रत्यंतर येते आणि 'महाराष्ट्र-सारस्वत' हा ग्रंथ म्हणजे तर वि. ल. भावे यांच्या इतिहासप्रज्ञेचे परिपक्व फळ होय.

अमुद्रित वाङ्मयाचे संशोधन करणे, त्याचे संस्कृतिसापेक्ष परिशीलन करणे आणि मग भक्तिश्रद्धादी भावना वजा करून त्याचा शुद्ध वाङ्मयीन दृष्टीने इतिहास लिहिणे या तीनही पायऱ्यांवर भावे यांची इतिहासप्रज्ञा यशस्वी ठरलेली आहे, हे 'महाराष्ट्र-सारस्वत' अभ्यासताना पुनःपुन्हा जाणवते.

या आद्य वाङ्मयेतिहासग्रंथाने पुढील वाङ्मयेतिहासकारांसाठी जणू ही त्रिसुत्रीच निर्माण करून ठेवली. म्हणूनच 'महाराष्ट्र-सारस्वत' या ग्रंथाची शताब्दी साजरी करणे आवश्यक ठरते.

इतिकथन

१) प्रारंभकालीन मराठी वाङ्मयेतिहास जंत्रीवजा वाटतात, (रानडे व पांगारकरांनी तर आपापल्या निबंधांच्या शेवटी ग्रंथ-सूचीच दिलेल्या आहेत), पण त्यामुळे ते अपुरे किंवा अपरिपक्व ठरत नाहीत. उलट आजच्या वा उद्याच्या वाङ्मयेतिहासलेखनासाठीची एक अव्वल सामग्री म्हणून त्यांच्याकडे पाहता येते. कारण वाङ्मयेतिहासकाराला अत्यावश्यक असा तपशील ते पुरवीत राहतात. वाङ्मयेतिहासकाराने वाङ्मयकृतींचे नुसते मूल्यमापन करावयाचे नसते, तर "...Where and when these works were conceived, written, published and read; how the circumstances of their production shaped their meanings and effects..."[४२] याकडे विशेष लक्ष पुरवायचे असते. म्हणून जुने वाङ्मयेतिहासग्रंथ कालबाह्य अतएव टाकाऊ म्हणून बाद करता येत नसतात; तर ते ग्रंथ एकाच वेळी विद्यमान इतिहासलेखनाची सामग्री आणि पूर्वकालीन वाङ्मयविचार समजून घेण्याचे साधन अशा दुहेरी स्वरूपात उपयुक्त असतात.

२) मराठी वाङ्मयेतिहासलेखनाच्या पुसट वा ठळक अशा थोड्या पाऊलखुणा १८९८ पूर्वी दिसतात. परंतु १८९८ सालीच मराठी वाङ्मयेतिहासलेखनाने भरीव आकार घेतला. १८९८ सालच्या पंचविध प्रयत्नांपैकी वि. ल. भावे यांची ''ग्रंथमाले'तील ''महाराष्ट्र-सारस्वत'' ही लेखमाला आणि मोती बुलासा यांची 'सुविचारसमागमा'तील ''मराठी भाषेची सद्यःस्थिती'' ही लेखमाला- अशा दोन लेखमालांनी मराठी वाङ्मयेतिहासलेखनाचा खराखुरा पाया घातला. वि. ल. भाले आणि मोती बुलासा या दोघांचे वाङ्मयेतिहासलेखन एकमेकांस पूरक झाले. या दोघांनी जणू मध्ययुगीन मराठी वाङ्मय आणि आधुनिक मराठी वाङ्मय ही क्षेत्रे वाटून घेतली होती. दोघांची लेखने एकत्र केली असता मराठी वाङ्मय ही क्षेत्रे वाटून घेतली होती. दोघांची लेखने एकत्र केली असता मराठी वाङ्मयाचा आरंभापासून १८९८ पर्यंतचा एक सलग इतिहासपट मिळतो.

३) भावे-मोती बुलासा यांनी घातलेल्या पायाच्या आधारेच गेल्या शंभर वर्षांतील मराठी वाङ्मयेतिहासलेखन झालेले आहे. भावे-मोती बुलासा यांच्या वाङ्मयेतिहासदृष्टीला छेद देणारी दृष्टी मराठी वाङ्मयेतिहासकारांनी क्वचितच दाखविली आहे. आधुनिक मराठी वाङ्मयाचे इतिहास तर मोती बुलासांची दृष्टी पाहता प्रतिगामीत्र ठरतील. निदान 'प्राचीन मराठी वाङ्मयेतिहासाचे स्वरूप' कर्ते प्रा. ह. श्री. शेणोलीकर हे वि. ल. भावे यांना उत्तराधिकारी म्हणून तरी लाभले. भावे यांच्या इतिहासाप्रमाणेच प्रा. शेणोलीकरांच्या इतिहासाच्या आजवर सहा आवृत्त्या निघालेल्या आहेत आणि भावे यांच्याप्रमाणेच त्यांनी प्रत्येक वेळी आपल्या वाङ्मयेतिहासाचे नव्या संशोधनाच्या व नव्या दृष्टीच्या प्रकाशात पुनर्लेखनही केलेले आहे. कै. मोती बुलासा मात्र अद्यापीही आपल्या उत्तराधिकाऱ्याच्या प्रतीक्षेतच आहेत.

संदर्भ-टीपा

१. Herbert Butterfield (1969). Man of His Past, Cambridge University Press, Cambridge, p. 5.

२. तत्रैव, p. 10.
३. G. N. Devy (1998), Of Many Heroes, Orient Longman, Bombay, p. 5.
४. गं. दे. खानोलकर (संपादक) (१९७७) मराठी वाङ्मयकोश : खंड पहिला, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, पृ. २३७.
५. डॉ. म. रा. जोशी, ''महाराष्ट्र सारस्वत, महाराष्ट्र साहित्य परिषद प्रकाशित वाङ्मयेतिहास आणि वाङ्मयेतिहासाची तत्त्वे'' (वाङ्मयेतिहासविषयक लेखमाला : लेखांक एक), आलोचना, एप्रिल १९७६, पृ. चौदा.
६. संत बहिणाबाईंचा हा अभंग म्हणजे मराठीतील पहिलावहिला वाङ्मयेतिहास होय, ही कल्पना मुळात सन्मित्र डॉ. कल्याण काळे यांची आहे. त्यांच्याशी मराठी वाङ्मयेतिहासलेखनाबाबत चर्चा करताना त्यांनी ही मला निवेदित केली आणि माझ्या अभ्यासात वापरण्याची अनुमतीही दिली. त्यांचा मी ऋणी आहे.
७. मध्ययुगीन मराठी वाङ्मयातील एकूण ३९२ वाङ्मयप्रकारांची नोंद डॉ. म. रा. जोशी यांनी केली आहे. पाहा : डॉ. म. रा. जोशी, ''साहित्यसमीक्षा व वाङ्मयेतिहास,'' दिनांक ७ व ८ फेब्रुवारी रोजी धुळे येथे झालेल्या भारतीय मराठी अभ्यास परिषदेत वाचलेला निबंध.
डॉ. म. रा. जोशी यांनी इतक्या संख्येने मध्ययुगीन मराठी वाङ्मयप्रकारांची नोंद कशी केली, असा प्रश्न कोणास पडेल, तर त्यांनी मध्ययुगीन मराठी वाङ्मयप्रकारांबाबतची डॉ. म. रा. जोशी यांची अन्यत्र आलेली मीमांसा अवश्य पाहावी. डॉ. म. रा. जोशी यांना मध्ययुगीन मराठीतील वाङ्मयप्रकारांकडे संस्कृत वाङ्मयप्रकारांच्या किंवा आंग्ल वाङ्मयप्रकारांच्या चष्म्यातून पाहणे अगदी चुकीचे वाटते. त्यामुळे मध्ययुगीन मराठी वाङ्मयाचे ते स्वाभाविक वाङ्मयप्रकार कल्पितात.
८. कृष्ण श्री. अर्जुनवाडकर, ''मराठी ज्ञानप्रसारक'', मराठी नियतकालिकांचा वाङ्मयीन अभ्यास (संपादक : डॉ. व. दि. कुलकर्णी), मुंबई विद्यापीठ : मराठी विभाग आणि श्रीविद्या प्रकाशन, पुणे, १९८७, पृ. ३४.
९. मराठी ज्ञानप्रसारक, ११ ३५३, (मार्च १८६१).
१०. स्वाती साळवी, ''मराठी ज्ञानप्रसारक'', गतशतकपत्रिका, (संपादक शिरीष गोपाळ देशपांडे, नंदा आपटे), पदव्युत्तर मराठी विभाग : एस्. एन्. डी. टी. (महिला) विद्यापीठ, मुंबई आणि ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, १९९५, पृ. २७.
११. वा. ल. कुलकर्णी (१९६५), मराठी ज्ञानप्रसारक : इतिहास व वाङ्मयविचार, पॉप्युलर, मुंबई, पृ. ९४.
१२. श्री. म. पिंगे (१९५९), युरोपियनांचा मराठीचा अभ्यास व सेवा, प्रकाशक : श्री. म. पिंगे, औरंगाबाद, पृ. ३००-३०१.
१३. तत्रैव, पृ. ३५६.
१४. तत्रैव, पृ. ३२१.
१५. न्यायमूर्ती रानडे यांचा मूळ निबंध उपलब्ध असून तो Miscellaneous Writings of the Late Hon'be Mr. Justice M. G. Ranade (1915), Publisher : Ramabai Ranade, Mumbai, या ग्रंथात समाविष्ट आहे.
या निबंधाचे मराठी भाषांतर अहमदनगर येथील डॉ. गं. ना. मोरजे यांनी केलेले असून ते त्यांनी स्वतःच संपादित केलेल्या 'मराठी दोलामुद्रिते' (१९९५), गोमंतक मराठी अकादमी, गोवा, या ग्रंथात समाविष्ट आहे.
१६. (क) या इंग्रजी निबंधावरून चिंतामण नीलकंठ जोशी यांनी मराठी वाङ्मयाची अभिवृद्धी (प्रकाशक डी मदावे, मुंबई, १९३) हे पुस्तक लिहिले आहे.
(ख) या निबंधाचे भाषांतर डॉ. स. गं. मालशे यांनी मराठी वाङ्मयाची अभिवृद्धी : एक टिपण १८९८ (प्रकाशक : मराठी संशोधन मंडळ, मुंबई, १९८२) या शीर्षकानिशी केलेले आहे.
१७. या वादाच्या समग्र तपशिलासाठी पाहा : ना. वि. पाटणकर (१९८४) मुंबई विद्यापीठात मराठीची प्रस्थापना : १८५८ ते १९४७, प्रकाशक : मराठी

विभाग : मुंबई विद्यापीठ, मुंबई.

१८. M. G. Ranade (1915), [. 11.

१९. म. गो. रानडे (भाषांतर : डॉ. स. गं. मालशे) (१९८२), पृ. ११-१२.

२०. ल. रा. पांगारकर (१८९८), मराठी भाषेचे स्वरूप, प्रकाशक : विष्णु गोविंद विजापूरकर, कोल्हापूर, पृ. ४.

२१. ग. ज. आगाशे, ''महाराष्ट्र वाङ्मय'', कै. ग. ज. आगाशे यांचे निवडक लेख (१९५८) (संपादक : द. ग. आगाशे), प्रकाशक : डॉ. वा. ग. आगाशे, पुणे, पृ. ९३.

२२. ग. ज. आगाशे यांचे हे सर्व लेखन उपरोक्त कै. ग. ज. आगाशे यांचे निवडक लेख (१९५८) या संपादित ग्रंथात समाविष्ट आहे.

२३. 'सुविचारसमागम' हे मासिकपुस्तक स्वतः मोती बुलासाचच संपादित करीत होते. मे १८९८ मध्ये सुरू झालेले हे मासिक त्यांच्या मृत्युनंतर मे १९०१ मध्ये बंद पडले. साहजिकच मोती बुलासा जसे आजवर अपरिचित राहिले, तसेच त्यांचे हे मासिकपुस्तकही आजवर अपरिचित राहिल्याचे दिसते.

२४. मोती बुलासा यांचे हे सर्व लेखन नुकतेच संपादित झालेले असून आता ग्रंथरूपात उपलब्ध आहे. पाहाः विद्यागौरी टिळक आणि द. दि. पुंडे (संपादक) (१९९८) मराठी वाङ्मयाची सद्यःस्थिती, स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे.

२५. विद्यागौरी टिळक आणि द. दि. पुंडे (संपादक) (१९९८), पृ. ४५.

२६. तत्रैव, पृ. ४७.

२७. तत्रैव, पृ. ११५.

२८. तत्रैव, पृ. ११५.

२९. तत्रैव, पृ. ११५-१६

३०. पाहा : Hans Robert Jauss, "Literary History as Challange to Literary Theory", **Towards Aesthetics of Reception** (Tr. Timothy Bahti), The Harvest Press, Brighton, 1982.

३१. 'एक्स-रे'चा शोध १८९५ साली लागला. हा शोध भारताच्या शास्त्रीय जगतात यायला विलंब लागला. पण बुलासा त्या शोधासंबंधीचे ज्ञान लागोलाग मिळवतात व उपमास्वरूपात ते उपयोजितात, हा त्यांच्या विलक्षण बुद्धिमत्तेचा एक पुरावाच होय.

३२. विद्यागौरी टिळक व द. दि. पुंडे (१९९८), पृ. ७८.

३३. तत्रैव

३४. ना. कृ. गद्रे, (महाराष्ट्र-सारस्वत'' (पुस्तकपरीक्षा), **विविधज्ञानविस्तार** एप्रिल १९२०, पृ. १४१ ते १५१ आणि मे १९२०, पृ. १९३ ते २०७.

३५. द्वारा ना. कृ. गद्रे, उपरोक्त, पृ. १४२.

३६. प्रो. दत्तो वामन पोतदार (१९३५), मराठी इतिहास व इतिहाससंशोधन, प्रकाशक : विष्णु पांडुरंग नेने, पुणे.

३७. तत्रैव, पृ. ८१.

३८. वि. ल. भावे, ''नागेशकविकृत सीतास्वयंवर-प्रस्तावना'' महाराष्ट्र-कवि, वर्ष २, अंक ४, स्वतंत्र पृ. २

३९. वि. ल. भावे, **महाराष्ट्रभाषासरस्वतीच्या महालातील एक अज्ञात दालन**, (मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या रौप्यमहोत्सव प्रसंगी वाचलेला निबंध) प्रकाशक : अं. गो. पुणतांबेकर व वि. का. शौचे, मुंबई.

४०. वि. ल. भावे, ''महाराष्ट्राच्या पेठेत महाराष्ट्र-वाङ्मयाचा दर्जा व किंमत'', वारसा (संपादक : रामचंद्र चिंतामण ढेरे), (१९७१), विश्वकर्मा, पुणे, पृ. १३७-१४७.

४१. वि. ल. भावे, ''उपोद्घात'', **महाराष्ट्र-कवि** अंक १, शके १८२५, पृ. २.

४२. Robert E Spiller, "Liyerary History", **The Aims and Methods of Scholarship in Modern Languages and Literatures**, (Ed. James Thorpe), American Studies Re search Centre, Hyderabad, (Reprint of 1970 second edition, revised) 1979. p. 67.

❖❖❖

डॉ. द. दि. पुंडे
४/९, अर्चनानगर, गणेशनगर जवळ,
एरंडवन, पुणे ४११ ०३८.

जागतिकीकरण आणि विश्वधर्म

पद्मश्री डॉ. यू. म. पठाण

[जागतिकीकरणाने आलेल्या किंवा येऊ पाहणाऱ्या तथाकथित संपन्नतेने चंगळवाद, मानसिक स्खलन आणि अधःपतनाचे संकट येत आहे. पाश्चिमात्य संस्कृतीची ही नकारात्मक बाजू केवळ भारतालाच नव्हे तर जगाला ग्रासू पहात आहे. त्यामुळेच पाश्चात्य देश भारतीय संस्कृतीतील विविध धर्मांच्या उदात्त जीवनमूल्यांकडे ओढले जात आहेत. ...राष्ट्राराष्ट्रातील संघर्ष, युद्धं, धर्मयुद्धं, जिहाद, क्रूसेड्स्, अणुयुद्धं टाळण्याची मानसिकता ही केवळ 'युटोपियन' न राहता, प्रत्यक्षात येईल. ... विश्वाचे मानसिक परिवर्तन घडविण्याचे सामर्थ्य भारतीय संतसाहित्यात आहे. पद्मश्री डॉ. पठाण सरांनी पहिल्या विश्वकर्म संतसाहित्य संमेलनाध्यक्ष पदावरून व्यक्त केलेले विचार. –संपादक].

राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज यांनीच स्थापन केलेल्या 'गुरुकुंज' आश्रमात त्यांच्या जन्मशताब्दी समारोपाच्या निमित्ताने हे पहिलं 'विश्वधर्म संतसाहित्य संमेलन' होत आहे; ही आपल्या देशातील एक अत्यंत महत्त्वाची ऐतिहासिक व सांस्कृतिक घटना आहे, असं मला वाटतं. ती भारताच्या महामहीम राष्ट्रपतींच्या नि आपणा सर्व संतसाहित्यप्रेमींच्या साक्षीनं घडत आहे, याचा मला मनस्वी आनंद वाटतो.

गुरुकुंजात नववर्षात पदार्पण करताना होणाऱ्या संमेलनाला आपण 'विश्वधर्म संतसाहित्य संमेलन' हे नाव हेतुतः दिलं आहे. ते राष्ट्रसंतांच्या जन्मशताब्दी समारोपाच्या निमित्तानं होत आहे, यालाही एक आगळं, लक्षणीय महत्त्व, औचित्य व संदर्भ आहे. तो कसा आहे याची प्रचीती या संमेलनात विविध धर्म/पंथ विषयक परिसंवाद आणि चर्चा यांच्यामधून येईलच. ती तशी यावी, या दृष्टिकोनातूनच त्यांचं नियोजन केलं आहे. विश्वातील विविध धर्मांचा विचार केला तर त्यांतील प्रमुख धर्मांची उत्पत्ती आणि त्यांचा विकास भारतातच झाला आहे व त्यांतील काही धर्म भारतातून विश्वातील अन्य देशांतही गेले व त्यांना मोठ्या प्रमाणात अनुयायी लाभले. बौद्ध धर्माचा या संदर्भात अवश्य निर्देश करायला हवा. भारतात ज्यांची उत्पत्ती झाली त्या धर्मांत हिंदू, बौद्ध, जैन, वीरशैव व शीख हे पाच प्रमुख धर्म आहेत. हिंदू, बौद्ध व जैन या धर्मांचा प्रसार भारताबाहेरही झाला. विश्वाच्या अन्य देशांत निर्माण झालेल्या धर्मांत इस्लाम व ख्रिस्ती धर्म हे प्रमुख धर्म होत. त्यांचा प्रसार पुढं विश्वातील विविध देशांप्रमाणं भारतातही झाला. आज भारतातील प्रमुख धर्मांत त्यांचीही गणना होते. त्यांच्याप्रमाणं पारशी व ज्यू (बेने इस्त्राईल) हे धर्म भारताबाहेरून भारतात आले. तसे असले तरी आता जणू भारतीयच झाले आहेत. असा व्यापक विचार करता भारत ही आता जणू विश्वातील प्रातिनिधिक भूमी-'प्रतीकात्मक छोटेखानी धर्म-विश्व'च झालं आहे.

या विविध धर्मांचे विविध पंथ वा संप्रदायही आहेत; उपपंथही आहेत. त्या सर्वांनी जागतिक भक्ति-साहित्यात मोलाची भर घातली आहे. जागतिक भक्तिसाहित्य-परिषदांमध्ये जसं त्यांचं व्यवच्छेदकत्व दिसतं, तसंच त्यांचं अनन्यसाधारणत्वही दिसतं.

विश्वातील या सर्व धर्मांमध्ये अनेक समान शाश्वत मूल्यं आहेत. त्यांचा विश्वात्मकतेशी अत्यंत जिव्हाळ्याचा संबंध आहे. केवळ विश्वातील मानवाशीच नव्हे; तर प्राणिमात्रांशीही घनिष्ट संबंध आहे. त्या सर्वांचा उद्धार ही त्यामागील प्रेरणा आहे, ऊर्जा आहे. ही निर्गुण ऊर्जा वैश्विक भक्तिसाहित्यात कसकशी रूपं घेते, याची ही विश्वधर्म संतसाहित्यसंमेलनं म्हणजे आत्मभान देणारी जणू शोध-यात्राच होय.

आपला भारत देश हाच जणू अध्यात्मानं भारलेला देश आहे. त्यातही महाराष्ट्र हे तर संतांचं माहेरघरच आहे. त्यातील वेदर्भी भूमीचे रजःकण संतांच्या नि महापुरुषांच्या, महात्म्यांच्या पदस्पर्शानं पावन झालेले आहेत. त्यांना या पदस्पर्शाचा मृद्गंध शतकानुशतकं येत आहे. त्या परिस- स्पर्शानं ते पुनीत पावन झाले आहेत. तेजाळले आहेत.विदर्भातील संतांची नामावली फार मोठी आहे. ती केवळ व्यापकच नाही तर अनेक धर्मपंथावगुंठित आहे. त्या सर्वांचा निर्देश इथं करणं माझ्या आवाक्याच्या पलीकडचं आहे. महानुभाव

संप्रदायाचे अवतारस्वरूप व पंथप्रवर्तक श्रीचक्रधरस्वामी यांचा संचार विदर्भातही होता; तर पंथांचे दुसरे अवतार श्रीगुंडमराऊळ ऊर्फ श्रीगोविंदप्रभू हे तर अमरावती जवळच्या रिद्धपुरचे ! राष्ट्रसंतांचे गुरू आडकोजी महाराज, गुलाबराव महाराज, ताजुद्दीनबाबा, लाडाच्या कारंजाचे जैनमुनी, बाबामहाराज आर्वीकर, नरसिंहमहाराज, वीरशैव संत यांचा मी केवळ इथं प्रतिकात्मक निर्देश करतो. सेवाग्राम नि महात्मा गांधी त्याचप्रमाणं पवनार नि विनोबा यांचा घनिष्ट व जिव्हाळ्याचा संबंध सर्वज्ञात आहे. त्याचप्रमाणं गाडगेबाबा आणि राष्ट्रसंत तुकडोजीमहाराज यांच्या वास्तव्यानं ही भूमी धन्य झाली आहे.

दहशतवाद ही मूलतत्त्ववादाची तार्किक व वास्तव परिणती आहे. तो एका प्रदेशाला वा देशाला व्यापत नाही तर संपूर्ण विश्वाला व्यापत आहे. कोणत्याही धर्माचा/पंथांचा/राष्ट्राचा मूलतत्त्ववाद हा त्या धर्माची/पंथांची/राष्ट्राची अपरिमित हानी व विध्वंसच करीत असतो. इतरांच्या विनाशाबरोबरच स्वतःच्याही विनाशाचाही पाया रचीत असतो, याचं भान या मूलतत्त्ववाद्यांना असतं का ? स्वधर्माचं (स्वेच्छेनुसार) पुनर्प्रस्थापन करायला निघालेले हे मूलतत्त्ववादी स्वतःच्याच विनाशाला व स्वतःच्या धर्माची प्रतिमा डागळायला कारणीभूत ठरतात, हे मानवी बॉम्बच्या साध्या उदाहरणावरूनदेखील सांगता येईल. त्याचप्रमाणं अमेरिकेतील (वर्ल्ड ट्रेड सेंटरच्या) व अन्य देशांतील दहशतवादाच्या अन्य घटनांवरून सांगता येईल. अशा घटना आपल्या देशात व जगात अन्यत्र कुठं तरी घडत आहेत, त्यामुळे आपलं त्यांच्याशी काही देणं-घेणं नाही, आपण आपल्या अभेद्य (?) कवचात वा कोसल्यात अत्यंत सुरक्षित आहोत व सुखात आहोत, असं मानणं म्हणजे स्वप्नांच्या साम्राज्यात रमणं होय. मृगजळात तृप्ती मिळाल्याचं समाधान मानण्यासारखं होय.

सर्वच धर्म व पंथ जगाला हे भान देत असतात. यासाठी जागतिक भक्तिसाहित्यपरिषदांप्रमाणंच प्रत्येक राष्ट्रात विश्वधर्मसंतसाहित्य संमेलन आयोजित करणं व सामाजिक मानसिकतेवर प्रबोधनाचे व उन्नयनाचे, उदात्ततेचे, उदारतेचे करुणेचे, अक्रोधाचे, अहिंसेचे, सद्सद्विवेकाचे, 'सर्वां भूतीं भगवद्भावांचे, प्रेमाचे, सद्भावाचे, सहजीवनाचे. सह-अनुभूतीचे सुसंस्कार घडविण्याचे एक लक्षणीय माध्यम म्हणजे 'विश्वधर्म संतसाहित्य-संमेलन' होय. केवळ जागतिक भक्तिसाहित्य-परिषदांत तात्त्विक चर्चा करून कसं भागेल ? या उद्दिष्टपूर्तीसाठी काही पावलं तातडीनं उचलणं गरजेचे आहे. देशोदेशींच्या प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक, महाविद्यालयीन व विद्यापीठीय पातळीपर्यंतच्या अभ्यासक्रमांत या सुसंस्कारांचा समावेश व्हायला हवा. पर्यावरणातील प्रदूषणाचं महत्त्व जागतिक वैज्ञानिकांनी कितीतरी दशकांपूर्वी ओळखलं होतं; पण ते पाझरत आता कुठं आपल्यापर्यंत आलं आहे. पण हिमालय वितळण्याची वाटच कशासाठी पाहात बसायचं ? तो सुरक्षित आहे तोपर्यंत आपलं रक्षण करील पण वितळताच आपला विध्वंसही करील, हे पर्यावरणवादी आजही निक्षून सांगत नाहीत का ? उत्तर-दक्षिण ध्रुवांची हीच परिस्थिती आहे व तशी ती होणार, हे पर्यावरणवाद्यांनी द्रष्टेपणानं आधीच जाणून, त्याचं शास्त्र केलं व त्याचा अभ्यासक्रमात समावेश केला. त्याचप्रमाणं प्रसारमाध्यमांच्या साहाय्यानं जगजागृती केली होती. आज कोपनहेगनसारख्या जागतिक परिषदाही यासाठीच भरत आहेत.

विज्ञानाची संहारक अस्त्रं योजण्यापर्यंत जिथं मजल जाते तिथं विश्वशांती आपोआप घडेल किंवा यज्ञ करून होईल, असं भाबडेपणानं मानून चालणार नाही, हे आजवरच्या अनेक उपक्रमांचा लेखाजोखा घेतल्यास सहज लक्षात येईल. सर्व धर्म व सर्व पंथ विश्वशांतीचा संदेश देतात तो कशासाठी ? खुद्द 'इस्लाम' या शब्दाचा अर्थ 'शांती' असा आहे. 'सलाम आलैकुम्' याचा अर्थ "Peace be on you" असा असून 'वालेकुम सलाम' याचा अर्थही त्याच आशयाचा आहे. तथागतांची प्रज्ञा-करुणा-शील ही तत्त्वत्रयी तरी कशासाठी ? महावीरांचा 'स्याद्वाद' किंवा 'अनेकान्तवाद' तरी कशासाठी ? बसवेश्वरांचा सामरसीकरणाचा वा 'षट्स्थल सिद्धांत' कशासाठी ? सूफीचं ' तसव्वुफ' दर्शन कशासाठी ? नानकदेवांची एकात्मतेची भूमिका व 'सत् श्री अकाल' कशासाठी ? शंकराचार्यांचं केवलाद्वैतमत किंवा मध्वाचार्यांचं द्वैतमत, श्रीचक्रधरस्वामींचं जीवोद्धरण किंवा

'संत्रिधान', ज्ञानदेवांचं पसायदान, शेख महंमदांचा 'दुचष्मा', एकनाथांचा' हिंदू-तुर्क-संवाद' नि तुकोबांचे 'आनंदाच्या डोहीं आनंदतरंग' तरी कशासाठी ? या सर्वांतील अन्तःसूत्र एकच !

वर्णवाद, धर्मवाद, जातिवाद, पंथवाद हे सारे का निर्माण होतात ? विनोबाजी 'गीताई' लिहितात, त्याचप्रमाणं 'कुराणसार'ही लिहितात. बायबल, धम्मपद, महावीरवाणी, गुरूग्रंथासाहेब यांच्याविषयीही लिहितात. सर्वधर्मसमभावाचा उद्‌घोष म. गांधी कशासाठी करतात आणि त्यासाठी देह का झिजवितात ? पं. जवाहरलालजी नेहरू पंचशील सिद्धान्ताचा पुरस्कार का करतात ? राष्ट्रसंत तुकडोजीमहाराज सर्वधर्मप्रार्थनेवरच इतका भर का देतात ? गाडगेबाबांचा देव कोणत्या धर्माचा होता ? बहिणाबाई चौधरी 'कधी व्हशील माणूस ?' असं का विचारतात ? आणि आंतरराष्ट्रीय कीर्तीचे वैज्ञानिक डॉ. माशेलकर आणि डॉ. विजय भटकर, विज्ञान व अध्यात्म यांची सांगड का घालतात ? हे सारे धर्म, पंथ, महापुरूष, महामानव, विश्वाची घडी विस्कटू नये म्हणूनच शतकानुशतकं असं करीत आहेत.

केवळ महाराष्ट्राचाच विचार केला तरी वारकरी, महानुभाव, नागेश, नाथ, दत्त, समर्थ, सूफी यासारखे सर्व संप्रदाय व मन्मथस्वामी, गुणकीर्ती, मुंतोजी बामणी, शेख महंमद शहामुनी यांच्यासारख्या संतांनी काय सांगितलं व त्यांतून विश्वधर्म संतसाहित्याची निर्मिती कशी झाली, हे आपण समजून द्यायला हवं.

जागतिकीकरणामुळं देशोदेशींच्या सीमारेषा एका अर्थानं नाहीशा झाल्या आहेत. प्रसारमाध्यमांमुळंही हे घडत गेलेलं आहे. पूर्वी विलायतेला जाणं आणि तेही बोटीतून, हा एक प्रदीर्घ आणि तुम्हा आम्हा सर्वसामान्य माणसांना स्वप्नातदेखील कल्पना करता येणार नाही, असं एक मृगजळ होतं. हजला जाणं ही सामान्य मुसलमानाला अशक्यप्राय वाटणारी गोष्ट होती. व्हेटिकन सिटी आणि आदरणीय पोप यांच्या प्रत्यक्ष दर्शनाचा विचारदेखील भारतासारख्या देशातील ख्रिस्ती माणसाला करता येण्याजोगा नव्हता. आज आपले महाविद्यालयीन तरुण मल्टीनॅशनल कंपन्यांचा 'कॅम्पस इंटरव्ह्यूज' मध्ये यशस्वी होऊन लठ्ठ पगारावर विदेशात नोकऱ्या करीत आहेत. भारतातल्या अनेक शहरांचं सर्वेक्षण केलं तर किमान दहा ते पंधरा टक्के लोकांची मुलं अशा प्रकारची संधी मिळवीत असतात किंवा ती मिळविण्याचा प्रयत्न करीत असतात. 'ग्रीन कार्ड' ही आता स्वप्नातली गोष्ट राहिली नाही, नाही तर कुणाला अमेरिकेत विश्व मराठी संमेलन भरविण्याची (अति) साहसी कल्पना सुचली नसती, शिवाय अमेरिकेतलेच कितीसे मराठी भाषक त्याला उपस्थित राहिले, याचा विचारही करता आला नसता.

पाश्चिमात्य संस्कृती व तिच्यामधील जीवनशैली कशी आहे, हे आज आपल्याला प्रसारमाध्यमांमुळं कळतं. प्रत्येक पिढीची बदलती मानसिकता माणूस जशी भौतिक प्रगती करीत आहे, त्याचप्रमाणं अधिकाधिक सुखासीन व उत्तरोत्तर प्रचंड वेगानं चंगळवादी होत आहे. त्यांची विवाहसंस्था, कुटुंबव्यवस्था, नातेसंबंधातील वाढता दुरावा, नीतीच्या सोयीप्रमाणं बदलून घेतलेल्या व्याख्या, कामजीवनाचे विविधलिंगी प्रकार-उपप्रकार गावोगावी नि शहरोशहरी, ढाब्यांमध्ये देखील बिअर बार्स दिसू लागले आहेत. 'मॉल्स' मध्ये बिअर विकण्याचा 'अत्याधुनिक अतिपुरोगामी' विचारही सुरू असल्याचं कळतं 'गुटखा' म्हणजे काय ते प्राथमिक शाळेतल्या मुलांनाही काही (आदर्श शिक्षकांमुळं ?) कळू लागलं आहे. पाश्चिमात्य संस्कृतीतील व्यसनाधीनतेचा प्रभाव जागतिकीकरणामुळं वाढेल हे सांगायला कुणा ज्योतिषाची गरज नाही. विदेशातील 'पार्टी-संस्कृती' आता आपल्याकडेही मूळ धरू लागली आहे. खरं तर ती रूजलीच आहे. मल्टीनॅशनल कंपन्या नि त्यांतील कर्मचाऱ्यांचे भरभक्कम पगार यांचा प्रभाव जसा पाश्चिमात्य देशांवर पडला तसाच आता आपल्याकडेही पडू लागला आहे. नि असं होणं अपरिहार्य आहे. बाटल्या आडव्या करण्यासाठी खेडोपाड्यांतील स्त्रियादेखील पुढं सरसावून निषेध करीत, ग्रामसभेत ठराव करून वा मद्यविक्रीच्या दुकानांवर मोर्चे नेऊन, ती बंद पाडीत आहेत, ही स्वागतार्ह बाब आहे. महात्मा गांधींच्या काळातही केलं जाणारं उत्स्फूर्त पिकेटिंग' हे यासारखं होतं. जर काही अध्यापक प्राध्यापकही सहाव्या आयोगापूर्वी आणि विशेषतः त्यानंतरही अधिक व्यसनाधीन झाले असतील

तर त्यापेक्षा मोठी चिंतेची बाब कोणती असू शकते ? एकविसाव्या शतकातलं हे बदलतं समाजजीवन नि ढासळती जीवनशैली आपण अत्यंत सावध व सतर्क होऊन, वेळीच गांभीर्यानं समजून घ्यायला हवी नि त्यानुसार प्रत्यक्ष कृतिकार्यक्रमाचं (Action Plan) कालबद्ध नियोजन करायला हवं. केवळ भारतातच नाही तर जगातील अन्य देशांतही. त्यासाठी त्या देशातील धर्मग्रंथ, भक्तिसाहित्य, संतसाहित्य निश्चितपणे उपयुक्त ठरेल, आता प्रत्येकानं जशी स्वतःची व स्वतःच्या राष्ट्राची चिंता करायला हवी तशी विश्वाचीदेखील चिंता करायला हवी. 'चिंता करितो विश्वाची' समर्थ बालपणीच म्हणायचे. स्वामी विवेकानंद त्यासाठी अमेरिकेत गेले नि राष्ट्रसंत तुकडोजीमहाराज जपानमध्ये गेले.

'कॅट-वॉक' नि 'रॅप वॉक', वाहिन्यांवरील 'चॅटिंग' नि त्याची भयावह परिणती, सायबर क्राइम्स, चंगळवादाच्या पूर्तीसाठी अपराधांनी निभ्रष्टाचारांनी गाठलेली परिसीमा, मातृत्वाचे किंवा खरं तर गर्भधारणेचे भाडोत्री उपाय, 'डेटिंग' होत नसल्यामुळं मुलीप्रमाणंच त्यांच्या माता-पित्यांनाही वाटणारी चिंता, वाढती व्यसनाधीनता नि हिंसा, 'डिप्रेशन' म्हणजे प्रत्येकाच्या जीवनातील अपरिहार्य व नैसर्गिक रोगच आहे, हे मानण्याची असहाय प्रवृत्ती, उदात्त जीवनमूल्यांचं स्खलन ही पाश्चिमात्य संस्कृतीची नकारात्मक बाजू आहे तर ज्ञान-विज्ञान-उद्योग व अन्य क्षेत्रातील प्रगती ही अत्यंत सकारात्मक बाजू आहे, हे नाकारून चालणार नाही. भारतासारख्या देशांवर जागतिकीकरणाचा हा गहिरा नकारात्मक प्रभाव अलीकडे जाणवू लागला आहे. पौर्वात्य संस्कृतीतील विशेषतः भारतीय संस्कृतीतील विविध धर्मांची उदात्त जीवनमूल्यं पाश्चिमात्य संस्कृतीत वाढणाऱ्या, वाढलेल्या लोकांना अधिक आकर्षित करू लागली आहेत. योगसाधना मनोनिग्रहासाठी उपयुक्त आहे, हे जसं त्यांना जाणवू लागलं आहे, त्याचप्रमाणं विविध भारतीय धर्मांतील तत्त्वज्ञानांचं नि या संत साहित्यांचंही एरवी जागतिक भक्तीसाहित्य-परिषदांच्या शोधनिबंधांतील भारतीय संत व त्यांचं साहित्य, या विषयाची आस्था व त्यासंबंधीचे शोधनिबंध, त्याविषयी झालेल्या चर्चा याचं प्रमाणं उत्तरोत्तर का वाढलं असतं ? त्याचप्रमाणं फ्रान्स, पश्चिम जर्मनी, रशिया, ऑस्ट्रेलिया, पोर्तुगाल, चेकोस्लोव्हाकिया, बेल्जियम, ब्रिटन. इ. किती तरी देशांतील भारतीय संतांच्या साहित्याचा अभ्यास व संशोधन करण्यासाठी प्राच्यविद्या संशोधकांचा ओघ का वाढला असता; नि विदेशी विद्यापीठांतही प्राच्यविद्या विभाग (Department of oriental Studies) का निर्माण झाले असते ? या विद्यापीठांत लंडन विद्यापीठ व त्यातील S.O.A.S. (School of Oriental and Agrican Studies) पश्चिम जर्मनीतील बॉन आणि हैडलबर्ग ही विद्यापीठं, बेल्जियमची कॅथॉलिक युनिव्हर्सिटी, रशियातील लेनिनग्राड विद्यापीठ, चैकच्या प्रागमधील चार्लस् विद्यापीठ व ओरिएंटल इन्स्टिट्यूट, युगोस्लाव्हियातील विद्यापीठ, अमेरिकेतील ॲरिझोना व फिलाडेल्फिया विद्यापीठ, फ्रान्सचं पॅरिस विद्यापीठ यांचा प्रतिकात्मक उल्लेख करता येईल. त्याचप्रमाणं ज्ञानदेवांच्या 'हरिपाठाच्या अभंगां'चा फ्रेंच अनुवाद करणाऱ्या मादाम वॉद्‌विल् आणि वारकऱ्यांच्या वारीविषयी प्रत्यक्ष वारीत येऊन व तिच्यातील एकात्मतेची प्रचीती घेऊन तिच्याविषयीची चित्रफीत आंतरराष्ट्रीय भक्तिपरिषदात निरूपणासह सादर करणाऱ्या फ्रेंच विदुषी डॉ. कॅथरीन किन्ले, पशिाचम जर्मनीतील डॉ. प्रा. व सौ. डॉ. प्रा. हार्स्टमन यांचं (अनुक्रमे) द. आफ्रिकेतील टोळ्यांच्या देवविषयक (संकल्पना concept of God) व संत दादू यांच्याविषयीचं संशोधन, त्याचप्रमाणे खंडोबाविषयीचं मौलिक भारतात अनेकदा येऊन करणारे जर्मन संशोधनवृत्ती डॉ. सोन्थाअिमर, सतरा-सतरा वर्षं नामदेवांचा ध्यास घेऊन त्यांच्या मराठी-हिंदी साहित्याचा अभ्यास करून '(Do we know Namadeo ?)' या प्रश्नात्मक शीर्षकाचा ग्रंथ लिहिणारे बेल्जियमचे डॉ. कॅलव्हर्टे, महानुभाव व्याकरणासारख्या, गहन विषयात रमणारे रशियन संशोधक डॉ. कुझनेत्सोव्ह व मराठी साहित्याचा रशियन अनुवाद करणाऱ्या डॉ. तात्यांना कचेनिना, विश्व हिंदी परिषदेचं अध्यक्षपद भूषविणारे प्रागच्या चार्लस् विद्यापीठातील भाषाविभाग प्रमुख माझे स्नेही व

ज्यांच्याबरोबर मी 'अतिथी' प्राध्यापक म्हणून काम केलं ते डॉ. स्मेकाल, महानुभाव साहित्यसूची लंडन विद्यापीठ संशोधन- पत्रिकेत संपादित करून प्रकाशित करणारे, महानुभाव पंडित हयग्रीवाचार्य याचं साहित्य (गद्यराज) संपादिणारे लंडन विद्यापीठातील माझे स्नेही डॉ. अिऑन रेसाओड, महानुभावाचे अवतार-ऋद्धिपूरचे श्रीगोविंदप्रभु यांच्याविषयी संशोधन करणाऱ्या, माझ्या विद्यापीठातील मराठी विभागीय हस्तलिखितातील महानुभाव तत्त्वज्ञान विशद करणाऱ्या चौदाव्या शतकातील हस्तलिखिताचं संशोधन/संपादन/प्रकाशन करणाऱ्या, त्याचप्रमाणं माझे गुरू डॉ. शं. गो. तुळपुळे यांच्याबरोबर Dictionary of old Marathi या मौलिक संदर्भग्रंथांचं संपादन करणाऱ्या, अमेरिकेच्या डॉ. ॲन फेल्डहौस. एकनाथांच्या हिंदू-तुर्कसंवादाचं संशोधन-संपादन करणाऱ्या तसंच आंबेडकरी चळवळीच्या विख्यात अभ्यासक डॉ. एलिनार झेलियट, पुण्याच्या स्नेहसदनात राहून The culf to Vilthoba हा वारकरी संप्रदायविषयक ग्रंथ गोव्याच्या सागरातच विलीन झालेले पोर्तुगालचे फादर दलरी, राचीत राहून रामचरितमानसाच्या व रामायणाच्या संशोधनासाठी उभं आयुष्य वेचणारे डॉ. कायिल बुल्के इ. कितीतरी आंतरराष्ट्रीय ख्यातिप्राप्त विद्वानांचा व प्राच्यविद्याविशारदांचा या संदर्भात उल्लेख करता येईल.

यापूर्वी मध्ययुगात, चीन व अरबस्तान या देशांतून भारतीय धर्म, तत्त्वज्ञान व संतसाहित्य यांचा अभ्यास करण्यासाठी ते आले होते. अलबेरुनी या अरब पंडितानं दहाव्या शतकात भारतात येऊन दहा-बारा वर्ष भारतात राहून, संस्कृत भाषेचं अध्ययन करून (अल्बेरूनीची) 'गीता व तारीख-उल्-हिन्द' हे दोन ग्रंथ लिहिले व अरब जगाला भारतीय दर्शनानंच महत्त्व पटवून दिलं. यांपैकी दुसऱ्या ग्रंथांचा मराठी अनुवाद मी साहित्य अकादमीसाठी केला आहे. जगातील सर्व धर्मांच्या तत्त्वज्ञानात मला जी साम्यस्थलं आढळतात त्यांत नीतिमूल्यांतील साम्य मला विशेष लक्षात घेण्याजोगल वाटतं ही नीतीमीमांसा फार क्लिष्ट नाही. ती केवळ दुपदरी आहे द्विसूत्री आहे. त्यामुळंच ती जनसामान्यांच्या आटोक्यातली आहे. सत्प्रवृत्ती हा तिचा एक पदर आहे तर असत् प्रवृत्ती हा दुसरा त्या दोहोंमध्ये एकच उभी सरळ रेषा आहे, लक्ष्मणरेषा आहे. ही रेषा आहे सद्सद्विवेकाची ह्या सद्सद्विवेकाचं केंद्र असतं आपलं मन. हे मनच आपल्याला सत्प्रवृत्त किंवा दुष्प्रवृत्त करीत असतं. मी एका ओळीत हे सांगितलं असलं तरी त्यांचा प्रभाव काय काय करू शकतो, हे आपण प्रत्यक्षही पाहात असतो. जेव्हा मन अढळ असतं तेव्हा ते आपल्याला कल्याणाचा मार्ग दाखवितं नि ढळलं की कुटुंबात, समाजात, राष्ट्रात नि जगात कसे उत्पात होत असतात, याची प्रचीती आपल्याला नेहमी असते, जागतिकीकरणामुळे हे स्खलन, हे अधःपतन अधिकाधिक वाढण्याची शक्यता असते.

यासाठीच इस्लाममध्ये 'अखलाक्' बरोबर 'आमाल्' लाही महत्त्व दिलं आहे. वारकरी संप्रदायांनी विचार-संहितेबरोबर आचारसंहितेलाही महत्त्व दिलं आहे. महानुभाव संप्रदायानं ब्रह्मविद्येबरोबर 'असती परी'ही सांगितली असून 'अष्टस्वभाव मात्रां'चाही विचार केला आहे. ज्ञानदेवांनी ज्ञान व भक्तिमार्गाबरोबर कर्ममार्गाचीही महत्ता वर्णून त्या सर्वांचा समन्वय साधला आहे. समर्थांनी तर 'उत्तम पुरुषांची' दिनचर्याच सांगितली आहे. महात्मा बसवेश्वरांनी षट्स्थलसिद्धान्ताबरोबर कर्माचं महत्त्व 'काय कवे कैलास' या वचनात प्रतिपादिलं आहे. नाथ संप्रदायानं चिंतन, मनन, ध्यान आणि आसनं यांचा समन्वय योगसाधनेत साधला आहे. वारकऱ्यांची माळ ही प्रतिकात्मक असते पण ती धारण केल्यावर तिच्या पावित्र्याचं रक्षण आचार-विचारांतून करण्याचं दायित्व प्रत्येक वारकरीही स्वीकारीत असतो. ही खरं तर मानसिक परिवर्तनाची वा उन्नयनाची प्रक्रिया आहे. पण तिची बाह्य परिणती आचारधर्मातून प्रकट होत असते. व्यक्तीत हे मानसिक परिवर्तन झालं की त्याची परिणती समाजाच्या मानसिकतेत व याच क्रमानं राज्याच्या, राष्ट्राच्या व अन्तिमतः विश्वाच्या मानसिकतेत हे परिवर्तन होत होत जातं. विश्वधर्म संतसाहित्य संमेलनांची खरी गरज आहे ती यासाठी. हे घडलं की राष्ट्राराष्ट्रातील संघर्ष, युद्ध, धर्मयुद्ध, जिहाद, Crusads, जागतिक महायुद्ध अणुयुद्ध टाळण्याची

वैश्विक मानसिकता निर्माण होणं ही 'यूटोपियन' कल्पना राहणार नाही. आता 'पसायदान' यासाठी मागावं लागणार आहे. खरं तर हे मूळ 'पसायदान'च आहे पण त्याचा हा एकविसाव्या शतकातला नवा संदर्भ, नवा आयाम, नवा अवतार आहे. आजही विविध धर्मांच्या पवित्र ग्रंथांत व त्यांच्या संतसाहित्यात या उन्नयनाची मानसिकता परिवर्तनाची ऊर्जा दडली आहे.

'विश्वधर्म संतसाहित्य संमेलन' राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या जन्मशताब्दीच्या निमित्तानं आयोजित केलं जात असल्यानं आपण केवळ प्रतीकात्मक म्हणून राष्ट्रसंतांनी 'ग्रामगीते' त हा समन्वय साधला. ज्ञानमार्ग, भक्तिमार्ग आणि कर्ममार्ग यांतील एकारलेपण त्यांनी नाकारलं. शिस्तबद्ध श्रद्धायुक्त पण बुद्धिप्रामाण्याधिष्ठित जीवनशैलीचा त्यांनी पुरस्कार केला; शैशव, यौवन व जरा या जीवनाच्या त्रिविध अवस्थांतून तिची बीजं पेरली, त्यातून आदर्श बालक, आदर्श युवा, आदर्श ज्येष्ठांचे आले रेखाटले. आदर्श कुटुंबव्यवस्था, आदर्श समाजव्यवस्था, आदर्श ग्रामनिर्मिती, आदर्श राष्ट्रनिर्मिती, आदर्श विश्वनिर्मिती यांची केवळ स्वप्नंच दाखविली नाहीत तर ही स्वप्नसृष्टी वास्तवात अवतरण्यासाठी 'गुरूकुंजा'च्या शाखा जागोजाग स्थापना केल्या. आदर्श समाजसेवक, प्रचारक व नेते कसे असावेत, याचे विविध संघटना स्थापून वस्तुपाठ दिले. आदर्श व्यक्तिजीवन समाजजीवन, राष्ट्रजीवन, विश्वजीवन यांची परस्परांशी रेशीमगाठ बांधली नि 'भूवैकुंठ' निर्मिण्याचा प्रयत्न केला.

❖❖❖

पद्मश्री डॉ. यू. म. पठाण
२, आनंदनगर, टाऊन हॉल,
औरंगाबाद ४३१ ००१
दूरभाष : ०२४०/६५०१९८७, २४०२०८२

(राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जन्मशताब्दीनिमित्त दि. ६ जानेवारी २०१० रोजी आयोजित पहिल्या विश्वधर्म संत साहित्यसंमेलनाच्या अध्यक्षपदावरून व्यक्त केलेले विचार. स्थळ : 'गुरूकुंज' आश्रम, मोझरी, ता. तिवसा, जि. अमरावती)

अरुण शेवते यांच्या 'मालिका-कविता'

टी. एन्. परदेशी

[अल्पाक्षरी 'ठुमरी' भावलयीच्या अमर्याद आविष्कारातून गायिली जाते. लय-तालाचे शब्दगौण नाते काळ-वेळेच्या बंधनापलिकडचे आहे. तशीच मालिका-कविता शब्दांच्या लय-तालातून 'तो' भाव व्यक्त करण्यासाठी विस्तारत जाते. – संपादक]

'कावळ्यांच्या कविता' हे अरुण शेवते यांच्या कवितांचे पहिले पुस्तक १९८० साली प्रसिद्ध झाले. तेव्हापासून आजपर्यंत सरासरीने तीन वर्षांनी एक अशी शेवते यांची कवितांची दहा पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत. कविता लेखनामध्ये असे सातत्य अभावानेच आढळते.



शेवते यांच्या आजपावेतो प्रसिद्ध झालेल्या एकूण कवितेचा 'दृष्टीक्षेपात लेखाजोखा' पुढे दिला आहे.

दहा पुस्तकांपैकी बहुतांश पुस्तके 'मालिका कविता' या काव्यप्रकाराची आहेत. त्यामुळे शेवते यांना प्राधान्याने मालिका-कवितांचे कवी असेच म्हणावे लागेल. वसंत बापटांच्या 'मानसी'वर विजया राजाध्यक्ष यांच्या 'कवितारती' या काव्यसमीक्षापर ग्रंथामध्ये एक स्वतंत्र प्रकरण आहे. 'मानसी' या मालिका कवितेच्या निमित्ताने या काव्यप्रकाराचा विजयाबाईंनी तपशिलाने सखोल परामर्श घेतलेला आहे.

'' 'मालिका-कविता' हा एक स्वतंत्र काव्यप्रकार आहे. कथाकाव्य व खंडकाव्य यांच्यावर असलेल्या विविध बंधनांपासून तो मुक्त असतो. 'मालिका कवितेत'ही संविधानक, व्यक्तिरेखा इ. गोष्टी असल्या तरी त्यांचे तिच्यातील स्थान आनुषंगिक असते. कवीचे व्यक्तिमत्त्व, त्याच्या भावभावना हे तिचे केंद्र असते. त्यामुळे चांगली 'मालिका कविता' ही एखाद्या दीर्घ भावकवितेसारखीच असते.'' (कवितारती पृ. १७५)

'मालिकाकविते'त कहाणी असते, आणि ती कोणाच्या तरी आयुष्यात घडलेली असते. 'तो' किंवा 'ती' ही मालिका कवितेची केंद्रीभूत व्यक्तिरेखा असते. (कवितारती पृ. १७९)

या मांडणीनुसार शेवते यांची बहुतांश कविता 'मालिका कविता' या काव्यप्रकारात येते. सई मालवणकर, तळघर, पाऊस, कालिंदी, सफिया बेगम व पंतप्रधानांना पत्र या पुस्तकांचा यासंदर्भात प्रामुख्याने उल्लेख करावा लागतो. कावळ्यांच्या कविता, संदर्भ व राजघाट या पुस्तकातील कविता, कविता-संग्रह आणि मालिका कविता यांच्या पुसटशा सीमारेषेवर उभी आहे.


'कावळ्यांची कविता' मधील कविता कवीने


अ.क्र.	पुस्तकाचे नाव	प्रसिद्धी वर्ष	प्रकाशक	प्रस्तावना	पुरस्कार
१	कावळ्यांच्या कविता	१९८०	अजब-कोल्हापूर	नरहर कुरुंदकर	राज्य वाङ्मय पुरस्कार
२.	संदर्भ	१९८२	मेहता	विजया राजाध्यक्ष	--
३.	सई मालवणकर	१९८४	मेहता	(प्लर्ब) इंदिरा संत	--
४.	राजघाट	१९८८	सुरेश एजन्सी	--	म.सा.प. कवी यशवंत
५.	तळघर	१९८९	उत्कर्ष	शिरीष पै	राज्य वाङ्मय पुरस्कार
६.	ऋतुरंग	१९९२	सुरेश एजन्सी	दया पवार	--
७.	कालिंदी	१९९९	ग्रंथाली	--	--
८.	पाऊस	२००२	ग्रंथाली	विजया राजाध्यक्ष	--
९.	साफिया बेगम	२००४	ग्रंथाली	दिलीप चित्रे	--
१०.	पंतप्रधानांना पत्र	२००८	ग्रंथाली	--	--

अनुक्रमणिका

विशीच्या वयात असताना १९७८-७९ मध्ये लिहिली आहे. मराठी साहित्याच्या इतिहासात १९८० चे दशक हे मोठ्या घडामोडीचे होते. या काळात शेवते यांनी स्वतःची अशी वेगळी वाट धरली. लेखणीला पूर्वसुरींच्या प्रभावापासून अलिप्त ठेवले. या वयात लिहित्या होणाऱ्या हातांना स्वाभाविकपणे प्रेमकवितांचे डोहाळे लागतात. स्वप्नरंजनाच्या उमलत्या वयात शेवतेंची पहिली मैत्री झाली ती कावळ्यांशी ! नरहर कुरुंदकरांसारख्या सिद्धहस्त प्रतिभावंताने 'कावळ्यांच्या कविता'ला लिहिलेली प्रस्तावना, शेवते यांच्या 'कवी' म्हणून जडण-घडणीचा विचार करताना, अधिकच महत्त्वाची ठरते. भारतीय संस्कृतीत असलेल्या कावळ्याबाबतच्या संकेतांसाठी कुरूंदकरांनी प्रस्तावनेची दोन पाने दिली आहेत. कावळ्यांचा इतका तपशिलाने आपल्या कवितेत विचार करणारा हा पहिलाच आणि प्रौढजाणीवेचा कवी असल्याचे कुरूंदकर यांनी नमूद केले आहे. पहिल्याच कवितेत असे दमदार पाऊल टाकलेल्या व प्रभावीरीतीने व्यक्त झालेल्या शेवते यांनी आपली काव्यसाधना अधिकाधिक दमदारपणे अथक चालू ठेवली आहे.

'कावळ्यांच्या कविता' पाठोपाठ आलेल्या 'संदर्भ' मध्ये कवीने घोड्याचे प्रतीक घेतले आहे. भारतीय संस्कृतीत घोड्याविषयीही अनेक संकेत आहेत. घोडा बळकटपणाचे, वेगाचे व प्रामुख्याने पुरुषत्वाचे द्योतक आहे. कावळा प्रामुख्याने जीवनाच्या नकारात्मक अंगाशी निगडीत आहे, त्याला तथाकल्पित अशुभाचा-विटाळाचा स्पर्श आहे. घोड्याचे संकेत मात्र कावळ्याच्या विपरीत असे सकारात्मक आहेत, ते जीवनातील शुभाशी नाते सांगतात. तिसऱ्या 'सई मालवणकर' या पुस्तकातील मालिका-कवितेमधून पंचविशीतील कवीचा तारुण्यसुलभ प्रेमभावनेचा हुंकार-तरलनेते व्यक्त झाला आहे. त्यानंतर प्रसिद्ध झालेल्या 'राजघाट'मध्ये कवी सुरूवातीच्या १८ कवितांमधून थेट बापूंशी- महात्मा गांधीशी एकतर्फी संवाद साधतो व नंतरच्या ४८ कवितांमधून 'माकड' या प्रतिकाद्वारे भाष्य करत जातो. 'माकड' या प्राण्याविषयीही भारतीय संस्कृतीत अनेक संकेत व संदर्भ आहेत, तीन माकडांची मूर्ती गांधीजीवनाशी निगडीत आहे. वय वर्षे २० ते २७ या तारुण्याच्या ऐनवहराच्या काळात कवीने कवितांची उपरोक्त चार पुस्तके दिली असून त्यातील फक्त एक प्रेमविषयक आहे. यावरून शेवते यांची कवी म्हणून समाजाभिमुख वृत्ती प्रकर्षाने जाणवते. यापुढील सहा पुस्तकांपैकी २ पुस्तकांमध्ये निव्वळ सामाजिक आशयाची कविता असून ४ पुस्तके प्रेमकवितांची आहेत. म्हणजे एकूण दहा पुस्तकांपैकी पाच प्रेमकवितांची आहेत व पाच सामाजिक आशयाच्या कवितांची आहेत. अशा वर्गीकरणाने कवीचे व्यक्तिमत्त्व समजून घेण्यास मदत होते. 'स्व' आणि 'समाज' याबाबतीत कवीची वृत्ती समतोल आहे; असे निश्चितपणे म्हणता येते. अशा वृत्तीमुळेच कवीच्या समाजभानाइतकीच त्याची आत्ममग्नताही प्रभावीपणाने







त्याच्या कवितांमधून व्यक्त झाली आहे. आत्ममग्नतेत ओात्मशोधाचा अंतर्भाव आहेच, याशिवाय व्यक्तिगत भावभावनांचे कल्लोळही त्यांच्या शमन-दमनाच्या खटाटोपासह समाविष्ट होतात. आत्ममग्नतेत आत्मरतीही येते. प्रीतीच्या मूर्त-अमूर्त रूपांच्या भास-आभासांनी विकल झालेले कवीचे मन 'सई मालवणकर', 'तळघर' 'कालिंदी', 'पाऊस', आणि 'सफिया बेगम' अशा एकाहून एक सरस कवितांद्वारे व्यक्त झाले आहे.

'साफियाबेगम' ही शेवते यांची तरलतम प्रेमकविता आहे. ''मिताक्षरी, सूचक, संदिग्ध अशी एक कवितेची ''अभिजात जात'' आहे' तसेच 'सफिया बेगम'च्या 'कवितांचे रसग्रहण करण्याच्या आड आपले सध्याचे जातीय आणि कप्पेबंद राजकारणच येणार आहे,' असे या कवितेविषयी लिहिताना दि. पु. चित्रे यांनी म्हटले आहे. वेदनांचा भोगवटा पदरी घेऊन जगणारी विपण्ण सफिया बेगम, तिच्या कोमजलेल्या मनास उभारी देणारा सलिम, रूढ नात्यात रूपांतरित होऊ न शकणाऱ्या त्यांच्यातील जवळिकीपायी निर्माण झालेला असह्य ताण व या ताणाचे संतुलन ठेवण्यासाठी त्या दोघांमध्ये कवीने उभा केलेला 'फकीर' अशी या कवितेची मूलतः तिपेडी रचना आहे. विफलतेचा शाप भोगणाऱ्या सफियाबेगमला देण्यासाठी कवीकडे उःशापाची शक्ती नाही. स्वतःच निर्मिलेल्या पात्रांच्या असहाय्यतेने व नियतिशरणतेने कवीस आलेली हतबलता इतकी तीव्र आहे की, या मालिका कवितेच्या शेवटी कवी आपल्या नावाने- ''अरूण शेवते'' म्हणून प्रगट होतो. सामाजिक कवितांमधून जोरकसपणाने घुमणारा शेवते यांचा ध्वनी त्यांच्या प्रेमकवितांमधून कोमलपणे तरंगत येतो.

शेवते यांच्या व्यक्तिमत्त्वामध्ये ''कवीची वृत्ती'' प्राधान्याने असली तरी इतर अनेक साहित्यिक कार्ये ते यशस्वीपणाने पार पाडत असतात. गेली १७ वर्षे अनेक संस्थांची ४० पारितोषिके मिळवून यशस्वी ठरलेल्या 'ऋतुरंग' या दिवाळी अंकाचे संपादक म्हणून शेवते यांचा लौकिक आहे. 'ऋतुरंग'च्या प्रत्येक अंकातील लेख स्वतंत्ररित्या पुस्तकरूपाने प्रसिद्ध झालेले असून शेवते यांनी संपादित केलेली अशी एकूण ३३ पुस्तके विविध प्रकाशनसंस्थांनी काढली आहेत. अशा उपक्रमाचा मराठीतील हा एकमेव दिवाळी अंक आहे. नगरच्या साहित्य संमेलनाचे लहान मोठ्या सर्व तपशिलासह शेवते संपादित ''संवाद'' या देखण्या ग्रंथाच्या रूपाने ''डॉक्युमेंटेशन'' झाले आहे. असाध्य वाटणारे हे काम शेवते यांनी अतिशय परिश्रमपूर्वक पार पाडले. साहित्य संमेलनाच्या इतिहासातील अशा प्रकारचा हा पहिलाच व यशस्वी उपक्रम आहे. विद्यार्थ्यांच्या वाढत्या प्रमाणावरील आत्महत्या हा सध्याचा ऐरणीवरील प्रश्न आहे. या समस्येच्या अगदी प्रारंभीच्या काळात सहा वर्षांपूर्वी पालक आणि विद्यार्थी यांना सकारात्मक संदेश देणारे 'नापास मुलांची गोष्ट' हे पुस्तक घेऊन शेवते आले. त्याच्या आजवर अठरा आवृत्त्या निघाल्या. सध्याच्या काळातील मराठीतील ते एक ''बेस्ट सेलर'' आहे.

शेवते यांचे 'पंतप्रधानांना पत्र' हे कवितेचे पुस्तक २००८ साली आले आणि आता २०१० मध्ये त्यांची 'आईच्या कविता' (प्रस्तावना- विजया राजाध्यक्ष) आणि 'कवितेच्या कविता' (प्रस्तावना- सदानंद मोरे) अशी २ पुस्तके प्रकाशनाच्या वाटेवर आहेत.

अंगी असलेल्या नैसर्गिक ऊर्जेच्या जोरावर शेवते साहित्यविषयक अनेक कामे करीत असले तरी त्यांनी स्वतःकडे, सर्वांत आधी व सर्वांत नंतर- कवी म्हणूनच पाहिले आहे; हेच त्यांच्या एका पाठोपाठ एक येत असणाऱ्या कवितासंग्रहांवरून जाणवते.

❖❖❖

टी. एन. परदेशी

एम्.एस्.ई.बी. कॉलनी, वुरूंडगाव रस्ता, अहमदनगर ४१४ ००१.

अनुक्रमणिका

कै. बा. सी. मर्ढेकरांच्या कवितेचा आध्यात्मिक समारोप – 'किती पायी लागू तुझ्या !'

प्रा. कृष्णा चौधरी

[चिंतन, मनन आणि निदिध्यास ह्या मानवी शब्द-प्रयत्नांच्या पलिकडे असलेला कवितेचा आत्मा', 'दोलवित्या धन्याच्या' स्वर-स्पर्शाशिवाय बाराखडीत बांधला जात नाही. मात्र 'त्या' स्पर्शाने शब्दातही अब्द येते.
– संपादक]

मर्ढेकरांच्या आणखी काही 'कविता' या संग्रहातील ही समारोपीय कविता. 'काही कविते'तील सामाजिक जाणिवेने सामान्य माणसाच्या भावनांना वाचा फोडली. या भेदक सामाजिक वास्तवाजवळच मर्ढेकरांना हॉपकिन्सप्रमाणे भयकंपित आध्यात्मिक जाणीव भेटली. इलिएट् व हॉप्किन्स दोघेही कॅथालिक चर्चमधील ख्रिस्ती धर्माचे प्रसारक होते. त्यांनी स्थूल धार्मिक जाणिवेपेक्षा सूक्ष्म आध्यात्मिक जाणिवेला स्पर्श केला. देवाला जहाजोग म्हणणारे मर्ढेकर आता आध्यात्मिक जाणिवेने भयकंपित झाले. आपल्या जीवनतारांचा 'स्वीच' देवाच्या हाती आहे; अशी त्यांना खात्री पटत गेली. आरंभी आरंभी नास्तिक असणारे तुकाराम देव पहायला गेले व देवरूपच होऊन गेले. मर्ढेकरांना जीव, जगत, समाज, दारिद्र्य, दु:ख, वेदना, विसंगती, अर्थशून्यता व विश्वसौंदर्य याविषयीचे प्रश्न पडून त्यांचे अंत:करण निरंतर तळमळत होते, ते शांत झाले. आपल्या सौंदर्यविचारात त्यांची भूमिका जडवादी राहिली; पण 'आणखी काही कविता'त ती आध्यात्मिक जाणिवेने शांत झाली. लोक ईश्वरावरील श्रद्धेच्या अभावी दु:खी आहेत असे इलियट 'कोरस फ्राम द रॉक' मध्ये म्हणतो.

Men have left God
not for other God
They, Say, but for no God
and this has never happened before.

मर्ढेकरांना कुणी आधुनिक शंकराचार्य म्हटले. उपनिषदातील ज्ञानकांडाच्या निरूक्ताचे संदर्भ त्यांच्या कवितेत येतात. इलियट प्रमाणे प्राचीन पुराणकथांची उलथापालथ समकालीन वास्तवात झालेली दिसते. संतमंडळातील ज्ञानेश्वर, तुकाराम व रामदास इ. संतांवर त्यांची विलक्षण श्रद्धा होती, हे अनेक ओळीतून सूचित होते.

कुठें ज्ञानेश्वर श्रेष्ठ । कुठें तुकाराम पवित्र,
कुठें समर्थ धीरोदात्त । संत सर्व ॥
संत शब्दांचे नायक । संत अर्थाचे धुरंधर;
एका शब्दांचा किंकर । डफ्फर मी ॥

आणखी काही कवितांच्या प्रास्ताविकात आरंभीच हे प्रयोजन स्पष्ट झालेले आहे. ईश्वरी कृपेनेच आपण काव्य लिहीत असून या कवितेला ईश्वरी कृपेचा स्पर्श झाला तरच तिचे सार्थक होईल. एरव्ही ती पांढऱ्यावर काळे करणारी अक्षरेच उरतील.

काळ्यावती जरा पांढरें
या पाप्याच्या हातुन व्हावें
फक्त तेधवां; आणि एरव्हीं
हेंच पांढऱ्यावरतीं काळें !

मर्ढेकरी सौंदर्यविचार व मर्ढेकरी कविता यात मूलत: साम्य आहे. आत्मनिष्ठा, तादात्म्य, कैवल्यपूर्ण मूल्यभावातून या कवितेला महात्मता लाभलेली आहे. कलावंत आपल्या शब्दातील प्रतिमा, संकेत, अलंकार, प्रतीक इ. लयबद्ध रचनासौंदर्यापासून आपली सौंदर्यानुभूती व्यक्त करीत असतो. एक विवक्षित उत्कट व आर्त भावानुभव शब्दात अधिकृत होण्यास आतुर होतो, तेव्हा त्या अनुभवाला लयबद्ध सौंदर्यनिष्ठ संघटनात्मक रूप अन्वयात्मक शब्दातून मिळते. मर्ढेकर आपली भावानुभूती प्रसरणशील अर्थग्रंथांतून व्यक्त करतात. वृत्ती स्थिर झालेली. मन शांत झालेले आपले सर्व जीवनपुष्पच 'कृष्णार्पण' समर्पणवृत्तीने समर्पण केलेले ही मनाची सच्ची ओढ 'किती' या शब्दाच्या उपयोजितेतून मर्ढेकरांनी केलेली आहे.

किती पायी लागूं तुझ्या
किती आठवूं गा तूं तें;

किती शब्द बनवूं गा
अव्द अव्द मनी येते.

एक भरीव, शब्दातुर झालेले आशयघन मन या अष्टाक्षरी अक्षरछंदात व्यक्त झालेले दिसते. 'किती' या शब्दातून पायी लागणे म्हणजे शरणागती व समर्पणशीलता हा भाव व्यक्त होतो. 'आठवू' या क्रियापदातून स्मरण, चिंतन, निदिध्यासातून आठव होत असतो, याचे साहचर्यसंगतीने स्मरण होते. 'किती शब्द बनवू गा' या ओळीतून तर आपली सर्व कवितानिर्मितीच ईश्वरी कृपाप्रसादासाठी निर्माण झाली, यातील ठोस व भरीव भावप्रत्यय व्यक्त होतो. 'अव्द' या शब्दाच्या द्विरूक्तीतून शब्दांची प्रसरणशीलता व अन्वयात्मकता पहावी. अव्द म्हणजे मेघ. शब्दातून तो आकाराने लहान असला तरी, शब्दात मेघाप्रमाणे पाणी साठवून ठेवण्याचे अमाप सामर्थ्य आहे, हा व्यंग्यार्थ- व्यक्त होतो. मर्ढेकरांना अनुभवाच्या प्रसरणशीलतेची जशी जाणीव होती, तशी अर्थग्रंथीतून उदयाला येणाऱ्या सौंदर्याकृतीचीही जाणीव होती. त्यांच्या भावानुभूतीच्या केंद्राचा परीघ असा अर्थग्रंथीतून विस्तारत जातो. शब्दांच्या या कोवळिकतेची व व्यापक अर्थसंपृक्ततेची जाणीव ज्ञानदेवांना होती. शब्दांच्या कलात्मतेची ही जाणीव ज्ञानदेव व्यक्त करतात.

'विंव जरि बचके एवढे ।
प्रकाशा त्रैलोक्य थोकडे ।
शव्दांची व्याप्ती तेणे पाडे ।
अनुभवावी ॥'

समभाव संबंधातून वरील कडव्यात एक समर्पणशील एकार्थ भाव भावानुभूतीतील घटकांच्या परस्परपूरक संवधातून संवाद लयातून व्यक्त होतो. तर खालील कडव्यात विरूद्धभाव संवधातून विरोधी लय व्यक्त होते.

काय गा म्या पामरे
खरडावी बाराखडीं;
आणि बोलावीं उत्तरे
टिनपट वा चोमडी.

ज्ञानेश्वर श्रेष्ठ, तुकाराम व समर्थादि संत धीरोदात्त. संत शब्दांचे नायक व अर्थाचे धुरंधर, त्यामानाने आपण मात्र एका शब्दांचा डफ्फर किंकर- दास व गुलाम. आपण संतांच्या तुलनेत पामर. आपले काव्य म्हणजे बाराखडी. ओनामा गिरवण्यासारखी. फक्त अक्षरांची तोंडओळख, आरंभ. बाराखडीतून अक्षरांची ओळख व्हायला लागते. पुढे वाचन, अध्ययन, मनन, चिंतन व निदिध्यासातून- काव्यातून विशाल संपृक्त अर्थ व्यक्त करण्याचे सामर्थ्य एखाद्या महाकवीला, व्यास, वाल्मिकी, कालीदास, भवभूती होमर, शेक्सपिअरला प्रतिभाशक्तीने प्राप्त होते. या रांगेत आपले स्थान शेवटचे. आपले कवितेतील प्रश्न व उत्तरेही 'टिनपट' व 'चोमडी'. मर्ढेकरांनी संतकवितेशी विनयाने ही तुलना केलेली असली तरी एखाद्या महाकवीसदृश प्रतिभा त्यांच्या ठिकाणी होती. जीवनातील मर्मभेदक प्रश्न त्यांच्या कवितेने निर्माण केले. विज्ञानामुळे आलेली सुबत्ता; पण अणुबाँबच्या शोधामुळे झालेला मानवी विध्वंस ! मर्त्य व अमर्त्य सृष्टीचा पाया, जन्म व मृत्यूचाया टोकात चालू असलेली माणसाची अगतिक व अर्थशून्य, विसंगतीयुक्त धडपड ! या प्रश्नांचे दर्शन म्हणजे हे भारतीय दर्शनातील सातवे दर्शनच आहे. मर्ढेकरांची कविता मर्ढेकर 'बाराखडी' म्हणत असले व 'टिनपट', 'चोमडी' ही विशेषणे आपल्या नाठाळ गाथेला त्यांनी लावली असली तरी ती विनयाने ! आपले मराठी कवितेतील स्थान दान्ते व शेक्सपियरच्या इंग्रजी कवितेतील स्थानासारखे अनन्यसाधारण आहे, असा प्रवळ आत्मविश्वासही त्यांना होता. कधीकधी मर्ढेकरांची व्यंग्यार्थसूचक अल्पाक्षर रमणीय भाषा सरळ, साधी, रोकडी, वाच्यार्थप्रधान होऊन ती रामदासी वळणाची रोकडी व परखड, उघडी-नागडी होते. समर्थांनी समकालीन सामाजिक व रूढ धार्मिक परंपरेतील विसंगती दाखवली. तशीच समकालीन वास्तवातली विसंगती मर्ढेकर आपल्या रोकड्या पण अर्थवाहक अर्थग्रंथीतून व्यक्त करतात. भावानुभवातील लयबद्ध संघटनतत्त्वातून एक परिपूर्ण सौंदर्याकृती निर्माण होते. प्रतिमेतून आशय स्पष्ट व साक्षात् इंद्रियगोचर होतो. अशी ही कविता शब्दावर थोडी हुकमत असणारी व केवळ लयतोंडवळणी पडणारी वाटत नाही. ती थेट प्रसरणशील अर्थग्रंथीतून सौंदर्यसंबोधाने आपला एकात्म, समग्राकृती अलौकिक प्रत्यय देते.

कधीं लागेल गा नख
तुझें माझिया गळ्याला,
आणि सामर्थ्याचा स्वर
माझिया गा व्यंजनाला !

मर्ढेकरांच्या काव्यशैलीवर इलियट व हॉप्किन्सनच्या काव्यशैलीचा खोल परिणाम आहे. त्यांची भावनानिष्ठ समतानतेची संकल्पना काही प्रमाणात इलियटच्या ऑब्जेक्टिव्ह कोरिलेटिव्हच्या, सिद्धांताशी जुळणारी आहे. त्यांच्या कवितेची एकीकडे संतकाव्याशी जवळीक आहे तर दुसरीकडे पाश्चात्य बायबलच्या संस्कृतीचा प्रभाव आहे. 'ओरिजिनल सिन'ची पापाची मूळ संकल्पना बायबलमधील वाटते.

पाप परमेश्वराची साल ! तीच माझें वल्कल, तीच शाल !
तुझ्या इच्छेचाचि जाणावा परवल । पावलांनी ॥
उरीं बाळगलें मीपण । व्हावें तेंचि आता इंधन
जें जळतां जळतांचि दिपुन । सावलीनें ॥

मर्ढेकरांच्या या कवितेचे केंद्र हॉपकिन्सच्या भयकंपित आध्यात्मिकतेशी आहे. कलाकृतीत दोन पदें असतात. एक अध्याहृत व एक स्पष्ट. केंद्र व परीघाचे मर्ढेकरांनी इंग्लडच्या रोमन कॅथड्रल चर्चमध्ये मायकोल एंजोलेचे चित्र पाहिलेले होते. ते त्यांच्या मनात खोल दडून बसलेले होते. साहचर्य भावाने- संज्ञा प्रवाहाने ते जागृत होऊन हा भावानुभव लयबद्ध संघटनतत्त्वातून साकार झाला. चित्रातील जिहोवा एका मृत स्त्रीला- तिच्या गळ्याला स्पर्श करून जिवंत करतो. आपलाही उद्धार परमेश्वराने आपल्या गळ्याला नख लावून करावा. ईश्वरी कृपेचा साक्षात्कार झाला तरच आपल्या कवितेत सामर्थ्याचा स्वर निर्माण होईल असे त्यांना वाटत होते. स्वर आणि व्यंजन मिळून शब्द पूर्ण होतो. स्वराशिवाय व्यंजन अपूर्ण व व्यंजनाशिवाय स्वर. ईश्वरीकृपेच्या साक्षात्कारानेच आपल्या कवितेला अर्थघनता व संपृक्तता येईल, अशी आर्त जाणीव या उपसंहारात व्यक्त झालेली आहे. तुकोबांनीही म्हटले आहे.

काय म्या पामरे । बोलावी उत्तरें ।
परि त्या विश्वंभरे । बोलविले ।
साळुंखी मंजुळ । बोलतसे वाणी ।
बोलविता धनी । वेगळाचि ।

मर्ढेकरांच्या कवितेत पौर्वात्य व पाश्चात्य असे दोन्ही प्रवाह एकरूप झालेले आहेत. पूर्वेकडील प्रवाहापेक्षाही आधुनिक संवेदनशीलता व्यक्त करण्यात तिचे नाते पाश्चात्य प्रवाहाशी अधिक जवळचे वाटते.

मर्ढेकरांच्या या कवितेतील अनुभव आत्मनिष्ठा, तादात्म्य व कैवल्यपूर्ण मूल्यभावातून निर्माण झालेला आहे. प्रसरणशील अन्वयात्मक शब्दांचा व क्रियापदे व विशेषणांचा वापर करून आपला आशय ही कविता अर्थग्रंथीतून वेगवेगळ्या सौंदर्याकृती निर्माण करते. इतर ललितकलेतील सौंदर्यसंवोध इंद्रियसंवेदनांच्या प्रत्ययापुरता मर्यादित असू शकतो. साहित्यकलेतील प्रत्यय मात्र शब्दविंवातीत प्रतिमाप्रत्यय असून तो मानसगोचर असतो. एका इंद्रियसंवेदनेतून अनेक विचार स्फुरविण्याचे सामर्थ्य साहित्यकलेत असते. ज्ञानात्मक व भावात्मक वर्ण्यविषयाशी तादात्म्य झाल्यामुळे हा अनुभव लयबद्ध, संघटनतत्त्वातून सौंदर्यसंवोधाच्या रूपाने प्रगट होतो. 'पॅटर्न' म्हणजे आकृतीबंधात विचार; भावना व संवेदनांच्या संघटनेतून शेवटी एकार्थच प्रकट होत असतो. पण हा एकार्थ भावानुभवातील घटकांच्या लयबद्ध परस्पर संबंधातून, तर कधी परस्पर-विरोधी संबंधातून तर कधी समतोल संबंधाच्या पातळीवर व्यक्त होतो. प्रत्येक कलाकृती हा एक रचनातत्त्वांचा संघटनतत्त्वांचा चैतन्यशाली व्यूह असतो. लयतत्त्वातून हा सौंदर्यसंबोध व्यक्त होत असल्यामुळे त्याचे स्वरूप वस्तुनिष्ठ स्वरूपाचे असते. भारतीय साहित्यशास्त्रात ज्याला साधारणीकरण म्हणतात, मर्ढेकर आपल्या सौंदर्यशास्त्रात लयसिद्धांताची परिभाषा वापरतात. भारतीय साहित्यशास्त्रातील प्रत्यय रसिकाला त्याच्याच संविदीचा येत असल्यामुळे रसिकनिष्ठ, तर मर्ढेकरांचा सौंदर्यप्रत्यय कलाकृतीच्या माध्यमातून येत असल्यामुळे वस्तुनिष्ठ, एकात्म, समग्राकृती व झटितिप्रत्यय आहे.

❖❖❖

प्रा. कृष्णा चौधरी
शिवाजीनगर, वरूड,
जि. अमरावती - ४४४ ९०६.

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका

अस्वस्थ चित्रांची संवेद्य लिपी : ‘चित्रलिपी’

रेणुकादास उबाळे

[काव्य–भावानुभवाचे मनोगत चित्र कवितेच्या भाषेतून व्यक्त होते. तोच काव्य–भाव शब्दमय चित्रातून लिपीबद्ध होताना कवितेची भाषा हीच कविता होते. – संपादक]

वसंत आबाजी डहाके यांच्या ‘चित्रलिपी’ या काव्यसंग्रहाला नुकताच साहित्य अकादमीचा पुरस्कार प्राप्त झाला. यानिमित्ताने कवी डहाकेंच्या ‘चित्रलिपी’ कडे लक्ष वेधले आहे. माझ्या मते साहित्य अकादमीने या योग्य व प्रगल्भ कलाकृतीची निवड केल्यामुळे गंभीर वाङ्मयीन जाण असलेल्या लोकांमध्ये साहित्य अकादमीविषयीचाच आदर दुणावला आहे.

१

बऱ्याचदा वाचक वाङ्मयप्रकारावद्दल किमान वैशिष्ट्यांची अपेक्षा ठेवून चालत असतो. मात्र डहाक्यांसारखा कवी, वाचकांच्या या किमान अपेक्षांनाही छेद देतो. पूर्वापार चालत आलेल्या काव्यलक्षणांना हा कवी एका झटक्यात धुडकावून लावतो आणि आपली स्वयंभू गद्यात्मक, कथनात्मक, अंतर्विरोधात्मक, चित्रात्मक, दृश्यात्मक अशा अनेक गुणधर्मांना एकटवणारी अभिनव शैली घेऊन काळाच्या पटलावर आपली नाममुद्रा कोरतो.

वाङ्मयप्रकाराच्या अवघड व्याख्यांचा बडगा दाखवून एखाद्या रचनेला रोखता येत नाही. ‘‘प्रत्येक वाङ्मयप्रकाराची काही ठराविक लक्षणे साहित्यशास्त्र मानते; परंतु ही लक्षणे नित्य मानणे; आणि त्या निकषांवर कोणत्याही वाङ्मयकृतीची समीक्षा करू पाहणे गैर असते.’’[१] तरीसुद्धा अनुभवातील संपृक्तता आणि विशिष्ट भाषिक लयीमुळे डहाक्यांच्या या रचना; कविताच ठरतात. हे महत्त्वाचे आहे. एकाच वेळी आत्मनिष्ठ, सामाजिक व राजकीय भूमिका घेणारी डहाक्यांची कविता आशय आणि अभिव्यक्तीच्या दृष्टीने नेहमीच निराळी ठरली आहे. मात्र ‘चित्रलिपी’ या संग्रहात त्यांची सामाजिक व राजकीय जाणीव अधिक प्रगल्भ असल्याचे जाणवते. आसपासच्या अस्वस्थ वर्तमानामुळे कवीमन अधिक उद्विग्न झाल्याचे दिसते. ‘चित्रलिपी’ हा उण्यापुऱ्या १०० कवितांचा संग्रह १०९ पानांमध्ये आटोपला असला तरी या कवितांसोबतचा प्रवास मर्मज्ञ वाचक विसरू शकत नाही. एवढेच नव्हे; तर यांतील काही कवितांचे व्रण, संवेदशील वाचक आपल्या काळजावर वागवत; आजच्या भीषण प्रश्नांच्या जाणिवेमुळे अस्वस्थ होतो.

२

कवितेची भाषा ही ‘भाषांतर्गत भाषा’ असते. प्रत्येक कवीला आपली भाषा स्वतःच घडवावी लागते. इतर वाङ्मयप्रकारांमध्ये भाषा साधन बनते. मात्र कवितेत साधन आणि साध्यदेखील भाषाच असते याची प्रचीती या कवितांमधून येते. मुख्यतः गद्यशैलीत या कविता असल्या तरी यामागील भाषेची सखोल जाण पदोपदी जाणवते. भाषिक रचनेच्या चर्चेनिमित्ताने डहाके यांच्या ‘क्रियापदे’ या कवितेची साक्ष काढणे येथे महत्त्वाचे वाटते. या कवितेमध्ये कवीने मानवी नाते तुटण्याच्या निरनिराळ्या प्रक्रियांतील क्रियापदे सुरूवातीला ओळीने मांडली आहेत. ‘निराळे होणे’ ‘वेगळे करणे’, ‘नाते तोडणे’, ‘फारकत घेणे’ इ. पुढे या क्रियांच्या परिणामांना नेमक्या सर्जक व संवेद्य भाषेत क्रमवार वाक्यांतून व्यक्त केले आहे. जसे, ‘वेगळे होताना गळे आवळल्यासारखे होते.’ कंठ दाटून येणे, शब्द न फुटणे या शारीरक्रियांचे हे निदर्शक आहे. किंवा ‘नाते तोडताना छातीतले जाते घरघरते’ येथे ‘जाते घरघरणे’ हा शब्दप्रयोग अधिक सार्थ ठरला आहे. जाते हे स्त्रीवेदनेचे सांस्कृतिक प्रतीक जसे भासते तसेच ते विनाशाचे प्रतीकही ठरते. ‘भरडले जाणे’ ही क्रिया यात महत्त्वाची आहे. जात्याच्या माध्यमातून सर्वसामान्यांच्या दुःखाची सार्वत्रिक युगजाणीव व्यक्त करणे, हा ‘सूक्ष्माकडून स्थूलाकडे’ जाण्याचा प्रवास आहे. कवितेच्या शेवटी-

> *‘‘फारकती घेताना सगळी क्रियापदे*
> *क्रियाशून्य पदांमध्ये जड होतात.*
> *सगळ्या वाक्यरचनांची धूळधाण उडते’’*

(चित्रलिपी. पृ. ७७)

असे सांगून डहाके शब्दांपलीकडच्या, भाषेपलीकडच्या आशयाला जाऊन भिडतात. 'व्यक्त करता येत नाही' ही या दुःखाची सल आहे. मानवी नाते दुरावण्याची युगजाणीव ही कविता समर्थपणे प्रकट करते.

'विळी' या कवितेतून भांडवशाली युगामध्ये पिळल्या जाणाऱ्या, शोषल्या जाणाऱ्या लोकांची व्यथा रोज कापल्या जाणाऱ्या भाज्यांच्या रूपाने कवीने सूचकपणे व्यक्त केली आहे. विळीचे पाते फक्त वर जरी झाले तरी प्रत्येक भाजीमध्ये भयग्रस्त बदल कसे होत असतील याचे नेमके व कलात्मक वर्णन केले आहे. जसे 'काकडी पिळवटली', 'वांगे काळीनिळी झाली', यामध्ये 'टमाटे भेदरले' हे वाक्य अत्यंत वेधक ठरते. टमाट्याला वऱ्हाडी बोलीत 'भेदरं' असेही म्हणतात. शिवाय 'भेदरणे' ही मनाचा थरकाप उडण्याचीही क्रिया आहे. दुहेरी अर्थाच्या शब्दरचनेमुळे हे वाक्य वेधक ठहरणारे जसे आहे तसेच कवीचा विशिष्ट सांस्कृतिक परिवेशही स्पष्ट करणारे आहे.

३

'तिसरा' ही कविताही खास शैलीमुळे लक्षणीय ठरते. सावलीच्या माध्यमातून एकविसाव्या शतकातील मानवी एकाकीपणाचा नेमका वेध या कवितेतून घेतला आहे. येथे नाते तुटण्याच्या प्रक्रियेमुळे सर्वसामान्य व्यक्ती हताश झाली आहे. त्याला सोबत आहे ती फक्त आपल्या सावलीची ! सुरुवातीला कवीने कलात्मक ढंगाने सावली आणि प्रत्यक्ष व्यक्ती यांच्यातील द्वैताचा भास घडविला आहे. वर्णनातदेखील त्यांच्या एकसारख्या क्रियांचा अलगदपणाने उल्लेख केला आहे. जसे-

''पहिला छताकडे पाहतोय
दुसरा छताकडे पाहतोय.
पहिला म्हणतो, चला.
दुसरा म्हणतो, चला.'' (चित्रलिपी, पृ. १०५)

येथे पहिला आणि दुसरा कल्पिण्यामध्ये व्यक्तीच्या एकाकीपणात सोबतीचा भ्रामक समज स्पष्ट होतो. मात्र, सावलीचा आधार कधीही होऊ शकत नाही. सावलीत केवळ तात्काळ अनुकरण असते. हे कवीला कळालेले आहे. कवितेच्या शेवटी कवी म्हणतो,

''दोघेही टेबलावर कोपर टेकून
समोरासमोर बसून
वाट पाहताहेत :
तिसऱ्याची.'' (चित्रलिपी १०६)

खरोखरच एकाकी व्यक्तीला समुहाची गरज असते. अंतर्गत सामाजिक जिव्हाळ्याची तो वाट पाहतो. परंतु सध्याच्या युगात जिव्हाळा केव्हाच आटून गेलाय. हा साधा पण व्यापक आशय कवीने प्रतिबिंबाच्या माध्यमातून सूचित केला आहे.

४

अतिवास्तववादी घडणीतील 'बाहुलं' ही कविता अशीच अत्यंत वेधक आहे. या कवितेतून वास्तवातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येकडे निर्देश होतो आहे; असे मला वाटते. कवितेची शैली कथनात्म असल्याने अर्थाचे अनेक पदर हळूहळू स्पष्ट होत जातात. कवी खोलीत प्रवेश करतो. खोलीमध्ये कोपऱ्यात लटकलेलं (फासावर?) चिंध्याचं कुरूप बाहुलं आहे. कवी परत जाण्याचा प्रयत्न करतो, मात्र दारं आणि खिडक्या चमत्कारिक रीतीने आपोआप बंद होतात. कवी बाहुल्यावर प्रहार करतो, प्रतिकार करतो. परंतु त्याचा काही परिणाम होत नाही. 'परतीचे सर्व मार्ग बंद होणे' आणि 'संघर्षाची परिणामशून्यता अनुभवणे' या दोन बाबी मात्र वास्तवाशी आपले घट्ट नाते सुचविणाऱ्या आहेत. या सर्व प्रयत्नात कवी बाहुल्याच्या जागी आणि पर्यायाने फासाच्या अत्यंत जवळ केव्हा येतो, हे त्यालाही कळत नाही. मात्र गळफास येथे अटळ आहे; हे त्याला कळालेले असते. सुरुवातीला खलनायकासारखे भासणारे 'बाहुले' कवितेमध्ये जेव्हा कण्हू लागते; तेव्हा ते आपले मानवी स्वरूप व वेदना व्यक्त करते आणि वाचकाची सहानुभूती मिळविण्यासही पात्र ठरते. परंतु येथे व्यथित कोण ? असा प्रश्न पडतो. (आणि पडत नाहीसुद्धा.) कवी की बाहुलं ? वर्तमानातील वेदनेचे स्वरूपही असेच प्रश्नार्थक, संदिग्ध व सार्वत्रिक आहे. 'न्याय' या कवितेमध्ये डहाक्यांनी सर्वसामान्यांच्या देवांच्या संकल्पनेनिमित्त मौलिक भाष्य केले आहे. आपली कर्तव्यशून्यता, असमर्थता लपविण्यासाठी समाज देवाचा आधार घेतो. ही कविता केवळ देवाच्या अस्तित्वावरच भाष्य करीत नाही; तर याआड असलेल्या मानवी वृत्ती व स्वभावाचा वेध घेते.

आता 'चित्रलिपी'मधील 'चक्कीवाला' ही कविता पहा. ('योगभ्रष्ट'मधील 'सुरेशचा बाप' या कवितेशी ही कविता नाते सांगते.)

अनुक्रमणिका

अनेक पायांचा किडा सरकत जावा
ओल्या, उखणलेल्या जमिनीवरून
तसा सूर्य मावळतीला येतो.
या खिन्नउदास गावाच्या आभाळात,
तेव्हा घराघरातली नशिबाची दळणं
पोरांच्या डोक्यांवरून
येतात चक्कीवाल्याकडे;
केविलवाणी ज्वारी,
हिरमुसलेले गहू,
फिकट पडलेली बाजरी.

चक्कीवाला बसलेला असतो
उंच स्टुलावर
डोक्याला पांढरं कफन बांधून,
पिठानं पांढरा झालेला
त्यांचा म्हातारा चेहरा
एखाद्या दुर्बोध देवासारखा.

तो ओततो त्यांच्या आयुष्याचं धान्य
आणि त्याचं पीठ होऊन जातं;
चक्की पिसत असते
ज्वारी गहू बाजरी
आणि माणसांचं कष्ट करणं.

चक्की देते
चिखलाच्या रस्त्यावरच्या
चिखलाच्या भिंती असलेल्या घरातल्या
चिखलाच्या माणसांचा त्या त्या वेळचा शिधा.
चक्कीवाला पाहातो
चक्कीत दळल्या जाणाऱ्या दाण्यांसारख्या
समोरच्या मुलांकडे.
चक्कीवाला हसतो क्षीण हसू
पिठानं माखलेल्या चेहऱ्यातले डोळे
थोडे चमकतात.
निरक्षर अंधारातून
चाचपडत जाणाऱ्या मुलांच्या, मुलींच्या विचारानं
रेघ ओढली जाते पिठावर
चक्कीवाल्याच्या अस्पष्ट चेहऱ्यावरच्या.

चक्कीवाला दळण दळतो. पिसले जाणारे पिसले जातात या लहानशा दैनंदिन घटनेतून व्यापक मानवी जाणिवेकडे जाण्याचा हा अप्रतिम प्रयत्न होय. सूक्ष्माकडून स्थुलाकडे जाण्याचाच प्रकार पुन्हा एकदा प्रचीतीस येतो. समग्र मानवी दुःखाचे या कवितेत सामान्यीकरण झाले आहे. तसे पाहता ही कविता मानवी 'क्षुधा' या मूलभूत गरजेशी आणि सामाजिक शोषणाशी निगडित आहे. चक्कीची प्रक्रिया येथे सार्वत्रिक अर्थाने व्यक्त झाली आहे. कविता वाचताना साध्या घटनेतून मन हेलावून जाते. पिसलं कोण जातंय ? धान्य की माणूस ? ''कवितेमध्ये एकेक शब्दोच्चार एकमेकांशी निगडित होताना एक भावमंथर लय छेडीत जातो व त्या लयीत विरघळलेले शब्द हाच एक भावगर्भ अनुभव होतो.''[१] या ठिकाणी धान्य व माणूस यांमधील द्वैत नाहीसे होते.

चक्कीवाला म्हणजे तरी नेमकं कोण ? असाही प्रश्न वाचकमनाला पडतो. चक्कीवाला म्हणजे दुर्बोध, अनाकलनीय देव ? (कारण तो सर्वसामान्यांपेक्षा उंच स्टुलावर बसलेला आहे हे येथे आवर्जून लक्षात घ्यावे लागते.) परंतु थोड्या वेळाने हा प्रश्नही गौण वाटतो. बुद्धिगम्य पद्धतीने आकलन होणार नाही हे देखील कळून चुकते. नंतर महत्त्वाची वाटते ती केवळ चक्कीवाल्याची ओली संवेदनशीलता. निरक्षर अंधारात चाचपडणारी मुले पाहून चक्कीवाल्याचे काळीज चिंतेने पोखरते. त्यांच्याविषयीची काळजी वाढतच जाते. आणि चक्कीवाल्याच्या पिठानं माखलेल्या चेहऱ्यावर त्या उद्विग्न विचाराने रेघ ओढली जाते. आता ही रेघ म्हणजे काय ? रेघ = कपाळावरील आठी. असे दोन पर्याय शिल्लक उरतात. काहीही असले तरी ही चिंता संवेदनशील व्यक्तीचा थरकाप उडविणारी आहे. सुक्ष्माकडून स्थूलाकडे प्रवास करणाऱ्या या अद्वितीय शैलीतून कवी व्यापक मानवी संवेदना व्यक्त करण्यास समर्थ ठरतो हे मात्र निश्चित.

एकंदर, डहाके यांच्या कविता, या कविता म्हणून सर्वमान्य पावलेल्या तत्त्वांना चक्रावून टाकणाऱ्या आहेत. परंतु 'कविता जगण्याची' कवीची निष्ठा वाखाणण्याजोगी आहे. ''प्रत्यक्षात कविता न होवो, परंतु दिवसाकाठी रोजच्या जगण्याचे उध्वंपतन होऊन त्याची निदान एक ओळ व्हावी. असे स्वप्न तरी काही लिहू म्हणणाऱ्याला बाळगता आली पाहिजे.''[२] रा. भालचंद्र

(पान क्र. ५५ वर पहा...

गीत रामायणातील नादलयीचा गोफ

डॉ. शकुंतला क्षीरसागर

[गीतरामायणाचे भावसौंदर्य रामकथेत दडलेले आहे; की रामकथेला अभिव्यक्त करणाऱ्या शब्दांच्या सुरावटीत आहे ? ह्या प्रश्नाचे उत्तर शब्दप्रधान गायकीत आहे. शब्दप्रधान गायकीत कवीचे शब्द आणि त्यातील अशरीरी भावसौंदर्य व्यक्त करणाऱ्या स्वरनाट्याच्या शुक्ति-बिंदू योगातच आहे. त्या नादलयाचा हा वेध. - संपादक]

श्रेष्ठ गीतकार ग. दि. माडगूळकर यांनी गीत रामायणात नादलयीचा गोफ अशा काही कौशल्याने गुंफला आहे, की त्याचे श्रवणीय झंकार रसिक श्रोत्यांच्या मनात गुंजत राहिले आहेत. गीत रामायणाचे वाचन गद्य उताऱ्याप्रमाणे केले तरीही हा अनुभव येतो.

नादलयीची अनुभूती 'आवृत्ती' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या युक्तीच्या वापराने येते. गदिमा यांनी गीत रामायणात आवृत्तीचे उपयोजन अनेक प्रकारे केलेले आहे. ही आवृत्ती स्वरांची आहे, वर्णांची आहे, अक्षरांची आहे, शब्दांची आहे आणि ओळींचीही आहे. प्रत्येक गीताचा आशय प्रभावीपणे व्यक्त करण्यास तसेच प्रत्येक गीताला श्रवणीय आणि अर्थरमणीय रूप देण्यास या आवृत्तीचा उपयोग गदिमा यांनी अत्यंत समर्थपणे केला आहे. त्याचेच विवेचन येथे काही निवडक उदाहरणांनी केले आहे.

१) स्वरावृत्ती

किती यत्ने मी पुन्हा पाहिली तूते
लीनते, चारूते, सीते ५०. ध्रु. १-२

गीत रामायणातील पन्नासाव्या गीताच्या ध्रुवपदाच्या या दोन ओळी आहेत.

रावणाच्या वधानंतर रामाच्या आज्ञेवरून हनुमंताने सीतेला रामाचे कुशल सांगितले. ते ऐकताच अत्यानंदाने तिच्या तोंडून शब्दच उमटेना. आपल्याला रामाचे दर्शन व्हावे एवढीच इच्छा तिने व्यक्त केली. सीतेला आपणांपाशी त्वरित आणा अशी आज्ञा रामाने बिभीषणाला केली. त्यावेळी रामाने सीतेला उद्देशून जे शब्द उच्चारले ते शब्द म्हणजे या दोन ओळींनी सुरुवात झालेले हे गीत होय.

या ओळींमधला 'किति' हा पहिला एकच शब्द ऱ्हस्व स्वरान्त आहे. त्यानंतरचे सर्व शब्द दीर्घ स्वरान्त आहेत. या दीर्घ स्वरान्त शब्दांमुळे सीतेला पाहण्यासाठी रामाने केलेल्या प्रयत्नांची, सायासांची अनुभूती येते. दुसऱ्या ओळीतील अंतर्यमकाने लयनिर्मिती झाली आहे.

त्यानंतरच्या चार कडव्यांमध्ये रामाने केलेल्या पराक्रमाचे वर्णन गदिमा यांनी केले आहे. पण त्यातही 'हे तुझ्यामुळे गे झाले, तुजसाठी नाही केले' असे राम म्हणतो. त्यापुढच्या चार कडव्यांमध्ये रावणाकडे राहिलेल्या सीतेबद्दल अविश्वास आणि संशय रामाने व्यक्त केला आहे. तो म्हणतो "रावणाच्या शेजारी बसलेल्या तुझ्यावर मी विश्वास कसा ठेवू ? तुला दाही दिशा मोकळ्या आहेत. तू कुठेही जा. माझी परवानगी मागू नकोस. या गीताचा शेवट 'सखि, सरले ते दोघांमधले नाते' या ओळीने केला आहे. या ओळीतला पहिला शब्द 'सखि' हा असून तो ऱ्हस्व स्वरान्त आहे. त्यापुढचे सर्व शब्द दीर्घ स्वरान्त आहेत. हे दीर्घ स्वरान्त शब्द ऐकत असताना (किंवा वाचत असतानाही) प्रत्येक शब्दाच्या उच्चारानंतर राम मनाने सीतेपासून दूर जात आहे, त्यांच्यामधले अंतर वाढत आहे असा प्रत्यय येतो.

या गीताच्या पहिल्या आणि शेवटच्या ओळींमधील दीर्घ स्वरांच्या आवृत्तीने लयनिर्मिती व भावनिर्मिती करण्याच्या गदिमा यांच्या कौशल्याला दाद द्यायलाच हवी.

२) वर्णावृत्ती

वर्णांची आवृत्ती म्हणजे अनुप्रास होय. अनुप्रासात्मक वर्णांची नोंद करावयाची झाल्यास गीत रामायणाच्या जवळजवळ सर्व ओळी उद्धृत कराव्या लागतील. म्हणून येथे काही वैशिष्ट्यपूर्ण अनुप्रासांची नोंद केली आहे.

शल्य एक ते कौसल्येसी
दिसे सुमित्रा सदा उदासी
कैक कैकयी करि नवसासी
दशरथासी व्यथा एक ती, छळिते अभ्यंतरी ।
२.७.१-४

पोटी संतान नसल्याने राजा दशरथाच्या तिन्ही राण्यांची आणि स्वतः दशरथाचीही मनःस्थिती व्यक्त करणाऱ्या या ओळींतली वर्णावृत्ती लक्षणीय आहे. 'शल्य एक ते कौसल्येसी' या पहिल्या ओळीत 'क' आणि 'स' या वर्णांचा अनुप्रास आहेच. पण त्यावरोबरच 'ल्य' या जोडाक्षराची आवृत्ती 'शल्य' आणि 'कौसल्येसी' या शब्दांमध्ये झाली आहे. दिसे सुमित्रा सदा उदासी' या ओळीत 'द' आणि 'स' या वर्णांची आवृत्ती दिसते. 'कैक कैकयी करि नवसासी' या तिसऱ्या ओळीत 'क' आणि 'स' या वर्णांची आवृत्ती झाली आहे. या ओळीचे एक वैशिष्ट्य म्हणजे 'कैक' आणि 'कैकयी' या दोन निकटच्या शब्दांमधला अनुप्रास हे होय. चौथ्या ओळीत 'र', 'थ', आणि 'त' या वर्णांचा अनुप्रास आहेच. या सर्वांमुळे नाद निर्मिती झाली आहे.

निकटच्या दोन शब्दांमधील वर्णावृत्ती असणाऱ्या अनेक ओळी गीत रामायणात आहेत. येथे काही निवडक ओळी दिल्या आहेत.

१) कर्णभूषणे कुंडल डुलती	१.४.३
२) देव देवेंद्रही, मारि ते मंथरा	९.४.३
३) सांग अशोका शोकनायका	३१.२.१
४) चंद्र विरहिणी, जणू रोहिणी	३८.१.१
५) स्वयंवरासम समय रंगला	५२.२.२

३) अक्षरावृत्ती

कोणत्याही पद्यामध्ये जवळ जवळच्या दोन ओळींच्या शेवटी एक किंवा अधिक अक्षरे सारख्या क्रमाने येतात; तेव्हा त्यांना यमक असे म्हणतात. अनेक अक्षरांचे यमक कवीच्या करामतीचे निदर्शक असले तरी कानाला ते तितकेसे गोड लागत नाही. त्यापेक्षा ओळीचे एक अन्त्याक्षर आणि त्याच्या आधीचा एक उपान्त्य स्वर यांचे यमक कानाला गोड लागते. हे सर्वमान्य आहे. गीत रामायणात अशी यमके अनेक आहेत.

सरयू - तीरावरी
अयोध्या मनुनिर्मित नगरी
त्या नगरीच्या विशालतेवर
उभ्या राहिल्या वास्तु सुंदर
मधुन वाहती मार्ग समांतर
रथ, वाजी, गज पथिक चालती, नटुनी त्यांच्यावरी
२.१.४

या कडव्यात ध्रुवपदाच्या ओळीत 'री' या अन्त्याक्षरापूर्वी 'अ' हा उपान्त्य स्वर, 'वरी' आणि 'नगरी' या दोन शब्दांमध्ये आला आहे. तसेच त्यानंतरच्या तीन ओळीत 'वर', 'सुंदर' आणि 'समांतर' या तीन शब्दांमध्ये 'र' या अन्त्याक्षरापूर्वी 'अ' हा उपान्त्य स्वर आला आहे. चौथ्या ओळीतल्या 'त्यांच्यावरी' या शब्दातील 'वरी' या दोन अक्षरांचे आणि त्या आधीच्या 'आ' या उपान्त्य स्वराचे तीरावरी या ध्रुवपदाच्या ओळींशी यमक साधलेले आहे. या सर्वांमुळे गीताच्या श्रवणीयतेत भर पडली आहे.

काही निवडक गीतांच्या ध्रुवपदाच्या ओळींची आणि कडव्यांची नोंद येथे केली आहे.

१) गीत क्र. २	कडवे क्र. २, ४, ८
२) गीत क्र. ४	कडवे क्र. १, ४
३) गीत क्र. ५	कडवे क्र. १, २, ३, ४
४) गीत क्र. १२	कडवे क्र. २
५) गीत क्र. ५५	कडवे क्र. १, २, ३, ४, ६, ८

४) शब्दावृत्ती

शब्दांच्या आवृत्तीच्या अनेक प्रकारांची पखरण गीत-रामायणात आढळते.

१) एका शब्दाची, ओळींच्या आरंभी, आवृत्ती.

''क्षमा करी तू मज कौसल्ये
क्षमा सुमित्रे पुत्रवत्सले
क्षमा देवते सती उर्मिले
क्षमा प्रजाजन करा, चाललो सुखदुःखांच्या पार''
२२.८.१-४

रामाला वनवासात सोडून अयोध्येत परत आलेल्या सुमंताने दशरथाला रामाचा निरोप सांगितला. तो निरोप ऐकून भ्रमिष्ट झालेल्या दशरथाने हे उद्गार काढले आहेत. 'क्षमा' या शब्दाने सुरू होणाऱ्या या ओळींमधून दशरथाच्या मनाची तगमग, पश्चात्तापदग्ध मनःस्थिती प्रतिबिंबित झाली आहे.

२) एका शब्दाची ओळींच्या शेवटी आवृत्ती

१) मज सांग लक्ष्मणा जाऊ कुठे ?
पतिचरण पुन्हा मी पाहू कुठे ? ५५. ध्रु. १-२

पंचावन्नाव्या गीताच्या ध्रुवपदाच्या या दोन ओळी आहेत. आपले डोहाळे पुरविण्यासाठी लक्ष्मण आपल्याला वनप्रदेशात घेऊन जात आहे असे सीता

समजत होती; पण रामाने राजधर्माचे पालन करण्यासाठी आपला कायमचा त्याग केला आहे, हे लक्ष्मणाकडून समजताच तिच्या दुःखाला पारावार उरला नाही. तिने जे आर्त उद्‌गार काढले आहेत ते उद्‌गार म्हणजे प्रस्तुतचे गीत आहे. ध्रुवपदाच्या या दोन ओळींमध्ये शेवटचा शब्द 'कुठे ?' हा आहे. या शब्दाच्या आवृत्तीने सीतेची निराधार, अगतिक अवस्था गदिमा यांनी प्रभावीपणे व्यक्त केली आहे.

३) अगोदरच्या ओळीतल्या शेवटच्या शब्दाची; त्यानंतरच्या ओळीत पहिला शब्द म्हणून आवृत्ती.

'यज्ञमंडपी सुनाभ कार्मुक
ज्यास पेलता झाला त्र्यंबक
त्र्यंबक देवे त्याच धनूने त्रिपुरासुर मारिला'

१०.२.१.३

दहाव्या गीतात एक आश्रमवासी जनकाच्या मिथिला नगरीचे, तिथल्या यज्ञाचे, शिवधनुष्याचे वर्णन करतो आहे. या कडव्यात दुसऱ्या ओळीतला शेवटचा 'त्र्यंबक' हा शब्द तिसऱ्या ओळीचा पहिला शब्द म्हणून आवृत्त झाला आहे. या गीताच्या पहिल्या, दुसऱ्या, तिसऱ्या, चौथ्या, पाचव्या आणि शेवटच्या आठव्या कडव्यात दुसऱ्या ओळीतला शेवटचा शब्द तिसऱ्या ओळीचा पहिला शब्द म्हणून आवृत्त झाला आहे.

शब्दांच्या आवृत्तीचे आणखी अनेक प्रकार गीत रामायणात आढळतात. विस्तारभयास्तव त्यांचे विवेचन करणे शक्य नसल्याने येथे काही प्रकारांचा केवळ निर्देश करून त्यांची काही उदाहरणे दिली आहेत.

४) दोन शब्दांची आवृत्ती

राम जन्मला ग सखि राम जन्मला ६.१.४

५) एका शब्दानंतर आवृत्ती

जरा गर्विता, जरा लज्जिता १३.१.३

६) दोन शब्दांनंतर आवृत्ती

अधिर चाल ती, अधिर तीहुनी हातींची माला

१२.६.२

७) एका शब्दाची वेगवेगळी रूपे

फुलू लागले फूल हळूहळू गाली लज्जेचे १२.२.३

८) एका ओळीतल्या पहिल्या अर्ध्या भागातील अखेरच्या शब्दाची दुसऱ्या अर्ध्या भागात पहिला शब्द म्हणून आवृत्ती

पिताहि मूर्च्छित, मूर्च्छित माता १८.७.१

५) ओळींची आवृत्ती

१) सर्व कडव्यांच्या आरंभी एका ओळीची आवृत्ती

गीत रामायणातल्या सातव्या गीताचा आरंभ 'सावळा ग रामचंद्र' या ओळीने झाला आहे. हे गीत झोपाळ्यावरची ओवी या पारंपरिक छंदात आहे. रामाच्या बाललीलांचे बोबड्या बोलांचे वर्णन करताना कौसल्येचा आनंद ओसंडून वाहात. 'सावळा ग रामचंद्र' ही ओळ प्रत्येक ओवीची पहिली ओळ म्हणून आवृत्त झाली आहे. त्या गीताचा भाव या आवृत्तीने अधिक प्रत्ययकारक व श्रवणीय झाला आहे.

२) ध्रुवपदाच्या दोन ओळींची आवृत्ती

निषादराज गुह आणि त्याचे नावाडी यांच्या तोंडच्या या गीतात

जय गंगे जय भागिरथी
जय जय राम दाशरथी

या दोन ओळींच्या ध्रुवपदाची आवृत्ती साधलेली आहे. राम, सीता आणि लक्ष्मण यांना गंगानदी पार करण्यासाठी नौकेत बसवून निषादराज गुह आणि त्याचे नावाडी हे गीत गात आहेत. गंगा नदी पार करताना तिला वंदन करून सुखरूप प्रवासाकरिता तिची प्रार्थना करीत आहेत. या समूहगीतातल्या दोन ओळींच्या आवृत्तीने एक प्रकारची गतिशीलता निर्माण झाली आहे, जोश वाढवला आहे.

❖❖❖

डॉ. शकुंतला क्षीरसागर
२९/४१८ लोकमान्यनगर, पोस्ट ऑफीसच्या जवळ, पुणे ४११०३०.

अनुक्रमणिका

(पुस्तक परिचय)

कबीर आणि तुकारामाचे सम्यक्दर्शन

- डॉ. लक्ष्मीनारायण बोल्ली

संतांच्यां जीवनशैलीविषयी, त्यांच्या सात्विक सुगंधाविषक्षी आणि त्यांच्या काव्यातील परमार्थाविषयी लिहिणे ही बाव सामान्य म्हणावी अशी नाही. मुळात त्यांच्याविषयी लेखकाच्या मनात एक आंतरीक सद्‌भाव जागृत व्हायला हवा अन्यथा 'संतांच्या साहित्याला' स्पर्श होणे शक्य नाही. संतसमागम व्हावा अशी ही गोष्ट आहे याचे समाधान डॉ. संजय लांडगे यांचे पुस्तक वाचल्यानंतर निश्चित मिळते.

प्रा. डॉ. संजय लांडगे यांनी संतकवी कबीर आणि तुकाराम ह्या लोकोत्तर संतांच्या गुणवैशिष्ट्यांचा धांडोळा, एक तौलनिक अभ्यास म्हणून घेतला, ही निश्चितच अत्यंत अभिनंदनीय गोष्ट आहे. या उभय संतांचं संतत्व, कवित्व आणि प्रसंगी त्यांचा संतप्तपणाही लेखकाने 'संतकवी कबीर आणि तुकाराम - एक चिंतन' या पुस्तकात अत्यंत चिकित्सकतेने आणि मनोज्ञतेने रेखाटला आहे.

तसा या उभय संतांचा काळ वेगवेगळा, संत कबीर इ.स. १४५५ च्या दरम्यान जन्माला आलेले आणि संत तुकाराम इ.स. १६०८ च्या काळात जन्माला आलेले; म्हणजे या दोहोत सुमारे १५० वर्षांचे अंतर आहे. संत कबीर हे उत्तर भारतात होऊन गेलेले तर संत तुकाराम महाराष्ट्रात ! परंतु उभयतांच्या विचारात कमालीचे साम्य आढळते; हे लेखकाने चांगले स्पष्ट केले आहे.

कबीर व तुकाराम त्या त्या काळातील जातीभेदाविषयीच्या समाजाच्या मूढ कल्पना, अंधश्रद्धेचा अतिरेक, दलित, पीडित, वंचित, शोषित समाजाची होणारी अवहेलना, माणसामाणसातील टोकाची उच्चनीचता, धर्माच्या नावाखाली माणूस माणसांवर तुटून पडणे, देवादिकांच्या संकल्पना त्यातला कर्मठपणा, अमानुषकर्मकांड, याने दोघेही संत, संतप्त झालेले होते. ही संतप्तता उभयतांच्या काव्यवाणीतून ज्वालेच्या ठिणग्यांप्रमाणे बरसत होती. काव्यातील प्रखरता, बंडखोरपणा, आसूड ओढावे अशा धीट रचना, हे सारे उभयतांच्या काव्यातून आविष्कृत झालेले समान गुण होत. काही ठिकाणी तर थेट अनुवाद वाटावा अशा काव्यपंक्ती आढळतात. कबीर व तुकाराम यांच्या काव्य व विचारातील साम्य हे डॉ. संजय लांडगे यांनी सखोल चिंतनातून स्पष्ट केले आहे. आपण हे वाचून थक्क होतो, मनाशी प्रश्न पडतो, हे कसे घडले असेल ? उभयतांच्या काळात अंतर, कार्यक्षेत्रात फरक, काव्यभाषेत फरक, तरीही उभयतात समान विचार कसे ? मोठी माणसं ही भिन्नकाळात, भिन्न प्रांतात जन्मूनही समान विचार करू शकतात. दुसरं एक उदाहरण द्यायचंच झालं तर असं म्हणता येईल- पणत्या अनेक प्रकारच्या असतात. पणती मातीची, धातूची असू शकते, परंतु त्यात तेवणारे प्रकाशतत्त्व मात्र एकच असते, त्याप्रमाणे या उभय संतांच्या विचारात, आचारात आणि काव्यात असे मनोज्ञ साम्य आढळते आहे.

डॉ. संजय लांडगे यांनी हा समान धागा अत्यंत कष्टाने आणि चिकित्सकतेने अभ्यासला आहे. म्हणून या पुस्तकातल्या तौलनिग चिंतनाला विशेष महत्त्व आहे.

अजूक एक गोष्ट या पुस्तकातल्या विचाराच्या या संदर्भात मला सांगावेसे वाटते ते म्हणजे संत कबीर, संत तुकाराम यांची बरहुकूम स्वभाव वैशिष्ट्ये, आपल्या अंतरंगात रिचवून घेतलेले अन्य काही भारतीय संत आहेत. तेलुगूत संत वेमना, तमिळ भाषेतला तिरूवळ्ळूर हे संत देखील याच विचाराला, आचाराला आपल्या काव्यात ठोसपणे भरून, दंड थोपटून तथाकथित समाजाविरूद्ध, बंड करून उठले होते. याची यावेळी तीव्रतेने आठवण होते. कबीर आपल्या एका दोह्यात म्हणतात.

'पत्थर पूजे हरि मिले
तो मैं पूँजू पहाड'

जर दगड (देवाची पूजा) पुजल्याने परमेश्वर भेटत असेल तर मी एखाद्या पहाडाला पूजीन. तात्पर्य, या दगडाच्या मूर्तीत देव नसतो.

तुकाराम सुद्धा हेच नेमके सांगतात.

'तीर्थी धोंडा पाणी
देव रोकडा सज्जनी'

देवाच्या तीर्थक्षेत्रात, एक धोंडा (देवाची मूर्ती) आणि त्यावर उदक (पाणी) असते, बाकी देव हवा असेल तर

अनुक्रमणिका

सज्जन माणसाच्या सान्निध्यात सापडतो. हा विचारधागा प्रा. डॉ. संजय लांडगे यांनी अत्यंत चांगल्या प्रकारे पटवून दिला आहे. त्याचप्रमाणे-

तेलुगु संत वेमना हेच सांगतात-

''राई बोम्मकेला, रंगअईना वलवलु
नगजु नांड्यालु कुंभमुलु''

राईबोम्मा (देवाची दगडी मूर्ती) याला कसले अलंकार आणि नैवेद्य भोजने देता, त्यापेक्षा अर्धवस्त्राने हिंडत असलेल्याला, अन्नाशिवाय तळमळत असलेल्या गोरगरीबांना द्या, त्यांची भूक भागेल नि गरज निवारेल. 'मानवसेवा हीच माधव सेवा' ही गोष्ट लक्षात ठेवा.

भारतात विविध धर्माचे, जातीचे, प्रांतांचे, भाषांचे लोक आहेत; परंतु भारतीय संस्कृती एक आहे. एकीत विविधता आणि वेगळेपणात एकता, हीं आपल्या आंतरभारतीची संकल्पना आहे.

पुरूषोत्तम कुलकर्णी, यांनी 'अक्षरलेणे' हे पुस्तक अत्यंत सुबकतेने छापून प्रकाशित केले आहे. तेही धन्यवादास पात्र आहेत. अस्तु !

❖❖❖

संतकवी कबीर आणि तुकाराम : एक चिंतन, लेखक : प्रा. डॉ. संजय संभाजी लांडगे, अक्षरलेणं प्रकाशन. सोलापूर. पृष्ठे - १२६, मूल्य रु. १२५/-

डॉ. लक्ष्मीनारायण बोल्ली
मातृछाया, १६ विकासनगर, पोटगी रोड, सोलापूर ४१३ ००३.
दूरभाप : ०२१७-२३११६२६

नवे आजीव सभासद

१) जोशी शोभा प्रकाश, पुणे
२) काळे मंगेश नारायण. पुणे
३) महानवर दीपा, लोणंद
४) जोशी विनायक रामचंद्र, डोंबिवली
५) ठाकूर मंदार अनंत, डोंबिवली
६) वेंद्रे जयंत वसंत, पुणे
७) सैतवडेकर मंदाकिनी हरिश्चंद्र, ठाणे
८) शिरवाडकर प्रणव पद्माकर, ठाणे
९) सराफ शिरीष मधुसुदन, ठाणे
१०) टेटविलकर सदाशिव पांडुरंग, ठाणे
११) साळवी विश्वनाथ, ठाणे
१२) जोशी राजीव, कल्याण
१३) गोखले शुभदा मोहन, सांगली
१४) रसाळ विनायक, सांगली
१५) भागवत रविकांत आत्मराम, इचलकरंजी
१६) रसाळ अशोक विठ्ठल, इचलकरंजी
१७) मराठे वामन गणेश, पुणे
१८) लोणी उषा धर्मराव, सोलापूर
१९) गायकवाड अस्मिता सुरेश, सोलापूर
२०) येळंबकर शांता कमलाकर, सोलापूर
२१) इंगळे कैलास रंगनाथ, औरंगाबाद
२२) घोणसे शामा, पुणे
२३) कसबेकर मोहिनी विष्णू, पुणे
२४) किनगावकर प्रकाश, जळगाव
२५) महाजन आत्रा गोविंद. जळगाव
२६) माळी रविंद्र ऊखरडू, जळगाव
२७) नाईक पांडुरंग विनायक, ग्वालेर
२८) परांजपे मिलिंद रामदास, मुंबई
२९) कुंभोजकर दिलीप मनोहर, जबलपूर
३०) सावंत सुरेश गोविंदराज, नांदेड
३१) चिडगोपीकर आकाश स., पुणे
३२) खिरे संदीप सदानंद, पुणे
३३) चिडगोपीकर सर्वोत्तम देवकीनंद, पुणे
३४) चिडगोपीकर योगिनी आकाश, पुणे
३५) पटवर्धन विलास माधव, पुणे
३६) वंकापुरे पूर्वा पुरुषोत्तम, पुणे
३७) दारव्हेकर मंगला वसंत, पुणे
३८) पवार शशिकांत गोविंदराव, पुणे
३९) माढेकर प्रभाकर मल्लिकार्जुन, सोलापूर
४०) पाटील शरद गणेश, सोलापूर
४१) देशपांडे आरती आशिश, पुणे
४२) कोयडे स्मिताचंद्र शेखर, पुणे
४३) संगमनेरकर मोनिका सचिन, पुणे
४४) सातोकर मिलिंद दत्तात्रय, पुणे
४५) कुलकर्णी मीना रवींद्र, पुणे
४६) कुलकर्णी पूजा सदानंद, पुणे
४७) चिटणीस शशिकांत दत्तात्रय, पुणे
४८) आगाशे अजित पांडुरंग, पुणे
४९) आगाशे स्मिता अजित, पुणे
५०) भिसे दिपा मनोज, पुणे
५१) भिसे मनोज बाळकृष्ण, पुणे
५२) जाधव सुधा संजय, पुणे
५३) थोरात सत्यवान महिपती, पुणे
५४) देशपांडे शीला विश्वास, पुणे
५५) केळकर आदित्य श्रीकांत, पुणे
५६) केळकर जाई आदित्य, पुणे
५७) केळकर अरुण श्रीकांत, पुणे
५८) फरनाळे दीपक माधव, पुणे
५९) कुलकर्णी शुभदा मकरंद, पुणे
६०) केळकर श्रीकांत भास्कर, पुणे
६१) संगमनेरकर गिरीश दिगंबर, पुणे
६२) संगमनेरकर प्रतिभा गिरीश, पुणे
६३) गुगळे अनिल चुन्नीलाल, पुणे
६४) घोलप गीता घनःश्याम, पुणे
६५) घोलप घनःश्याम विलास, पुणे
६६) लोखंडे निकेत अनिल, पुणे
६७) लोखंडे निरजा निकेत, पुणे
६८) कर्वे अमित श्रीहरी, पुणे
६९) कर्वे अंकिता अमित, पुणे
७०) संगमनेरकर शशिकांत शरद, पुणे
७१) सातोकर रिटा मिलिंद, पुणे
७२) वंकापुरे पुरुषोत्तम श्रीपाद, पुणे
७३) तावरे रोहिदास गोपीनाथ, पुणे
७४) गाडगीळ पल्लवी आदित्य, पुणे
७५) फडके अरविंद सिद्धेश्वर, पुणे
७६) वापट धनंजय भास्कर, पुणे
७७) दारव्हेकर अमेय सुधीर, पुणे
७८) घोलप उषा शशिकांत, पुणे
७९) घोलप शशिकांत रामचंद्र, पुणे
८०) वाडेकर शिल्पा शशिकांत, पुणे

❖ ❖ ❖

(टीप- अहमदनगर जिल्ह्यातील पाथर्डी तालुक्याचे सुमारे ८२ नवीन आजीव सभासदांची नावे जागेअभावी या अंकात प्रसिद्ध करता आली नाहीत. पुढील अंकात ती प्रसिद्ध होतील.
- संपादक)

पुस्तक परिचय

एका स्टुडिओचे आत्मवृत्त

माधुरी तळवलकर

[आत्मचरित्रलेखनाच्या आड येणारा सर्वात मोठा अडथळा म्हणजे प्रामाणिकपणा आणि आत्मस्तुती हा होय. परंतु एका कालपटलाला जिवंत करून त्याचे चरित्र लिहिणारा, नव्हे! लिहून घेणाऱ्या लेखकाला या अडथळ्याचे भय नाही. कारण ह्या आत्मचरित्रलेखनाचा नायक एक कालखंड आहे. 'राजा कालस्य कारणम्' या न्यायाने कालखंडाचा नायक अलिप्तपणे आणि मनमोकळेपणाने वाचकांना आपले जीवन चरित्र अकृत्रिम शैलीत सांगतो. बोलविता धनी मात्र स्वतः मूकपणे साक्षीदाराची भूमिका बजावतो; असे हे एक कलाक्षेत्रातले लक्षणीय कालचरित्र –! – संपादक]

मनोरंजन हा आता एकविसाव्या शतकातला सर्वव्यापी व्यवसाय झाला आहे. जवळजवळ ऐंशी वर्षांपूर्वी जेव्हा या नव्या अद्भुत कलेचा आविष्कार झाला, तेव्हा भारतामध्ये काय स्थिती असेल ? चित्रपट निर्मितीच्या मूलभूत सोयी, ज्या आपण आता गृहीत धरतो, त्या तेव्हा अस्तित्वातच नव्हत्या. कोल्हापूरच्या स्टुडिओत विजेशिवाय चित्रीकरण होत असे. कशी होत असेल इथली चित्रनिर्मिती ? काय आठवणी असतील त्या स्टुडिओच्या ?

राजेंद्र कुलकर्णी यांनी प्रभाकर पेंढारकरांना विनंती केली की, 'सिनेमा ह्या विषयावर आजवर अनेक पुस्तकं लिहिली गेली आहेत. पण स्टुडिओवर कोणी फारसं लिहिलेलं नाही. तुम्ही जयप्रभा स्टडिओचं आत्मवृत्त लिहावं...' आपल्या वडिलांच्या- भालजी पेंढारकरांच्या-स्टुडिओचं आत्मवृत्त लिहिले तर विलक्षण अनुभवांची अनेक दालने खुली होतील असे लेखकाला वाटले; आणि स्टुडिओ त्यांच्याशी बोलू लागला.

प्रभाकर पेंढारकरांचं वैशिष्ट्य हे की, 'एका स्टुडिओचे आत्मवृत्त' या पुस्तकात फक्त भालजींच्या कार्यकर्तृत्वाचे वर्णन करून ते थांबले नाहीत. त्या काळात कोल्हापूरमध्ये, महाराष्ट्रात व देशात इतरत्र कोणत्या घडामोडी घडत होत्या; आणि त्याचा परिणाम चित्रपटक्षेत्रावर कसा पडत होता हे निरीक्षणही त्यांनी मांडले आहे. त्यामुळे चित्रपटसृष्टीचा महत्त्वपूर्ण दस्तावेज या पुस्तकाच्या रुपाने आपल्याला वाचण्यास मिळतो. भालजींनी निर्मिलेले, तसेच तेथे शूटिंग झालेले चित्रपट, त्यांना मिळालेले पुरस्कार यांची सूची पुस्तकाच्या शेवटी वाचायला मिळाली असती तर दुधात साखर पडली असती !

खरोखर चित्रपटनिर्मिती हा केवढा अद्भुत आणि रोमांचकारक अनुभव असतो! कितीजणांचा त्यात सहभाग ! कागदावरचा साधा शब्द. त्याला रूप नाही. आवाज नाही. हा शब्द पडद्यावर प्रतिमेचे रूप घेऊन, हजारो लोकांच्यासमोर येतो. तोवर केवढ्या स्थित्यंतरातून तो जात असतो ! ही सगळी स्थित्यतरे आपल्याला या पुस्तकात रोचक पद्धतीने वाचायला मिळतात. पेंढारकरांनी तो काळ इतक्या जिव्हाळ्याने उभा केला आहे की, आजचा वाचक सत्तरऐंशी वर्षांचा काळ ओलांडून स्टुडिओच्या अनुभवांशी एकरूप होऊन जातो.

प्रतीक्षालयापासून सुरुवात करून स्टुडिओमधले कपडेपट, दिग्दर्शन-विभाग, सुतारखाते, कॅमेराविभाग, ध्वनिमुद्रण, संकलन विभाग अशा ठिकाणी लेखक आपल्याला फिरवून आणतात. तिथल्या कामाविषयी तर ते सांगतातच पण तो विभाग सांभाळणाऱ्या व्यक्ती आणि वल्लीही आपल्याला भेटतात.

भालजी पेंढारकरांचा स्टुडिओ म्हणजे नुसता स्टुडिओ नसून 'चित्रमंदिर' आहे; याची आपल्याला प्रचीती येते. इथे जागोजागी अर्थपूर्ण सुभाषिते वाचण्यास मिळतात. दिवसाची सुरुवात प्रार्थनेने होते. नाटकाच्या जशा तालमी होतात, तशा 'स्क्रिप्ट'च्या तालमी होतात. भालजींचे संवाद चमकदार, प्रसंगी निखाऱ्यासारखे दाहक. अचूक आणि मनात घुसणारे. रोजच्या तालमींमध्ये या संवादांचे शब्दोच्चार, संवादफेक चांगले घटवून घेतले जातात. पार्श्वगायनाची सोय नाही, वीज नाही; त्यामुळे तिथल्या मंडळींची कल्पकता पणाला लागते.

भालजींनी पटकथा व दिग्दर्शन केलेल्या 'श्यामसुंदर' ह्या

अनुक्रमणिका

चित्रपटाचा देशात पहिल्यांदा रौप्यमहोत्सव साजरा झाला. त्यानंतर त्यांनी केलेला 'आकाशवाणी' चित्रपट हिंदीतही तयार करण्यात आला. मुंबई, दिल्ली, कलकत्ता ह्या प्रमुख शहरात तो वितरित केला; आणि त्याला सर्वत्र यश मिळाले. त्यानंतर भांडवल, वितरण अशा अनेक अडचणींमधून वाट काढीत भालजींनी उत्तमोत्तम चित्रपट महाराष्ट्राला दिले. जसा काळ असेल, लोकांची मनःस्थिती असेल आणि मुख्य म्हणजे स्वतःला जे मांडायचे असेल त्याप्रमाणे नवनवीन चित्रपट भालजींनी काढले. सुरुवातीला ब्रह्मचारी, महारथी कर्ण, देवता, पहिला पाळणा असे काही चित्रपट गाजले. लोकांच्या मनाची स्वातंत्र्याची आस आणि ती ज्योत तेवती ठेवणे हे आपले कर्तव्यच मानून मग त्यांनी 'राजा शिवछत्रपती', 'मराठा तितुका मेळवावा', 'थोरातांची कमळा', 'मोहित्यांची मंजुळा' अशा उत्कृष्ट चित्रपटांची निर्मिती केली.

पेंढारकर मुळात उत्तम लेखक असल्यामुळे विश्राम बेडेकर, मीनाक्षी, मा. विनायक, सुलोचना, जयश्री गडकर यांचे त्यांनी मनोज्ञ व्यक्तिचित्रण केले आहे. बेडेकरांचे वर्णन एकाच वाक्यात ते कसे करतात पाहा, 'दुटांगी धोतर, सफेद शर्ट, खांद्यावर कोट, केस विस्कटलेले आणि डोळ्यांमध्ये बुद्धिमत्तेची चमक, बोलणं मोजकं पण खिळा मारल्यासारखं अचूक.' स्वा. सावरकरांनी स्टुडिओला दिलेल्या चैतन्यमय भेटीचे वर्णन वाचून तर आपण रोमांचित होतो. तिथल्या विभागांवर लिहिलेल्या पाट्या मराठीत असायला हव्यात असे सावरकरांनी सुचविले. 'मराठीत योग्य शब्द शोधावे लागतील...' असे म्हटल्यावर त्यांनी चक्क 'कशाला, मी सांगतो. लिहून घ्या...' असे म्हणून भराभर दिग्दर्शक, छायाचित्रण, संकलन, ध्वनिमुद्रण विभाग, रंगपट अशी नावे सुचवली. शेवटी सावरकर म्हणाले, 'ह्या सर्वामध्ये काही अवघड, न समजण्याजोगे आहे का ? नाही ना, मग आजपासूनच हे शब्द वापरायला सुरुवात करा. हा इंग्रज प्रथम आपल्या मनातून गेला पाहिजे. भाषेतून, विचारातून गेला पाहिजे... मग एक दिवस तो आपल्या देशातूनही जाईल.'

असे एकाहून एक भारावून टाकणारे प्रसंग या पुस्तकात आपण वाचत जातो; आणि एकदा हातात घेतलेले पुस्तक सोडावेसे वाटतच नाही. लेखकाची निवेदनशैली वाचकाला आपलीशी करणारी आहे. एके ठिकाणी ते म्हणतात, 'परकीय सत्ता हा सर्वात मोठा शत्रू. तो समुद्रापार गेला. आता कोणत्या गोष्टीविरूद्धचा संघर्ष भारतीय चित्रपटात येईल ? मला नेहमीप्रमाणे कुतूहल ! मी पाहात होतो.' त्यांच्या अशा मनोगतानंतर खरोखरच आपल्याही मनात उत्सुकता निर्माण होते. पुढे कायं ? हे कळण्यासाठी अनावर ओढीने आपण पुस्तकाची पाने उलटत जातो. आपली ही उत्सुकता लेखक कुठेही फार ताणत नाही. थोडक्या शब्दांमध्ये जास्तीत जास्त महत्त्वाचे टप्पे तो ओलांडत जातो, त्यांची नोंद घेतो पण फार रेंगाळतही नाही. गांधीहत्त्येनंतरच्या जाळपोळीसंबंधी सांगताना ते म्हणतात, 'अशा ह्या घटना - त्याचा मी साक्षीदार !' लेखकाचा हा साक्षीभाव सर्व प्रसंगात दिसतो.

आसभास नसताना म. गांधींची हत्या झाली; आणि संतप्त जमावाच्या अविचारामध्ये स्टुडिओचा बळी गेला. धूळ बसू नये, चरा पडू नये म्हणून जिवापाड जपलेले कॅमेरे, लाखो रुपयांची मौल्यवान मशिनरी, मुंबईला जाऊन सेन्सॉरबोर्डाचे सर्टिफिकेट मिळवून आणलेली 'मीठभाकर'

ही नवीकोरी फिल्म, वैभवशाली देखाव्यांच्या स्मृती जपणारे कपडेपट, रथ हे सगळे हल्लेखोरांच्या क्रोधाग्नीत भस्म झाले. पैसा पैसा जोडून उभारलेला चित्रसंसार जळून गेला. भालजींना चौकशीसाठी पोलिसांनी ताब्यात घेतले. अशा भयावह परिस्थितीत कोणीही माणूस हताश झाला असता. पण भालजींच्या डोळ्यात पाणी आले नाही. कुटुंबियांना आमच्याकडे राहायला घेऊन जातो म्हणणाऱ्यांना त्यांनी नकार दिला. जळलेल्या स्टुडिओच्या मागच्या दोन खोल्यात घरचे लोक राहू लागले. चार महिन्यानंतर भालजी स्टुडिओत परतले; तेव्हा सर्वत्र जळलेल्या लाकडांचे ओंडके, पडलेल्या भिंती, राखेचे ढीग आणि अस्ताव्यस्त पसरलेले पत्रे ! स्टुडिओबरोबर शिवचरित्राबद्दलचे साहित्य नाहीसे झाले ह्याचे भालजींना अतीव दुःख झाले; कारण ही कागदपत्रे परत मिळवणे अशक्य होते. लोकांनी मदतनिधी उभारण्याचे ठरविले. पण भालजींनी त्याला ठाम नकार दिला; आणि वर्षाच्या आत 'मीठभाकर' हा चित्रपट पुन्हा नव्याने तयार करून झळकवला. हा जिद्दीचा प्रवास वाचताना आपण थरारून जातो.

आर्थिक अडचणी तर खूपच होत्या. रेकॉर्डिंग मशिनचा मोठाच प्रश्न होता. पण स्टुडिओ म्हणजे एक कुटुंब होते. मंगेश देसाईंनी बरीच खटपट करून लाखो रुपये किंमतीच्या जागी एका तीन हजार रुपयांच्या कॅमेऱ्यावर पूर्ण चित्रपट चित्रित करण्याची करामत करून दाखवली. एकदा 'पावनखिंड' चित्रपटासाठी उभारलेली घोडखिंड मुसळधार पावसात वाहून गेली. कधी वितरक पैसे बुडवत. या सगळ्यावर सरळमार्गी भालजींनी आपल्या ध्येयनिष्ठेच्या बळावर मात केली. 'साधी माणसं', 'तांबडी माती' या त्यांच्या चित्रपटांनाही राष्ट्रपती पुरस्कार लाभले. ते त्यांनी व्रतस्थ वृत्तीने स्वीकारले.

या साऱ्या जादूमयी, डोंगराएवढ्या माणसांचा काळ प्रभाकर पेंढारकर यांनी आपल्या सिद्धहस्त लेखणीने जिवंत केला आहे. भालजींनी अक्षरशः इतिहास घडवला. राज कपूर, त्यांच्या चित्रपटात पहिल्यांदा कॅमेऱ्यासमोर आला. लता मंगेशकरने 'आनंदघन' या नावाने पहिल्यांदा त्यांच्या चित्रपटाला संगीत दिले. दादा कोंडके, सुलोचना, मीनाक्षी, आशा काळे अशा कितीतरी कलाकारांना भालजींनी प्रथम पडद्यावर संधी दिली. सूर्यकांतना शिवाजी महाराजांच्या भूमिकेसाठी त्यांनी प्रथम निवडले. त्यानंतर सूर्यकांतनी तशा अनेक भूमिका साकारल्या. तो काळच मोठा विलक्षण होता. वैयक्तिक प्रगतीपेक्षा कलेला न्याय देण्याची वृत्ती त्या काळी होती. बाबुराव पेंढारकर हे अभिजात कलाकार. पावनखिंडमध्ये बाजीप्रभूची भूमिका त्यांनी करावी अशी भालजींची इच्छा होती. पण वसंतराव पहेलवान यांनाच ही भूमिका शोभेल असे बाबुरावांनी आग्रहाने सांगितले आणि दुसरी भूमिका त्यांनी स्वीकारली.

व्यवसाय म्हणून भालजींनी कधीही चित्रपट काढले नाहीत. म्हणूनच सूर्यकांतना महाराजांची भूमिका स्वीकारायची असे ठरल्यावर भालजींनी त्यांना मुजरा केला आणि म्हणाले, 'आजपासून तुम्ही कोणा व्यक्तीला खाली वाकून पायाला हात लावून नमस्कार करायचा नाही. तुम्ही छत्रपती आहात. आईवडील आणि भवानीदेवी खेरीज कुणापुढे तुम्ही झुकायचं नाही. महाराजांना कुणी नुसतं 'शिवाजी' असं संबोधलं तर ते त्याला खडसावायचे.

चित्रपटाचा सुवर्णकाळ चित्रित करणाऱ्या या पुस्तकाचे निर्मितीमूल्यही त्याला साजेसेच आहे. 'एका स्टुडिओचे आत्मवृत्त' हे नाव गोल्डन ग्लिटरिंगने केल्यामुळे मुखपृष्ठ आकर्षक झाले आहे. शिवाय जयप्रभा स्टुडिओचे गेट 'स्पॉट यूव्ही' वापरल्याने व उठून आले आहे आणि ते पाहताच चटकन ते गेट ढकलून आत शिरावेसे वाटते. पुस्तकात संजय शेलार यांची जवळजवळ शंभरेक स्केचेस आहेत. केवळ या चित्रांसाठीसुद्धा हे पुस्तक संग्रही ठेवावेसे वाटेल इतकी ही पेन्सिल-स्केचेस अप्रतिम झाली आहेत. मजकुरासाठी उत्तम आर्ट पेपर, भरपूर मार्जिन आणि सुरेख फोटोग्राफ्स् यांमुळे हे पुस्तक अगदी देखणे झाले आहे. इतके उत्कृष्ट पुस्तक मराठी वाचकांच्या हाती दिल्याबद्दल प्रकाशक, लेखक, चित्रकार या सर्वांचेच आभार मानावेसे वाटतात.

❖❖❖

एका स्टुडिओचे आत्मवृत्त, प्रभाकर पेंढारकर, राजेंद्र प्रकाशन, पृष्ठे : १९८, मूल्य : ३५० रु.

माधुरी तळवलकर
इ-६अ गंगातीर्थ, सहकारनगर १, पुणे ९. फोन : २४२२१५८१.
panchami6300@gmail.com

अनुक्रमणिका

पुस्तक परिचय

प्रकाशाची वाट : 'तिम्मा'

प्रा. संजय नगरकर

भय, भूक आणि मैथुन या आदिम गरजांशी झगडा करून माणसानं 'माणूस' म्हणून स्वतःचं एक वेगळं अस्तित्व आज निर्माण केलेलं आहे. परंतु या अस्तित्वाला वर्णभेद, धर्मभेद, भाषाभेद, लिंगभेद, जातिभेद व प्रांतभेद या तटबंधांनी जखडून टाकले आहे. काही समाजगटांना आजही उपरोक्त गरजांशी झगडा करावा लागत आहे. विशेषतः ग्रामीण भागात या तटबंदी अधिक मजबूत आहेत. त्यांना धक्के देताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'शहरे ही मुक्तीची महाद्वारे' असल्याचे सांगून 'खेडी सोडा', 'शिका संघटित व्हा. संघर्ष करा.' असा नारा देऊन या गावगाड्याच्या डबक्यातच वळवळणाऱ्या व कृमीकिटकांसारखे आयुष्य जगणाऱ्या जातिसमूहांना जागे केले. अशाच जातिसमूहातील एक तरुण लेखक प्रा. प्रकाश जाधव यांनी प्रेरणा घेऊन स्वतःचे पुनरूत्थान केले, शिवाय नावाप्रमाणेच स्वजातीतील समाजबांधवांना प्रकाशाची वाट दाखविणाऱ्या 'तिम्माची' व अनुषंगाने वडार जातीच्या जीवन संघर्षाची कहाणी 'तिम्मा' या साहित्यकृतीतून मांडली आहे.



आभाळ हेच छत व धरती हाच पाया मानून वर्षानुवर्षे एका गावाहून दुसऱ्या गावाला भटकंती करणाऱ्या अज्ञान अंधश्रद्धांच्या काळोखात खितपत पडलेल्या, सर्वच समाजाच्या लेखी चोर, दारूडे, भांडखोर, डुक्करखाऊ, घाणेरडे म्हणून हिणवल्या जाणाऱ्या, दुसऱ्याच्या निवाऱ्यासाठी स्वतःचा आडोसाही करता न आलेल्या, दगड फोडण्याचे - खणण्याचे कष्टप्रद काम करणाऱ्या वडार जातीतील तिम्मा व त्याचे कुटुंब यांच्या कुत्तरओढीची ही कथा. तिम्मा हा सोशिक, समंजस, परिस्थितीने लाचार-लीन बनविलेला, आपली चूक नसतानाही कोणी काही आरोप केला तरी गुमान स्वीकारणारा, 'आरे ला कारे' न म्हणता आपण लवून-भजूनच वागले पाहिजे असे त्याला वाटते. परंतु खेडेगावातील पाटील असोत, महार-मांगांसारखे त्याच्यासारखेच दलित असोत वा त्याच्याच जातीतील दगडुसारखे मुकादम व दाम्यासारखे चुगलखोर असोत त्याच्या कष्टाळू-प्रामाणिक वाटचालीत सतत काटे पेरतात. तो कुठेच स्थिर होऊ शकत नाही. ''आपलीही जिंदगशी नाय - मरून गेलो असतो तर बरे झाले असते. जिवंत राहून कुत्र्यासारखं जगण्यात काही अर्थ नाय, ढोरासारखं वणवण भटकूनसुदीक कोणी काम देत नाय.'' असे म्हणणारा तिम्मा बेवारशी जगण्याने व्याकुळ होतो. हिशोब करता येत नसल्यामुळे दगडू मुकादम, सैनिक पाटलाची पत्नी साहेबीन, उसने पैसे दिलेले पाटील अक्षरशः लुबाडतात. हिशोबात खोट दाखवून ढोरकष्ट करून घेतात. 'हाकललं जाणं' हे जणू त्याचं विधिलिखितच, म्हणून तो नागम्माला म्हणतो, ''... आपण या जातीत जन्माला आलो नसतो; तर माणसासारखे जगलो असतो. पण ही माणसं माणसासारखी जगूच देत नायत. आज इथं तर उद्या तिथं असं आपल्या पाचवीला पुजलेलं हाय...'' अशा या तिम्मासारखीच वडारजातीची देखील अवस्था आहे. तो समंजस जरी असला तरी दारूच्या व्यसनातून तोही सुटलेला नाही. बायको मुले उपाशी राहोत वा काहीही होवो परंतु मिळेल तो पैसा, दररोज दारूवर उडविणे हा जणू या सर्व जातीचा शिरस्ताच ठरलेला आहे. प्रसंगी स्त्रियाही दारूच्या आहारी जातात हे नागम्माच्या माध्यमातून सूचित केलेले

अनुक्रमणिका

आहे. अर्थात् ढोरमेहनतीमुळे दारू पिल्याशिवाय हे लोक जगूच शकत नाहीत; हे सत्यदेखील कादंबरीभर प्रभावीपणे मांडले आहे. बालविवाहासारख्या कुप्रथेमुळे स्त्रियांच्या संदर्भात अनेक समस्या निर्माण होतात. विशेषतः ना कळत्या वयात नांदायला जाणं किती हळवं व वेदनादायी असतं याचं भावनिक चित्रण सुऱ्या-सोजरा व बाई या यलाप्पांची सून यांच्या लग्नप्रसंगाच्या निमित्ताने केलेलं आहे. साटंलोटं व बालविवाह प्रथा, लग्नप्रसंगी जातपंचायतीचा बडगा, देणीघेणी अशा वडारजातीतील लग्नविधी सोहळ्याचे वास्तव चित्रण कादंबरीत केलेले आहे. ताटातुटीच्या प्रसंगाचे चित्रण वाचताना कालवाकालव होते, तिम्मा तर विरहाच्या त्या प्रसंगाचे दुःख अनावर होऊन दारूच्या नशेत जात पंचायतीलाच शिव्या हासडतो व म्हणतो, "तुमच्या मायच्या गांडीत गेलं जेवण, माझ्या पोरीचं वाटुळं झालं. पार जीवाचं रान झालया. पोरगी तळमळ करत होती. पर या जातपंचायतीच्या मायला आणं रिती-रिवाजाला झवलं. रीती पाळणाऱ्याच्या बायांना बायकांना बी..." पाणी भरायला गेलेली बाय ही नववधू विहिरीत पडून मरते व तिच्या शोधाशोधीनंतर जो कालवा उडतो. त्याचे चित्रणही प्रभावीपणे केले आहे. अशा या हृदयद्रावक प्रसंगाबरोबरच, संघर्ष मारामाऱ्या, डोके फोडाफोडी हे देखील त्यांच्या पाचवीला पुजलेले. हा समाज तसा शक्तीशाली परंतु कमालीचा भित्रा. नशापान केले की, त्यांच्या डोक्यात जणू रक्त उतरते. एकमेकांची डोकी फोडण्याइतपत वेळ येते. या मारामाऱ्या आपापसातीलच. अस्थिरता व आर्थिक अभावग्रस्तता यामुळे इतर समाजाला नेहमी घावरून असलेले हे लोक. परंतु दारू पिऊन आल्यानंतर कधीकधी राक्षस होतात. बायकांना मारहाण, एकमेकांवर बोलता बोलता भांडण काढून मारामाऱ्या करतात. दगडू मुकादमाने सर्व समाजाला फसवून एकट्यानेच खडी फोडण्याचे मशीन वगैरे गिळंकृत केल्याचा राग मनात धरून ज्या मारामाऱ्या होतात, किंवा पाटील असो वा इतर जातीतील कुणीही एखाद्याला मारीत असल्यास त्यावेळी इतर जातबांधव अलिप्तपणे पाहत राहतात. एकजुटीच्या अभावामुळे हे सारे घडते. त्या संदर्भातले प्रसंगही प्रभावीपणे मांडले आहेत.

अस्पृश्यता व जातिभेदाच्या बाबतीत भारतीय समाज व्यवस्था ही 'मडक्याच्या उतरंडीसारखी' असल्याचे चित्र याही कादंबरीत रेखाटले आहे. महार-मांग जातीतील लोक हेही दलितच परंतु वडार जातीला ते देखील आपल्यापेक्षा हीन, खालच्या जातीतील मानतात. तर पाटील वगैरे मंडळी तर आपला रूबाब व दरारा गाजविण्याचे हक्काचे ठिकाण म्हणून या जातीला जरबेत ठेवतात. स्मशानभूमीत प्रेत पुरण्यास परवानगी न देणे. गायरानाच्या जमिनीवर स्थिर होण्याचा प्रयत्न करीत असताना हा आपल्या अस्तित्वावरील घाला असल्याचे समजून दलितांचा संघर्षसिद्ध जिव्हाळा अजूनही संपलेला नाही याचे द्योतक म्हणून दलितातील शिरपाची वर्तणूक, लष्करातील पाटील व निटूरच्या पोलीस पाटलांनी नवी दिशा देऊन प्रकाशाचं दान टाकणे; या घटना आशादायी व सकारात्मक आहेत. तसेच वडार जातीतील आनंद व हास्य पूर्णपणे आटून गेलेले असले तरी लग्न झाल्यावर किंवा कुणी मेल्यानंतर वर्गणी गोळा करून कुनुर ठेवण्याच्या प्रसंगी व त्यानिमित्ताने दारू-मटणाच्या जंगी कार्यक्रम ठेवून आनंद साजरा करणे; असे काही आनंदाचा झरा निर्माण करणारे प्रसंगही येतात. पांढरपेशा व संभावित वर्गाच्या दृष्टीने हिणकस वाटेल, परंतु ग्रामवास्तवातील सत्यावर प्रकाश टाकणारा, लैंगिक मैथुनाची भूक भागविण्यासाठी जे जे प्रकार केले जातात त्यातील एक प्रसंग येथे चित्रित केला आहे. हा प्रा. प्रकाश जाधव यांचा धाडसी प्रयत्न परंतु उल्लेखनीय आहे. कादंबरीची शैली निवेदनप्रधान असली तरी संवाद हे ग्रामबोली व वडारजातीच्या खास बोलीवैशिष्ट्यांचा वापर केल्यामुळे भाषिक अभ्यासाच्या दृष्टीने सदर कादंबरी उपयुक्त ठरते. या पूर्ण भाषेवर लातूर-उमरगा भागातील मराठी भाषेचा प्रभाव स्पष्ट दिसतो. तसेच वडारजातीतील लोक ज्या पद्धतीने मराठी बोलतात त्याचा वेगळा ठसा कादंबरीच्या शैलीवर उमटला आहे. उदा. उपादार नको, चुणकावला, फैमाली, हाळजायला यासारखे शब्दप्रयोग जागोजागी सापडतात. प्रसंगी काही वाक्यांमध्ये प्रतीके, अलंकारबद्धताही आलेली आहे. उदा. "लाह्या भाजून निघाव्यात असे कडक ऊन" रात्रीच्या त्या शुभ्र प्रकाशात चंद्राकडे बघत तो विचार

(पान क्र. ५७ वर पहा...

परिचय एका अप्रकाशित चरित्रात्मक नाटकाचा

संत विष्णुदास अथवा सती राधाबाई–न. स. जोशी–खरशीकर

डॉ. मार्तंड कुलकर्णी


मनाला भावलेल्या प्रिय तसेच आदरणीय व्यक्तीबद्दल प्रेम व आदर व्यक्त करणे; आणि ती व्यक्ती काळाच्या पडद्याआड गेली असेल तर तिची स्मृती भविष्यकाळासाठी कायम ठेवण्याची काही तरी व्यवस्था करून ठेवणे, ही मानवाची सामान्य प्रवृत्तीच असते. भूतमात्रामध्ये आत्मसंरक्षणाची जी सहज प्रेरणा आहे. त्यात या प्रवृत्तीचे मूळ निश्चितच सापडते. या प्रवृत्तीतूनच चरित्रात्मक लेखनाच्या प्रथेचा जन्म दिसून येतो. जसे समाजात वीर पुरुषांच्या पराक्रमाचे आकर्षण असते तसेच वंदनीय म्हणून मान्यता पावलेल्या साधु-संतांची थोरवी गाणारेही प्रचंड असे लेखन मराठी साहित्यात दिसून येते. याचे उत्तम उदाहरण म्हणजे महानुभावीय पंथाचे संस्थापक श्री चक्रधर स्वामी यांच्या आठवणी ज्यात ग्रथित केलेल्या आहेत असा 'लीळाचरित्र' ग्रंथ होय. संतांनी आपल्या अभंग रचनेतून ही स्वतःविषयी सांगितले आहे.

मानवी मनावर खोलवर परिणाम करून संतचरित्राने एक विलक्षण अशी कामगिरीच केली आहे. अशा संत चरित्रकारापैकी माहूरक्षेत्री आपल्या कार्यकर्तृत्वाने सबंध जनसामान्यात स्वतःविषयी एक ओढ निर्माण करणारे संत म्हणजे विष्णुदास. (कालखंड १८४४ ते १९१७) संत विष्णुदासांनी आपल्या काव्य रचनेतून माता रेणुकेबरोबर इतर देव-देवता तसेच सामाजिक विषयावर काव्य रचना केली. त्यांचे चरित्र तीन खंडात लिहिणारे विष्णुदासांचे भाच्चे नरहर सदाशिव जोशी-खरशीकर (डॉ. प्र. न. जोशी, पुणे यांचे वडील) यांनी मराठी साहित्यात विपुल अशी काव्यरचना करून भर घातली. आपल्या अमोघ वाणीतून कीर्तनपरंपरेला समर्थपणे सांभाळण्याचे कार्य केले. न. स. जोशी-खरशीकरांनी संत विष्णुदासांच्या वाङ्मय सेवेचा प्रचार-प्रसार मोठ्या प्रमाणात केला. विष्णुदासरचित आख्यानकाव्याला आपल्या वाणीने भक्तांच्या मनीं उतरविले. आपल्या काव्यगायनाने प्रवचनाने महाराष्ट्र व महाराष्ट्राबाहेर एक श्रोता वर्ग निर्माण केला. आपल्या गुरुंचे जीवनकार्य एका नाटकाला शोभावे असेच आहे; हे ओळखून नरहरशास्त्री जोशी यांनी 'संत विष्णुदास अथवा सती राधाबाई' नावाचे नाटक लिहिले. एक चरित्रात्मक नाटक लिहून आपले विद्वान पुत्र डॉ. प्र. न. जोशी यांचेकडे सुपूर्त केले. मध्यंतरी विद्यापीठीय संशोधनानिमित्त डॉ. प्र. न. जोशी यांची भेट होत गेली. पुण्याला अनेक वेळ जाण्याचा योग आला. त्यावेळी डॉ. प्र. न. जोशी यांनी आपल्या वडिलांच्या लेखनसंपत्तीपैकी एक वही हातात ठेवली. प्रथम पृष्ठावरील ठळक अक्षरातील शीर्षक न. स. जोशी-खरशीकरकृत लेखन म्हणजेच एक चरित्रात्मक नाटक ते म्हणजे, 'संत विष्णुदास अथवा सती राधाबाई' हे होय.

'संत विष्णुदास अथवा सती राधाबाई' हे नाटक तीन अंकी असून नायक-नायिकांच्या तोंडी पदांची सुंदर योजना लेखकाने केली आहे. हस्तलिखित वहीत एकूण पृष्ठ ८३ असून लेखकाने पहिल्या अंकासाठी १२, दुसऱ्या अंकासाठी ३७ तर तिसऱ्या अंकासाठी साधारण या नाट्य कलाकृतीचे लेखन इ.स. १९५४-५५ च्या सुमारास झाले असावे असे वाटते. याचे कारण असे की, सदर लेखन करणाऱ्या लेखकाने संत विष्णुदासांचे चरित्र तीनखंडात हे इ.स. १९५१-५२ मध्ये लिहिले आहे. त्यावरून हा अंदाज बांधणे योग्य ठरते. या नाट्यलेखनापूर्वी निश्चितच चरित्राचे लेखन झाले असावे. चरित्रलेखन-काव्यलेखन-नाट्यलेखन करणाऱ्या न. स. जोशी-खरशीकरांची साहित्य समिक्षकांनी फक्त नावापुरतीच नोंद घेतली आहे; हे सांगणे वेगळे नको.

नाटकाच्या शीर्षकात संत विष्णुदास व राधाबाई या उभयतांचा उल्लेख आहे. दोहोंचे कार्यकर्तृत्व तेवढेच विलक्षण महत्त्वाचे ठरते. पतीसेवेला अखेरपर्यंत प्रिय मानून 'पती हाच परमेश्वर' मानणाऱ्या विष्णुदासांच्या

अनुक्रमणिका



सुविद्य पत्नी म्हणजे राधाबाई. स्वतः विष्णुदासांनी आपल्या पत्नीच्या गौरवार्थ पोवाड्याचे लेखन केले आहे, हे विशेष होय. एका पुरुषाकडून आपल्या स्त्रीवर पोवाड्याची रचना होणे म्हणजे त्या स्त्रीचे मोठेपणच मानले पाहिजे. पत्नीनिधनानंतर विष्णुदासांना झालेला शोक आपल्या 'पोवाडा' काव्य रचनेतून व्यक्त केला आहे.

'रंग पटावर स्त्री-पुरुषांची फुटली रे जोडी
आता काय खेळण्यांत गोडी'

असे भावपूर्ण उद्गार स्वतः विष्णुदास आपल्या धर्मपत्नीविषयी काढतात. तेव्हा राधाबाईचे कार्य हे तेवढेच महत्त्वाचे वाटल्याने या नाट्यलेखकाने 'संत विष्णुदास अथवा सती राधाबाई' असे या नाटकाला शीर्षक दिले आहे.

नाट्यलेखकाने जागोजागी पात्रांच्या तोंडी सुंदर सुंदर पदांची मेजवानी देऊन नाटकाला अधिक रंग आणला आहे. संत विष्णुदासांचा व राधाबाईचा जीवनपटच लेखकाने 'नाटक' या वाङ्मय प्रकारात तंतोतंत वसविला आहे. मुळात दत्तभक्त; पुढे माता रेणुकेचे भक्त असलेले विष्णुदास, कशा व कोणत्या प्रसंगांना तोंड देत जीवन प्रवास करतात; हे या नाटकातून दिसून येते. पती आपल्याला सोडून गेल्यावर धीर गंभीरपणे समाजापुढे न डगमगता, आपला आत्मविश्वास किंचितही ढळू न देणाऱ्या राधाबाई या नाटकात पहायला मिळतात. आपला पांडुरंगावरील दृढभाव कसा सार्थकी ठरतो. पुन्हा पतीचे दर्शन कसे होते हा योगायोग या नाटकात मन हेलावून सोडणारा आहे. संतपदाला विराजमान झालेल्या विष्णुदासांचा एक जीवनप्रवास नाटकात यथोचित उभा करण्यात लेखकाला निश्चितच यश आले आहे.

एकंदरीत हे अप्रकाशित नाटक असून लिखाणाला ६० वर्ष पूर्ण होऊनही वाचकांपासून अलिप्त आहे. या निमित्ताने या चरित्रात्मक नाटकाची एक ओळख मराठी वाचकाला व्हावी; हा एक हेतू. यथावकाश नाटक प्रकाशित करण्याचा मनोदय असून मराठी नाट्यपरंपरेत या चरित्रात्मक नाटकांची एक निराळीच ओळख ठरेल असे वाटते.

❖❖❖

डॉ. मार्तंड कुलकर्णी
'मराठी विभाग' सरस्वती महाविद्यालय,
किनवट, जि. नांदेड.
फोन : ०२४६९-२२२३८५,
भ्रमणध्वनी : ९४२१७५८०३२

(पान क्र. ४३ वरून पुढे चालू...)

नेमाडे यांच्या या चिंतनगर्भ विधानाची अस्सल जाण डहाक्यांना आहे, हे स्पष्टपणे जाणवते. त्यांच्या काव्यानुभवातील संपृक्तता याचेच निदर्शक आहे.

संदर्भ :

१) मराठी वाङ्मयकोश (खंड चौथा) - संपादक विजया राजाध्यक्ष, साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई पृ. ३८७.
२) पाटील म. सु. - 'अक्षरवाटा' अनमोल प्रकाशन, पुणे. पृ. १२, प. आ. १९८२.
३) नेमाडे भालचंद्र - देखणी (प्रस्तावनेतून) पॉप्युलर, मुंबई दुसरी आवृत्ती २०००.

❖❖❖

रेणुकादास उबाळे
भ्रमणभाष : ९४२३२१७७३८

निवडक नवे...


परिषदेकडे आलेल्या ग्रंथांपैकी
विशेष उल्लेखनीय ग्रंथांचा
परिचय करून देणारे सदर



दूरदर्शी लोकनेता - लोकमान्य टिळक :

सर्वसामान्य भारतीय जनतेच्या मनात स्वातंत्र्याबद्दलची आस निर्माण करून स्वराज्यासाठी देह झिजविणाऱ्या लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या जीवन कर्तृत्वाची ओळख करून देणारे हे छोटेखानी पुस्तक आहे. लोकमान्यांची कथा आपण लहानपणापासून ऐकत. वाचत असतो. परंतु त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील फारशा परिचित नसणाऱ्या पैलूंचे दर्शनही यामध्ये लेखिकेने घडविले आहे. टिळक यांची मुत्सद्देगिरी आणि त्यांचा दूरदर्शीपणा, याचा भारतीय स्वातंत्र्यलढ्याला झालेला फायदा, यामधून सुस्पष्ट होतो. लोकमान्यांचीबालपणापासूनची जडणघडण, त्यांच्यावर झालेले संस्कार, स्वातंत्र्यलढ्याची उभारणी, त्यातील सक्रीय सहभाग, त्यांची देशभक्ती, त्यांनी केलेले लोकजागृतीचे कार्य, त्यामध्ये भोगलेला कारावास अशा अनेक पैलूंचे दर्शन घडविणारे प्रसंग यामध्ये अत्यंत चित्रमय पद्धतीने रेखाटलेले आहेत. मुलांप्रमाणेच मोठ्यांसाठीही वाचनीय ठरावे असे हे पुस्तक आहे. (दूरदर्शी लोकनेता : लोकमान्य टिळक, लेखिका : ललितकला शुक्ल, शब्दरत्न प्रकाशन, पृष्ठे : ६८, मूल्य : ७० रुपये)

देशादेशातून :



चंद्रकांत वर्तक यांनी विविध देशांमधली वैशिष्ट्ये, वेगळेपण टिपत वर्णिलेली ही भ्रमणगाथा आहे. युरोपीय देश किंवा ऑस्ट्रेलिया, जपानसारखे परिचित प्रगत देश पाहणाऱ्यांची, तिथे आवर्जून जाणाऱ्यांची संख्या मोठी असते. त्या तुलनेत व्हिएटनाम, कंबोडिया, इंडोनेशिया, नॉर्वे, बाली अशा केवळ नावानेच माहीत असलेल्या अपरिचित देशांना भेट देऊन मिळालेली माहिती, आलेले अनुभव यांची लालित्यपूर्ण शैलीत केलेली गुंफण वाचताना सुखद अनुभव मिळतो. हनोईमधील मुक्काम, कोपनहेगनची भेट, अंकोरवात, अंकोरथोमची झलक, कुचीमधल्या भूमिगत विश्वाचे दर्शन, हे लेख अत्यंत माहितीपूर्ण, वाचनीय, खऱ्या अर्थाने नव्या जगाची, ठिकाणांची ओळख करून देणारे आहेत. (देशादेशातून : लेखक : चंद्रकांत वर्तक, अक्षरमुद्रा प्रकाशन, पृष्ठे-११२, मूल्य : शंभर रुपये)



साहित्य : रूप आणि स्वरूप :

कुठल्याही ग्रंथ किंवा पुस्तकामधल्या प्रस्तावना हा अत्यंत महत्त्वाचा भाग. त्या ग्रंथाच्या परिचयाच्या दृष्टीने आणि आकलनाच्या दृष्टीनेही प्रस्तावना महत्त्वाची असते. समीक्षक आणि ललित लेखक असलेल्या डॉ. वासुदेव मुलाटे यांनी विविध ग्रंथांना लिहिलेल्या प्रस्तावनांचे संकलन या पुस्तकात आहे. मुलाटे हे आस्वादक समीक्षक तसेच ललित लेखक असल्याने त्यांच्या या प्रस्तावनाही अभ्यासपूर्ण असल्या तरी क्लिष्ट, जटिल नाहीत. श्री. गोविंदप्रभू चरित्र, महदंबेचे धवळे - एक आदर्श काव्य,

संगीत सौभद्राविषयी, नवी ग्रामीण कथा, मराठवाड्याची कथा, १९७० नंतरचे साहित्यिक, पायाभूत आधुनिक गद्य इत्यादी विषयांवरच्या या प्रस्तावना आहेत. त्या वाचताना संबंधित ग्रंथांचा केवळ परिचयच होत नाही; तर संपूर्ण ग्रंथ वाचल्याचा आनंद मिळतो आणि त्यातील आशयाचे तौलनिक, अभ्यासपूर्ण विश्लेषणही वाचायला मिळते. (साहित्य : रूप आणि स्वरूप : लेखक : डॉ. वासुदेव मुलाटे : कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद, पृष्ठे : २५६, मूल्य : २३० रुपये)

अलगुजगाणे :

अत्यंत देखणे मुखपृष्ठ असलेला हा कवितासंग्रह डॉ. शंतनू चिंधडे यांनी संपादित केलेला आहे. कला आगाध्ये, भारती देशपांडे, अरुणा गोखले, राजा फोपे, जयश्री घुले, जयश्री संगारेड्डीकर, अविनाश वाघमारे, अनुया कुलकर्णी आणि श्याम लाटकर या कवींच्या कवितांचे यामध्ये संकलन आहे. शब्दवैभव साहित्यप्रेमी मंडळाचा हा सोळावा प्रातिनिधिक कविता संग्रह आहे. यामधील कविता अत्यंत साध्या, सोप्या आणि छंदोबद्ध असल्याने अधिक भावणाऱ्या आहेत. वास्तववादी म्हणताना किंचित भडकपणाकडे झुकणाऱ्या, गद्यता वागविणाऱ्या कवितेच्या पार्श्वभूमीवर या लयबद्ध, रसरशीत कवितेचे मंद सुरातले हे अलगुज गाणे काही काळ तरी रसिकांना निश्चितच भुरळ पाडेल, असे वाटते. (अलगुजगाणे : संपादक : डॉ. शंतनू चिंधडे : चंद्रकला प्रकाशन, पुणे : पृष्ठे : ७१, मूल्य : ९० रुपये)



बहुरूपी पु. ल. देशपांडे :



'महाराष्ट्राचे लाडके व्यक्तिमत्त्व' म्हणून लौकिक मिळविलेल्या पु. ल. देशपांडे या बहुआयामी व्यक्तिमत्त्वाची ओळख करून देणारे आणि त्यांच्या चौफेर कार्यकर्तृत्वाचा वेध घेणारे हे अत्यंत वाचनीय असे पुस्तक आहे. पुलंची वैशिष्ट्ये, नाटककार पु. ल., पु. ल. आणि चित्रपटसृष्टी, त्यांनी लिहिलेली व्यक्तिचित्रे आणि प्रवासवर्णने, त्यांची साहित्यमीमांसा, गद्य विडंबने, पु. ल. आणि राजकारण आदी बाबींवर यामध्ये प्रकाशझोत टाकला आहे. पण त्याचबरोबर पु.लं.नी जीवनावर आणि माणसांवर मनापासून प्रेम केले. मध्यमवर्गीयांची सुखदुःखे संवेदनशीलतेने टिपली. लोकांना हसवले आणि विचार करायलाही प्रवृत्त केले. या त्यांच्या वैशिष्ट्यांचे दर्शनही यामधून घडते. (बहुरूपी पु. ल. देशपांडे : लेखिका : नीला पांढरे, उन्मेष प्रकाशन, पृष्ठे - ७५, मूल्य - ७५ रुपये)

❖❖❖

स्वाती महाळंक

(पान क्र. ५३ वरून पुढे चालू...)

करू लागला.'' ''लोकांचं काळशार काळजासारखं तोंड कळीसारखं फुललं. काळ्या ओठातून कापसासारखे पांढरे दात बाहेर दिसत होते, ''बाई नागासारखा फणा काढून फणफण करू लागली.'' ताड्ताड् जोरात वारा आल्यासारखं बाहेर आली. गारा पडाव्यात तसं दणक्याचं तिचं तोंड चालू झालं.'' या सारख्या कलात्मकतेचा बाज राखणाऱ्या वाक्यरचनांमुळे सदर पुस्तक वाचनीय होते. अशा या वडार जातीच्या कुत्तरओढीची कहाणी रंगवितांना या जातीतील स्त्रियांच्या वाट्याला जे दुःखभोग आलेले आहेत; त्याचे देखील प्रभावी चित्रण केलेलं आहे. त्यामुळे ही कादंबरी फक्त तिम्माची कहाणी राहत नाही तर, वडारजातीच्या सामाजिक संघर्षाची कहाणी होते. या कहाणीची अखेर मात्र सकारात्मक करून एक आश्वासकता प्रा. प्रकाश जाधव यांनी निर्माण केली आहे.

❖❖❖

तिम्मा : लेखक प्रा. प्रकाश जाधव,
स्पर्श प्रकाशन, पुणे.

प्रा. संजय नगरकर
राधाबाई काळे महिला महाविद्यालय, अहमदनगर

कार्यवृत्त (१ डिसेंबर २००९ ते २८ फेब्रुवारी २०१०)

डॉ. माधवी वैद्य, प्रमुख कार्यवाह

३ डिसेंबर २००९ : अहिताग्नि राजवाडे स्मृतिदिन : स्वागत व सूत्रसंचालन स्थानिक कार्यवाह प्रा. मिलिंद जोशी यांनी केले. प्रास्ताविक कार्याध्यक्ष डॉ. वि. भा. देशपांडे यांनी केले. प्रमुख वक्त्या प्रा. सुहासिनी देशपांडे यांचा डॉ. वि. भा. देशपांडे यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. दीपक करंदीकर यांनी परिचय करून दिला. 'संयुक्त महाराष्ट्राची चळवळ आणि शाहिरांचं योगदान' या विषयावर प्रा. सुहासिनी देशपांडे यांचे व्याख्यान झाले.

८ डिसेंबर २००९ : लोकशाहीर आण्णा भाऊ साठे अध्यासन, पुणे विद्यापीठ व म.सा.प.पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने 'महाराष्ट्राची शाहिरी परंपरा काल आणि आज' या विषयावर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यानिमित्ताने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या नाट्यविभागाचे माजी प्रमुख डॉ. रुस्तुम अचलखांब व त्यांचे सहकारी यांनी शाहिरीचे सादरीकरण व संदर्भासहित विवेचन केले. यावेळेस अध्यक्षस्थानी कार्याध्यक्ष डॉ. वि. भा.देशपांडे होते. प्रा. मिलिंद जोशी यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी व्यासपीठावर परिषदेच्या प्रमुख कार्यवाह डॉ. माधवी वैद्य व लो. आण्णा भाऊ साठे अध्यासनाचे प्रमुख प्रा. रामनाथ चव्हाण व मा. प. मंगूडकर उपस्थित होते.

१० डिसेंबर २००९ : 'नवे कोरे' या उपक्रमांतर्गत प्रा. प्रकाश जाधव लिखित 'तिम्मा' या पुस्तकाचे स्वागत व प्रकाशन करण्यात आले. प्रास्ताविक डॉ. सु. प्र. कुलकर्णी यांनी केले. स्पर्श प्रकाशनचे मदन हजेरी कार्याध्यक्ष डॉ. वि. भा. देशपांडे, प्रमुख वक्ते डॉ. मनोहर जाधव व्यासपीठावर होते. अध्यक्षस्थानी डॉ. अनिल अवचट होते. डॉ. अवचट यांच्या हस्ते 'तिम्मा'चे प्रकाशन झाले. प्रा.संजीव नगरकर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. वि. भा. देशपांडे आणि डॉ. मनोहर जाधव यांनी पुस्तकावर अभ्यासपूर्ण विचार मांडले. डॉ. अवचट यांनी अध्यक्षीय समारोप केला. लेखक प्रकाश जाधव यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

११ डिसेंबर २००९ : नाट्य विभाग : ज्येष्ठ रंगकर्मी लालन सारंग यांच्या हस्ते 'नाट्यास्वाद कार्यशाळेचे उद्घाटन व एकांकिका लेखनस्पर्धेचे पारितोषिक वितरण झाले. याचवेळी डॉ. वि. भा. देशपांडे यांनी लालन सारंग यांची मुलाखत घेतली. योगेश सोमण यांनी सूत्रसंचालन केले. या कार्यशाळेत नाटकनिर्मिती, नाट्यप्रयोग व नाट्यास्वाद या घटकांचे प्रात्यक्षिकांसह प्रशिक्षण देण्यात आले. कार्यशाळेत चाळीस प्रशिक्षणार्थींनी सहभाग नोंदवला. १ ते ४ डिसेंबर असे ४ दिवस कार्यशाळा आयोजन करण्यात आले होते.

१२ डिसेंबर २००९ : प्रात्यक्षिकांसह संगीत नाटकाचा आस्वाद आणि चर्चा हा दुसऱ्या दिवशीचा विषय होता. कीर्ती शिलेदार प्रमुख वक्त्या होत्या.

१३ डिसेंबर २००९ : योगेश सोमण यांच्या 'आनंद डोह' या एकपात्री नाटकाचा प्रयोग भरत नाट्यमंदिरात दाखविण्यात आला. नंतर मुंबईच्या कलावंतांनी रत्नाकर मतकरी लिखित 'निखारे' या नाटकाचा प्रयोग दाखविला गेला. तसेच योगेश सोमण लिखित, रश्मी देव दिग्दर्शित 'दृष्टी' या एकांकिकेचा प्रयोग झाला. 'अनन्वय' संस्थेने रॉय किणीकर यांच्या कवितांवर आधारित 'उत्तर रात्र' हा कार्यक्रम सादर केला. संपूर्ण कार्यशाळेचे समन्वयक व मार्गदर्शक म्हणून कार्याध्यक्ष व ज्येष्ठ नाट्यसमीक्षक डॉ. वि. भा. देशपांडे यांनी काम पाहिले. नाट्यदिग्दर्शक योगेश सोमण व शिल्पकार भगवान रामपुरे यांच्या हस्ते प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्रे देण्यात आली. डॉ. माधवी वैद्य, महेंद्र मुंजाळ, ज्योत्स्ना नांदगिरीकर, वैशाली सातपुते, अशोकराव डहाळे यांनी संयोजन सहभाग दिला. एकांकिका लेखन स्पर्धेचा निकाल खालील प्रमाणे जाहीर करण्यात आला.

प्रथम क्रमांक : 'रेषा' - अनिरुद्ध ठुसे

द्वितीय क्रमांक : 'नांदा सौख्यभरे' - नीलिमा बोरवणकर

उत्तेजनार्थ - १) 'आत्महत्या' - भरत सुरसे

२) 'ताटातूट - श्रीराम बर्वे

३) 'बार उडवून टाकू या यंदा' - प्रा. अनुराधा कोरडे

या स्पर्धेसाठी डॉ. अजय जोशी यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले.

३० डिसेंबर २००९ : कॉफी क्लब : चित्रपट समालोचक शशिकांत किणीकर यांच्याशी गप्पांचा कार्यक्रम आयोजिला होता. डॉ. स्नेहसुधा कुलकर्णी निमंत्रक होत्या. त्यांनी किणीकरांचा परिचय करून दिला. कार्याध्यक्ष डॉ. वि. भा. देशपांडे हे खास उपस्थित होते. दीपक करंदीकर यांनी प्रास्ताविक केले. जाणकार रसिक व क्लब सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांमुळे कार्यक्रम रंगत गेला.

६ जानेवारी २०१० : श्रद्धांजली सभा : ज्येष्ठ साहित्यिक दिलीप पु. चित्रे, प्रा. अरुण कांबळे, डॉ. भा. ल. भोळे व प्र. ई. सोनकांबळे या चार साहित्यक्षेत्रातील दिवंगतांना श्रद्धांजली वाहणारी सभा कार्याध्यक्ष डॉ. वि. भा. देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या सभेत मंगेश काळे, भास्कर हांडे, संतोष शेणई, डॉ. अविनाश परुळेकर, रामनाथ चव्हाण, अनिल सकपाळ, डॉ. भगवान ठाकूर, डॉ. राजा दीक्षित यांची श्रद्धांजलीपर भाषणे झाली. यानंतर दोन मिनिटे स्तब्धता पाळून उपस्थितांनी श्रद्धांजली वाहिली.

१५ जानेवारी २०१० : कै.वि.स. खांडेकर स्मृतीदिन : डॉ. न. म. जोशी यांचे 'खांडेकरांच्या साहित्यातील मूल्यविचार' या विषयावर व्याख्यान झाले. वि. स. खांडेकर यांच्या 'शेजारी' या कथेचे वाचन प्रमुख कार्यवाह डॉ. माधवी वैद्य यांनी केले. प्रास्ताविक, स्वागत व आभार डॉ. माधवी वैद्य यांनी मानले.

१६ जानेवारी २०१० : न्या. म. गो. रानडे स्मृतिदिनः डॉ. अरुणा ढेरे यांचे 'रमा-माधवांचे सहजीवन' या विषयावर व्याख्यान झाले. व्यासपीठावर परिषदेचे कार्याध्यक्ष डॉ. वि. भा. देशपांडे होते. त्यांनी प्रास्ताविक केले. रानडे स्मृतिदिन समितीचे श्रीधर सहस्रबुद्धे यांनी व्याख्यानमालेविषयी निवेदन केले व व्याख्यात्यांचा परिचय करून दिला. सूत्रसंचालन दीपक करंदीकर यांनी केले व श्रीधर सहस्रबुद्धे यांनी आभार मानले.

१७ जानेवारी २०१० : यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान व म.सा.प. पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने विदर्भातील लेखिका डॉ. प्रतिमा इंगोले यांनी लिहिलेल्या 'आत्मघाताचे दशक' या पुस्तकावर भारतीय प्रशासन सेवेचे माजी सचिव केंद्रशासन मा. पद्माकर दुभाषी यांच्या अध्यक्षतेखाली परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. या परिसंवादात डॉ. कुमार सप्तर्षी, प्रा. रामनाथ चव्हाण, प्रा. डॉ. विठ्ठल वाघ यांनी आपले विचार प्रकट केले. परिषदेचे डॉ. वि. भा. देशपांडे व प्रतिष्ठानचे शंकरराव भिडे यांनी आपापल्या भूमिका प्रारंभी विशद केल्या त्यानंतर लेखिका डॉ. प्रतिमा इंगोले यांनी आपले मनोगत प्रकट केले. प्रतिष्ठानचे विश्वस्त ज्ञानेश्वर खैरे व 'वनराई'चे मोहन धारिया हे दोघे व्यासपीठावर होते. श्री. अरविंद नळकांडे व आप्पासाहेब भुजबळ यांनीही या परिसंवादात आपल्या उत्स्फूर्त प्रतिक्रिया नोंदवल्या. 'वनराई'च्या सभागृहात दोन तास रंगलेल्या या परिसंवादाचे सूत्रसंचालन दीपक करंदीकर यांनी केले व आभार प्रा. पंडित यांनी मानले.

२१ जानेवारी २०१० : ८३व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे नवनिर्वाचित/नियोजित अध्यक्ष- ज्येष्ठ समीक्षक डॉ. द. भि. कुलकर्णी यांचा प्रथेप्रमाणे पहिला जाहीर सत्कार महाराष्ट्र साहित्य परिषद व पुण्यभूषण फाउंडेशन, पुणे यांच्या वतीने पटवर्धन सभागृहात झाला. डॉ. सतीश देसाई यांनी उपस्थितांचे स्वागत केले. तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. द. मा. मिरासदार व पुण्याचे महापौर मा. मोहनसिंग राजपाल (प्रमुख पाहुणे) या दोघांचा सत्कार-स्वागत दोन्ही संस्थांच्या वतीने डॉ. वि. भा. देशपांडे व डॉ. सतीश देसाई यांनी पुष्पगुच्छ देऊन केला. कार्याध्यक्ष डॉ. वि. भा. देशपांडे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. द. भि. कुलकर्णी यांच्या हस्ते संमेलनानिमित्त ८३व्या पणतीचे प्रज्वलन करण्यात आले. अर्थात् परिषदेच्या प्रवेशद्वाराच्या परिसरात रंगीबेरंगी रांगोळी व या आधी झालेल्या ब्याऐंशी साहित्य संमेलनांचे प्रतीक म्हणून ८२ पणत्या लावण्यात आल्या होत्या. यानंतर प्रा. द. मा. मिरासदार व महापौर मोहनसिंग राजपाल यांच्या हस्ते डॉ. द. भि. कुलकर्णी यांचा भव्य सत्कार करण्यात आला. त्याचवेळी सभागृहाच्या गच्चीतून गुलाब पाकळ्यांचा वर्षाव डॉ. द. भि. कुलकर्णी यांच्यावर करण्यात आला. त्यानंतर पुण्यातील साहित्यिक, प्रकाशन व्यवसाय,

सामाजिक संस्थांतील प्रतिनिधींनी डॉ. द. भि. कुलकर्णी यांचा सत्कार केला. प्रकाशक श्री. अरुण जाखडे यांनी डॉ. द. भि. कुलकर्णी यांच्याविषयी गौरवपर मनोगत व्यक्त केले. पुण्याचे महापौर मा. मोहनसिंग राजपाल यांनी या प्रसंगाने आपले विचार अस्खलित मराठीत प्रकट केले. डॉ. द. भि. कुलकर्णी यानी सत्कारास उत्तर दिले. प्रा. द. मा. मिरासदार यांनी अध्यक्षीय समारोप केला. कार्यवाह प्रा. मिलिंद जोशी यांनी सूत्रसंचालन केले व प्रमुख कार्यवाह डॉ. माधवी वैद्य यांनी आभार मानले. या सत्कार सोहळ्यास साहित्य रसिक व साहित्य क्षेत्रातील अनेक मान्यवर बहुसंख्येने उपस्थित होते.

२९ जानेवारी २०१० : 'मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड २ रा भाग १ व २ (अद्ययावत पुरवणीसह) दुसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन 'सिम्बॉयसिस' संस्थेचे डॉ. शां. ब. मुजुमदार यांच्या शुभहस्ते झाले. कार्याध्यक्ष डॉ. वि. भा. देशपांडे यांनी प्रास्ताविक केले. प्रमुख कार्यवाह डॉ. माधवी वैद्य यांनी डॉ. शां. व. मुजुमदार यांचा सत्कार केला. शाल, श्रीफल, गुरूकुल प्रकाशनाची २०१० ची दैनंदिनी असे या सत्काराचे स्वरूप होते. त्याचप्रमाणे डॉ. द. भि. कुलकर्णी, आणि साहित्य पत्रिकेचे संपादक डॉ. सु. प्र. कुलकर्णी व या खंडाच्या अद्ययावत पुरवणीचे लेखन करणाऱ्या ज्येष्ठ साहित्यिक डॉ. लीला गोविलकर यांचाही सत्कार करण्यात आला. कोषाध्यक्ष श्री. ह. ल. निपुणगे यांनी प्रस्तुत ग्रंथाविषयीचे निवेदन कोषाध्यक्ष या नात्याने केले. कार्यवाह स्वाती महाळंक यांनी समारंभाचे अध्यक्ष डॉ. शां. ब. मुजुमदार यांचा परिचय करून दिला. परिषदेच्या या वाङ्मयीन उच्च दर्जाच्या प्रकल्पासाठी अर्थसहाय्य करणाऱ्या श्री अक्कलकोट स्वामी महाराज संस्थेच्या विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष व विश्वस्त मंडळाचे सर्व सदस्य या समारंभास खास उपस्थित होते. अध्यक्ष डॉ. शां. ब. मुजुमदार यांच्या हस्ते या सर्वांचा शाल, श्रीफल आणि गुरूकुल प्रकाशन संस्थेची २०१० ची दैनंदिनी व प्रस्तुत ग्रंथाचा संच देऊन सत्कार करण्यात आला. प्राचार्य वसंतराव कृ. नूलकर, डॉ. दिगंबर ज. वाडदेकर, गजाननराव जेधे, संदीप होनराव, रवि शेडगे, वि. वि. आगाशे व श्रीराम पुरंदरे यांचा समावेश होता. संस्थानचे विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष प्राचार्य व. कृ. नूलकर यांनी या सर्वांच्या वतीने सत्कारास उत्तर दिले. तसेच या ग्रंथाचे सुबक मुद्रण करणारे मुद्रक श्री. जंगम यांचाही सत्कार यानिमित्ताने करण्यात आला. त्यानंतर डॉ. लीला गोविलकर आणि डॉ. सु. प्र. कुलकर्णी आणि डॉ. द. भि. कुलकर्णी यांनी वाङ्मयेतिहासावर आपले विचार मांडले. अध्यक्षीय समारोप डॉ. शां. ब. मुजुमदार यांनी केला. ही देणगी मिळविण्यासाठी कोषाध्यक्ष ह. ल. निपुणगे यांनी विशेष प्रयत्न केले. प्रमुख कार्यवाह डॉ. माधवी वैद्य यांनी आभार मानले व दीपक करंदीकर यांनी सूत्रसंचालन केले.

३० जानेवारी २०१० : गुरूदेव रवींद्रनाथ टागोर यांच्या दोन कवितासंग्रहांचा अनुवाद नागपूरचे डॉ. राम म्हैसाळकर यांनी 'रवींद्र शेपलेखा आणि रवींद्र जन्मदिने' या नावाने केले आहे. या दोन्ही पुस्तकांचा प्रकाशन समारंभ परिषदेच्या सहकार्याने कार्याध्यक्ष डॉ. वि. भा. देशपांडे यांच्या हस्ते झाले. स्वागत व सूत्रसंचालन

❖❖❖

देणगीदार – १ डिसेंबर २००९ ते फेब्रुवारी २०१०

क्र.	दिनांक	नाव	रक्कम	
१)	८-१२-२००९	माधव चिंतामण कर्वे	१०,०००/-	ग्रंथालयासाठी देणगी
२)	१६-१२-२००९	श्री. वि. सहस्रबुद्धे	१,५००/-	न्या. म. गो. रानडे स्मृतीव्याख्यानासाठी देणगी
३)	१७-१२-२००९	फडर्णास इन्फ्रास्ट्रक्चर लि.	९९,०००/-	वाङ्मयइतिहास खंड ७वा भाग २रा प्रकाशनासाठी
४)	१४-१-२०१०	दि. वा. जोशी	५००/-	योगक्षेमार्थ देणगी
५)	३-२-२०१०	डॉ. म. वि. गोखले	२,००,०००/-	पारितोषिक व स्मृतिदिनासाठी देणगी
६)	४-२-२०१०	भारती विद्यापीठ विश्वविद्यालय, पुणे	३,५०,०००/-	वाङ्मयइतिहास खंड ७वा भाग २रा प्रकाशनासाठी
७)	१०-२-२०१०	मीनाक्षी केळकर	५००/-	दिवाळी अंक पारितोषिकासाठी देणगी
८)	१२-२-२०१०	श्री अक्कलकोट स्वामी महाराज संस्थान, पुणे	१,००,०००/-	वाङ्मयइतिहास खंड २रा भाग १ व २ दुसऱ्या आवृत्तीसाठी
९)	१३-२-२०१०	प्रा. एन. डी. पिंगळे	१,१००/-	ग्रंथालयाच्या पारितोषिकासाठी देणगी

❖❖❖

कार्यवाह स्वाती महाळंक यांनी केले. प्रास्ताविक व अनुवादकाची भूमिका डॉ. राम म्हैसाळकर यांनी सांगितली. प्रमुख कार्यवाह डॉ. माधवी वैद्य यांच्या हस्ते डॉ. राम म्हैसाळकर, डॉ. वि. भा. देशपांडे, डॉ. नीलिमा गुंडी, डॉ. कल्याणी हर्डीकर यांचे सत्कार करण्यात आले. पुस्तकांविषयीचे विचार डॉ. कल्याणी हर्डीकर, डॉ. नीलिमा गुंडी व माधवानंद नगरकर यांनी व्यक्त केले. प्रारंभी सरस्वती स्तवन सौ. नंदिनी देसाई व शेवटी पसायदान सौ. सीमा शेंडे यांनी सादर केले. डॉ. वि. भा. देशपांडे यांनी अध्यक्षीय समारोप केला. दीपक करंदीकर यांनी आभार प्रदर्शन केले.

३१ जानेवारी २०१० : कॉफी क्लब : नागपूरचे प्रसिद्ध अनुवादक डॉ. राम म्हैसाळकर यांचे 'गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांच्या त्यांनी केलेल्या मराठी अनुवाद कवितांचे वाचन व त्यांच्याशी गप्पा असा कार्यक्रम झाला.

८ फेब्रुवारी २०१० : प्रकाशन समारंभ : म. सा. परिषदेचे स्वतःचे प्रकाशन असलेला 'मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ७ वा' (१९५०-२०००) भाग दुसरा या ग्रंथाचे प्रकाशन ज्येष्ठ कवी व समीक्षक डॉ. वसंत आबाजी डहाके यांचे हस्ते झाले. प्रमुख उपस्थिती या ग्रंथाचे संपादक प्रा. रा. ग. जाधव यांची होती. या समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून भारती विद्यापीठ विश्वविद्यालयाचे कुलगुरू डॉ. शिवाजीराव कदम व फडणीस इन्फ्रास्ट्रक्चर लि. पुणेचे अध्यक्ष मा. श्री. विनय फडणीस हे व्यासपीठावर होते. या निमित्ताने डॉ. वसंत आबाजी डहाके यांचा 'साहित्य अकादमी' पुरस्कार मिळाल्याबद्दल भारती विद्यापीठ विश्वविद्यालयाचे कुलगुरू डॉ. शिवाजीराव कदम यांच्या हस्ते महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या वतीने खास सत्कार करण्यात आला.

अवधूत गांधी यांनी प्रारंभी 'ॐ नमो जी आद्या' हे संत ज्ञानेश्वरांचे 'गणेश स्तवन', शारदा स्तवन व शेवटी पसायदान सादर केले. सूत्रसंचालन प्रा. मिलिंद जोशी यांनी केले. डॉ. डहाके यांचा स्वागतपर सत्कार पुष्पगुच्छ व शाल देऊन प्रमुख कार्यवाह डॉ. माधवी वैद्य यांनी केला. तसेच प्रा. रा. ग. जाधव यांचा सत्कार विनय फडणीस, मा. डॉ. शिवाजीराव कदम यांचा सत्कार कार्याध्यक्ष डॉ. वि. भा. देशपांडे यांनी, विनय फडणीस यांचा सत्कार प्रा. रा. ग. जाधव यांनी केला. प्रास्ताविक डॉ. वि. भा. देशपांडे यांनी केले. डॉ. डहाके यांचा परिचय डॉ. कल्याणी दिवेकर, डॉ. शिवाजीराव कदम यांचा परिचय स्वाती महाळंक यांनी व विनय फडणीस यांचा परिचय नंदा सुर्वे यांनी करून दिला.

यानंतर प्रस्तुत खंडाचे लेखक डॉ. प्रभा गणोरकर, डॉ. नीलिमा गुंडी, विजया देव, डॉ. स्वाती कर्वे, साधना बहुलकर, सुलभा तेरणीकर, यांचे सत्कार मान्यवरांनी केले. तसेच संपादन सहाय्याबद्दल महेंद्र मुंजाळ 'सूची'बद्दल शिल्पा फडणीस, तसेच जयदीप व ल. म. कडू यांचे सत्कार करण्यात आले. यशदा मुद्रणालयाचे जयंत भाडळे, ज्योत्स्ना नांदगिरीकर, अशोकराव डहाळे, अवधूत गांधी, डॉ. वि. भा. देशपांडे, डॉ. माधवी वैद्य, प्रा. मिलिंद जोशी यांचेही उचित सत्कार करण्यात आले. प्रा. रा. ग. जाधव, डॉ. कदम, विनय फडणीस व वसंत आ. डहाके यांनी यथोचित भाषणे केली. डॉ. माधवी वैद्य यांनी आभार मानले.

२२ फेब्रुवारी २०१० : दिवाळी अंक-२००९ स्पर्धा पारितोषिक वितरण समारंभ : गेली सुमारे १२ वर्षे

परिषदेच्या वा. गो. आपटे संदर्भ ग्रंथालयाच्या वतीने दिवाळी अंक स्पर्धा आयोजित करण्यात येते. यंदा सुमारे ७० दिवाळी अंक या स्पर्धेसाठी परिषदेकडे आले होते. प्रा. सौ. वैजयंती चिपळूणकर व सौ. कविता मेहेंदळे यांनी परीक्षकाचे काम केले. (या वृत्तासोबत 'दिवाळी अंक २००९ स्पर्धेचे अंतिम निकाल' पत्रक पुढील पानावर दिले आहे.) सह्याद्री सदनाच्या सभागृहात ज्येष्ठ विचारवंत व सा. साधनाचे संपादक डॉ. नरेंद्र दाभोळकर यांच्या हस्ते पारितोषिके प्रदान करण्यात आली. कोषाध्यक्ष ह. ल. निपुणगे यांनी प्रास्ताविक केले. 'दिवाळी अंक २००९' स्पर्धा समितीचे निमंत्रक दीपक करंदीकर यांनी निमंत्रकाचे मनोगत व्यक्त केले. दोनही परीक्षकांनी आपापली मनोगते प्रकट केली. पारितोषिक प्राप्त व्यक्तींपैकी महेश कराडकर, सूर्यकांत पाठक, अविनाश हळबे व श्रीनिवास हेमाडे यांनी आपली मनोगते व्यक्त केली. शेवटी अध्यक्षीय समारोपाचे भाषण डॉ. नरेंद्र दाभोळकर यांनी केले. ज्ञानेश्वरीच्या प्रती व उत्कृष्टतेची प्रमाणपत्रे सर्व पारितोषिक विजेत्यांना प्रदान करण्यात आली. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन नंदा सुर्वे यांनी केले.

दिवाळी अंक स्पर्धा २००९ (निर्णय)

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या या वर्षीच्या दिवाळी अंक २००९ च्या स्पर्धेसाठी ७० अंक आले. या स्पर्धेचा निकाल सर्व परीक्षकांनी एकमताने दिला आहे.

१) अ. स. गोखले स्मृत्यर्थ 'रत्नाकर' पारितोषिक (विभागून - रुपये १,००१/-
   अ) अंक : ग्राहकहित, संपादक : सूर्यकांत पाठक
   ब) अंक : मेहता मराठी ग्रंथ जगत, संपादक : सुनील मेहता

२) श्री. चंद्रकांत शेवाळे (संपादक-ग्रहांकित) पुरस्कृत तीन पारितोषिके
   अ) विविध ज्ञानविस्तारकर्ते 'रावसाहेब मोरमकर' पारितोषिक - रुपये १,०००/-
   अंक : साप्ताहिक सकाळ, संपादक : उत्तम कांबळे
   ब) मासिक मनोरंजनकार 'का. र. मित्र' पारितोषिक- रुपये १,०००/-
   अंक : चतुरंग अन्वय, संपादक : महेश कराडकर
   क) शं. वा. किर्लोस्कर यांच्या स्मरणार्थ पारितोषिक - रुपये १,०००/-
   अंक : व्यासपीठ, संपादक : हेमंत पोतदार

३) उत्कृष्ट कथेचे 'दि. अ. सोनटक्के' पारितोषिक रुपये ५००/-
   कथा : 'त्वमेव केवलंकर्तासी', लेखक : अविनाश हळबे
   अंक : कलासागर, संपादक : शेखर जोशी

४) उत्कृष्ट ललितलेखासाठी 'अनंत काणेकर' पारितोषिक (विभागून) - रुपये २००/-
   अ) लेख : 'वृत्तपत्रांचा अंत जवळ आला आहे' लेखक : किशोर कुलकर्णी
   अंक : चिंतन आदेश, संपादक : अभिनंदन थोरात
   ब) लेख : 'मैत्रीची बाजारपेठ' (मैत्री विकतच घ्यायची असते) लेखक : श्रीनिवास हेमाडे
   अंक : पुरुषस्पंदन (माणूसपणाच्या वाटेवरची) संपादक : हरीष सदानी

५) बाल विभागासाठी विशेष पारितोषिक (कै. जानकीबाई केळकर यांच्या स्मरणार्थ) - रुपये ५००/-
   अंक : छावा, संपादक : दीपक टिळक
   परीक्षक : सौ. कविता मेहेंदळे, प्रा. सौ. वैजयंती चिपळूणकर, पुणे

२८ फेब्रुवारी २०१० : राष्ट्रीय विज्ञान दिन : म. सा. परिषद व मराठी विज्ञान परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. मिलिंद वाटवे यांचे 'जैवविविधता वर्षाचे महत्त्व व उपक्रम' या विषयावर व्याख्यान झाले. व्याख्यानानंतर 'प्रश्नोत्तर' पद्धतीने श्रोत्यांशी संवाद साधला गेला. परिषदेचे कार्यवाह प्रा. मिलिंद जोशी यांनी प्रास्ताविक व ज्ञानेश्वरीची प्रत देऊन वक्त्यांचे स्वागत केले. प्रा. विनय र. र. यांनी मराठी विज्ञान परिषदेच्या कार्याविषयी थोडक्यात माहिती दिली व विज्ञान रंजन स्पर्धा २०१० चा निकाल जाहीर केला. डॉ. माधव पेंडसे यांनी वक्त्यांचा परिचय करून दिला. परिषदेच्या प्रमुख कार्यवाह डॉ. माधवी वैद्य यांनी आभार मानले. दीपक करंदीकर यांनी सूत्र संचालन केले.

❖❖❖

बार्शी शाखा

२९ नोव्हेंबर २००९ : मसाप, बार्शी शाखा, वर्धापन दिन समारंभ : बार्शी शाखेच्या तृतीय वर्धापनदिनानिमित्त शाहीर अमरशेख साहित्य पुरस्कारांचे वितरण ज्येष्ठ विचारवंत पन्नालाल सुराणा यांच्या अध्यक्षतेखाली झाले. शाखाध्यक्ष श्यामसुंदर मुळे यांनी बार्शी शाखेच्या वाटचालीची माहिती दिली.

'माझी चित्तरकथा' रवींद्र जोशी, पुणे, 'रंगवेध' डॉ. सुनंदा देशपांडे, नागपूर, ऑक्टोपस- लक्ष्मीकांत देशमुख कोल्हापूर यांना यंदाचे पुरस्कार जाहीर झाल्याचे शाखा प्रमुख कार्यवाह शब्बीर मुलाणी यांनी सांगितले. प्रा. शकील शेख यांनी परीक्षकांचे मनोगत व्यक्त केले. ॲड. प्रशांत शेटे यांनी पुरस्कारप्राप्त लेखकांचा परिचय करून दिला. डॉ. अजीज नदाफ यांच्या हस्ते शाल व पुष्पहार घालून श्री. रवींद्र जोशी व डॉ. सुनंदा देशपांडे यांचा सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन मुकुंदराज कुलकर्णी व आभार प्रदर्शन श्री. पां. न. निपाणीकर यांनी केले.

❖❖❖

सोलापूर शाखा

१३ ऑगस्ट २००९ : आचार्य अत्रे जयंती : कै. मा. गो. काटकर स्मृतिप्रीत्यर्थ त्यांची कन्या सौ. मीना गोळे यांनी दिलेल्या देणगीतून 'भ्रमंतीतील आनंद' या विषयावर ॲड. आनंद देशपांडे यांचे व्याख्यान झाले. प्रास्ताविक दत्ता हलसगीकर यांनी केले. मनोगत डॉ. सुहास पुजारी यांनी केले. सूत्रसंचालन व आभार प्रेमचंद मेने यांनी मानले.

१७ सप्टेंबर २००९ : 'चोखामेळा-कवित्व व व्यक्तित्व' या विषयावर डॉ. नरेंद्र कुंटे यांचे व्याख्यान झाले. सौ. माधुरी रायते यांनी संत चोखामेळा यांचा अभंग सादर केला. प्रास्ताविक व वक्त्यांचा परिचय डॉ. सुहास पुजारी यांनी करून दिला. अध्यक्षीय समारोप दत्ता हलसगीकर यांनी केला. सूत्रसंचालन अरुणकुमार धुमाळ यांनी केले तर आभार बाबूराव मैंदर्गीकर यांनी मानले.

२३ नोव्हेंबर २००९ : 'म.सा.परिषद तुमच्या दारी' या उपक्रमांतर्गत 'मला आवडलेले पुस्तक' या विषयावर डॉ. अरविंद टेके आणि अरविंद पुजारी यांनी आपले विचार प्रकट केले. प्रास्ताविक डॉ. सुहास पुजारी यांनी केले. अध्यक्षीय समारोप दत्ता हलसगीकर यांनी केला. पद्माकर कुलकर्णी यांनी आभार मानले.

३० नोव्हेंबर २००९ : बा. भ. बोरकर जन्मशताब्दिनिमित्त 'आनंदयात्री बोरकर' या विषयावर डॉ. लक्ष्मीनारायण बोल्ली यांचे व्याख्यान झाले. प्रास्ताविक डॉ. सुहास पुजारी, अध्यक्षीय समारोप दत्ता हलसगीकर आणि सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन बाबुराव मैंदर्गीकर यांनी केले.

१७, १८, १९ डिसेंबर २००९ : मसापची सोलापूर शाखा व शेठ लोणकरणजी जगन्नाथजी चंडक ट्रस्ट सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने शेठ लोणकरणजी चंडक व्याख्यानमाला आयोजित केली होती. हे मालेचे १३वे वर्ष आहे. 'आमचे प्रश्न-संत साहित्याचे उत्तर' या विषयावर प्रा. मिलिंद जोशी, 'कवीश्रेष्ठ- ग. दि. माडगूळकर' या विषयावर डॉ. श्रीकांत नरूले. 'कायद्याचे आधिष्ठान' या विषयावर लीना मेहेंदळे यांची व्याख्याने तीन दिवस झाली. स्वागत व प्रास्ताविक प्रा. डॉ. सुहास पुजारी, दत्ता हलसगीकर, ॲड जे. जे. कुलकर्णी यांनी अनुक्रमे केले. सूत्रसंचालन प्रेमचंद मेने, डॉ. श्रुती वडगबाळकर, सौ. शोभना सागर यांनी केले. आभार- अरविंद जोशी यांनी मानले. बदिउज्जमा बिराजदार यांनी परिचय करून दिला.

१९ जानेवारी २०१० : मसाप, पुणे व सूयां अध्यापन साहित्य (प्रकाशन) सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने मसाप साहित्य पत्रिका अंक क्र. ३२४ व ३२५ विशेषांकांचे एकत्रिकरण करून साकारलेल्या 'संत तुकाराम आणि समर्थ रामदास (विशेष स्मरण)' या ग्रंथाचे प्रकाशन ज्येष्ठ साहित्यिक श्रीकांतजी मोरे यांच्या अध्यक्षतेखाली व प्रा. नरेंद्र कुंटे यांच्या हस्ते झाले. याचवेळी मसापत्रिका अंक ३३१चे प्रकाशन पत्रकार अरविंद जोशी यांच्या हस्ते झाले. प्रा. डॉ. येळगावकर यांचे फॅमिली प्लॅनिंग असो. ऑफ इंडियाच्या राष्ट्रीय उपाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाला म. सा. पत्रिका संपादक डॉ. सु. प्र. कुलकर्णी, कोषाध्यक्ष ह. ल. निपुणगे आणि सल्लागार रत्नाकर कुलकर्णी उपस्थित होते.

❖❖❖

अनुक्रमणिका

फलटण शाखा

२३ व २४ डिसेंबर २००९ : दोन दिवस परिषदेच्या शाखा मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. महात्मा एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष सुभाषराव शिंदे, परिषदेचे अध्यक्ष डॉ. वि. भा. देशपांडे, कोषाध्यक्ष ह. ल. निपुणगे, प्रमुख कार्यवाह डॉ. माधवी वैद्य, फलटण शाखा अध्यक्ष रवींद्र बेडकीहाळ, बापूसाहेब मोदी, डॉ. प्रा. एम. जे. जाधव, आर. व्ही. निंबाळकर, डॉ. विजयराव बोरावके, ॲड. मधुबाला भोसले, सुरेश शिंदे, वगैरे मान्यवर या मेळाव्यास उपस्थित होते. फलटण शाखेने राज्य स्तरीय दिवाळी अंक स्पर्धा व जिल्हा स्तरीय काव्य स्पर्धा आयोजित केली होती. 'निशांत', 'गुंफण', 'रत्नभूमी', 'विनोदी आक्रोश', 'पुरुष स्पंदन', 'करवीर काशी', 'साहित्य आभा' या दिवाळी अंकांना पारितोषिके देण्यात आली. ज. तु. गार्डे, प्रा. अशोक माने, शुभांगी शिंदे, ए. आर. साळुंखे यांना काव्य स्पर्धेची पारितोषिके देण्यात आली. नांदेड येथील बालकथाकार कुमारी शचि शैलजा (वय दहा) हिने स्वतःची कथा उत्कृष्टपणे सादर केली. छ. शिवाजी वाचनालयाचे अध्यक्ष ॲड. दस्तगीर मेटकरी यांच्या हस्ते तिचा सत्कार करण्यात आला. शाखा मेळाव्यासाठी परिपदेच्या विविध शाखांचे पदाधिकारी उपस्थित होते. प्रत्येकाने आपले विचार प्रकट केले. यानंतर स्थानिक कवींचा सहभाग असलेले कविसंमेलन आयोजित करण्यात आले. थोर वक्ते प्राचार्य शिवाजीराव भोसले यांची सन्माननीय उपस्थिती समारोपाच्या कार्यक्रमात लाभली होती. त्यांचे अमूल्य असे विचार उपस्थितांना ऐकावयास मिळाले. या शाखा मेळाव्यास श्री. रवींद्र बेडकीहाळ आणि त्यांचे सहकारी यांनी परिश्रम घेतले. त्याचप्रमाणे डॉ. सतीश देसाई, ॲड. प्रमोद आडकर, स्वाती महाळंक, प्रा. मिलिंद जोशी, डॉ. स्नेहसुधा कुलकर्णी, प्रभाकर संत, डॉ. भगवान ठाकूर, रत्नाकर कुलकर्णी हे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते. तसेच विविध शाखांचे प्रतिनिधी- मारुती कटकधोंड (सोलापूर) वरखेडकर (पंढरपूर) रावसाहेब पवार (सासवड) मारुती भिकू भोसले (कोरेगाव) रामचंद्र जाधव (पिंपवड) सुनील कुमार सरनाईक (कोल्हापूर) राजन मुठाणे (इचलकरंजी), पद्माकर कुलकर्णी, सोलापूर, डॉ. किसन पाटील (जळगांव) मेळाव्यास उपस्थित होते. परगावांहून आलेल्या सर्व प्रतिनिधींची भोजन निवास व्यवस्था व शाखा मेळावा संयोजन फलटण शाखेने केले होते.

❖❖❖

नांदगाव शाखा (जि. नाशिक)

९ जानेवारी २०१० : या दिवशी परिषदेच्या नांदगाव शाखेचे उद्घाटन कविवर्य ना. धों. महानोर यांच्या हस्ते झाले. अध्यक्ष डॉ. वि. भा. देशपांडे होते. प्रमुख अतिथी डॉ. माधवी वैद्य, पंकज भुजबळ, ॲड. अनिल आहेर इ. मान्यवर उपस्थित होते. दोन सत्रात ग्रंथदिंडी, बालकवी संमेलन, कथाकथन, निमंत्रित कवींचे कवी संमेलन असे कार्यक्रम झाले. प्रकाश होळकर, दे. नि. वडनेरे, पी. आर. पाटील, भैय्यासाहेब चव्हाण, विष्णू निकम, सौ. भा. व. कुलकर्णी, दयाराम गिलाणकर (अध्यक्ष), डॉ. मधुकर कवडे (उपाध्यक्ष), ॲड. सचिन साळवे (कार्यवाह), प्रा. सुरेश नारायणे (कोषाध्यक्ष) व सर्व कार्यकारिणी सदस्य यांनी संयोजनात सहभाग घेतला.

श्रीरामपूर शाखा

१ डिसेंबर २००९ : मसाप शाखा मेळावा संपन्न झाला. शाखाध्यक्ष ॲड. रावसाहेब शिंदे अध्यक्षस्थानी होते. प्रमुख कार्यवाह प्रा. डॉ. बाबूराव उपाध्ये यांनी स्वागत केले. उपाध्यक्ष अविनाश आपटे यांनी विविध उपक्रमांची माहिती दिली. कार्याध्यक्ष माजी प्रा. टी..ई. शेळके यांनी वर्षभराचे नियोजन सादर केले. उपस्थितांनी विविध सूचना केल्यावर अशोक बनकर यांनी आभार मानले.


कार्यवृत्त नोंद :

दीपक करंदीकर — स्वीकृत सदस्य, मसाप, पुणे

डॉ. माधवी वैद्य — प्रमुख कार्यवाह

❖❖❖

अनुक्रमणिका



health care
IOB
HEALTH
CARE
PLUS
A good way
to great health
IOB Healthcare Plus, a group mediclaim
for our individual
SB/Current Account customers.
Attractive premium
Floater policy for entire family
Coverage option available from
Rs. 50,000 to Rs. 5,00,000
Income tax benefit available
under Section 80D of I.T. Act
Cashless Hospitalization Service through
Third Party Administrator
Personal Accident Death Benefit Covered
on payment of additional premium
To protect all that
you gained with
great effort
For further details,please contact
your nearest IOB branch or log on www.iob.in
Toll Free : 1800 425 4445
Insurance Cover provided by
Universal Sompo General Insurance Company Ltd
इण्डियन ओवरसीज़ बैंक
Indian Overseas Bank
आपकी प्रगति का सच्चा साथी
Good people to grow with

अनुक्रमणिका

Maharashtra Sahitya Patrika. Quarterly : January to March 2010
Registered with the register of Newspaper for India under No. 6398/57

प्रेषक
प्रमुख कार्यवाह,
महाराष्ट्र साहित्य परिषद
टिळक रस्ता, पुणे–४११०३०.
दूरभाष : ०२०–२४४७५९६३.

रजनी भास्कर
अभ्यंकर ~~भास्कर रजनी~~
मराठी विश्वकोष
कार्यालयासमोर, गंगापुरी,
वाई (जि. सातारा)
४१२ ८०३

–पोस्ट

अनुक्रमणिका